
# माणूस

१ मे १९७१ | पन्नास पैसे



# चितगाव लेनिनग्राडसारखे लढवले गेले असते तर....

— रवींद्र पिंगे यांच्या लेखनास नवा बहर आला आहे... श्री. ज. जोशी, पुणे

□ दि. २४ एप्रिलच्या अंकातील श्री. रविंद्र पिंगे यांच्या कलकत्ता वर्णनातील दुसरा लेख आघाशासारखा वाचन काढला. फारच सुंदर आहे.

खरे तर कलकत्त्यातील सध्याचे जीवन इतके रौद्र आणि भयंकर आहे, की लेख वाचन मन सुन्न होते. महाराष्ट्रात सध्या सुबत्ता आहे, शांतता आणि स्थिर सरकार आहे. पण तरीही मन व्याकुळ होते. आज जे कलकत्त्यात घडत आहे, डावक्याला घडत आहे, तेच उद्या पुण्या–मुंबईत घडेल काय ?... आपले ' सुखी संसार ' पुढच्याच क्षणाला, कोळपून जाणार आहेत किंवा काय ? इत्यादी विचारांनी खिन्नता येते. अशा अस्वस्थ करून टाकणाऱ्या लेखाला ' सुंदर ' कसे म्हणायचे ? पण दुसरा शब्द आठवला नाही, म्हणून ते विशेषण लावले.

एखाद्या लेखकाने जीवन बघण्यासाठी कलकत्त्यास जाणं, हे आज तरी शीर तळहातावर घेऊन जाण्यापैकी आहे. श्री. पिंगे यांनी ते धाडस दाखविले आहे.

या छोटया लेखात श्री. पिंगे यांनी आजच्या कलकत्त्याचे — म्हणजेच उद्याच्या भारताचे वर्णन फार ताकदीने केले आहे. ' जगाच्या पाठीवर कुठेही चक्का मारा, तीन गोष्टी सर्वत्र सारख्या आहेत–किलबिलणारा माँटेसरी वर्ग, रंगीत कागदावरील सुगंधी पत्र भान हरपून वाचणारी सावलीतली तरुणी आणि पोस्टाची कचेरी ' हे वर्णन फार भेदक आहे. आजचे मराठी लेखन ' सुखी संसार 'वादी आहे. पूर्वी आई-ताईच्या गोष्टी होत्या, आज विवाहबाह्य प्रेमाच्या आहेत इतकेच...जात तीच. सुखी संसार... प्रेम... ऑफिसमधली तरुणी... वगैरे. श्री. पिंगे यांनी लेखनाची नवी वाट काढलेली दिसते.

श्री. पिंगे हे माणूसचे ' फाइंड ' नाहीत. ते जुने लेखक आहेत. पण माणूस मध्ये त्यांच्या लेखनास नवा बहर आला आहे. अभिनंदन.

---

किंमत पन्नास पैसे

शनिवार १ मे १९७१

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी पंचेचाळीस रुपये

वर्ष : दहावे
अंक : एकूणऐंशीवा ( ८० )

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मुंबई वार्ता

अरुण गोसावी

## संशोधन–मूलभूत का उपयुक्त ?

मुंबईतला उकाडा यंदा भयानक वाढला आहे. अगदी फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून यंदा मुंबईत ऊन तापू लागले. इतके की मुंबई हे बेट आहे याचाही विसर पडावा. ऊन तापायला लागले की दरवर्षीचा उन्हाळा आदल्यापेक्षा अधिक कडक वाटतो म्हणतात. पण यंदाचा उन्हाळा जास्त जाणवतो आहे खरा. कदाचित मुंबईत मोठ्या प्रमाणावर झाडांची जी छाटणी चालू आहे त्याचाही हा परिणाम असावा.

फोर्टात एक चक्कर टाकली तरी कुठल्या तरी प्रचंड पुरातन वृक्षावर घाव घालणे चालू असलेले दिसते. रस्ते रुंदीच्या कामात, इमारती बांधण्याच्या गडबडीत मुंबईतले अनेक सुंदर सुंदर वृक्ष नाहीसे होत आहेत. दोन-चार महिन्यापूर्वीच चर्चगेट शेजारच्या रस्त्यावरील चार पाच भव्य आणि पुरातन वृक्षराज महापालिकेने एकाएकी पाडून टाकून तो रस्ता ओकाबोका करून टाकला. परळ ते माटुंगा या जुन्या ट्राम रस्त्याभोवती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्याच्या मधोमध उंचच उंच झाडांच्या शानदार ओळी होत्या. तेव्हा या झाडांच्या रांगामधून चालताना किती मौज यायची. ट्राम्स गेल्या पण ही झाडे होती. गेल्या तीन वर्षात हे ट्रामचे रूळ उखडून रस्ता रुंद करीत आहेत. या झाडांवरही धाड आली. आता हा डॉ. आंबेडकर रस्ता केवढा भव्य आणि रुंद झाला आहे. दुपारी चकाकत्या उन्हात तर या डांबरी रस्त्यावर नजर ठरत नाही. आणि रात्री चमकत्या दिव्यांच्या लांबच लांब रांगामुळे डोळे दिपून जातात. पण मध्ये त्या झाडांच्या रांगा नाहीत. त्यामुळे रस्त्याची रया गेल्यासारखी वाटते. फार बटबटीत वाटते.

मुंबईच्या उपनगरात ज्या नवनव्या वसाहती उभ्या होत आहेत त्याही अशाच

ओसाड आणि बटबटीत. जिकडे पहावे तिकडे सिमेंट कॉंक्रीटच्या उंच उंच खुराड्या सारख्या इमारती. नजर ठेवायला हिरवे झाड म्हणून कोठे दिसत नाही. वनम होत्स-वाच्या घोषणा देणारे सरकार या वसाहतीत झाड का लावत नाही ? चौकशी केली तेव्हा कळले की भूमिगत तारांच्या जाळ्यांना इजा पोचू नये म्हणून झाडे लावण्यास परवानगी नाही. मुंबईत सर्वत्रच विजेच्या तारा भूमिगत आहेत. दक्षिण मुंबईत तर सर्वत्रच झाडे लावली आहेत. मग या नव्या वसाहतीतच का नाही ?

नाही म्हणायला गेल्या वर्षी मुंबई महानगरपालिकेने टाटा इन्स्टिटयुट ऑफ फंडा-मेंटल रिसर्च या संस्थेच्या सहकार्याने मरीन ड्राईव्हवर ओळीने समुद्रफुलाची झाडे लावली आहेत. मोठमोठ्या आणि जाड पानांची ही झाडे हळूहळू वाढत आहेत. त्यांची चांगली निगा घेतली जात आहे. समुद्राच्या सान्निध्यात ही झाडे चांगली वाढतात आणि समुद्रावरुन येणाऱ्या वाऱ्यावरही चांगला टिकाव धरतात. ही झाडे एकदा वाढली की मरीन ड्राईव्हचे सौंदर्य अधिक खुलून दिसेल.

ज्या टाटा इन्स्टिटयूटकडून ही झाडे महापालिकेने घेतली आहेत, ती संस्था फुला-झाडांची भलतीच षौकिन आहे. कुलाब्यात हॉलीडे कँपच्या टोकाला सुंदर झाडांच्या आडोशाला ही संस्था वसली आहे. कलापूर्ण रीतीने वाढविलेली जुनी पुराणी झाडे, सुंदर फुले आणि हिरवे गार गवतांचे मृदु गालीचे हे या संस्थेचे वैशिष्ट्य चटकन् नजरेत भरते. आत शिरल्याबरोबर एखाद्या खऱ्या रसिकाने काळजीपूर्वक लक्ष देऊन या बागांची रचना केली आहे हे जाणवते. आणि ते खरेच आहे. या बागा आणि हे गवती गालीचे हे डॉ. होमी भाभांच्या रसिकतेचे लक्षण. त्यांनी स्वतः वैय-क्तिक लक्ष घालून संस्थेला हे सौंदर्य प्राप्त करून दिले.

गेल्याच आठवड्यात या टाटा इन्स्टिटयुट ऑफ फंडामेंटल रिसर्चचा रजत महो-त्सव साजरा झाला. बहुतेक मराठी वृत्तपत्रांनी या महोत्सवाकडे दुर्लक्षच केले. स्वतः प्रधानमंत्री या समारंभाला येणार होत्या. पण ऐनवेळी दिल्लीत कामे निघा ल्याने त्या येऊ शकल्या नाहीत. त्यांचे भाषण महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. अली यावर जंग यांनी वाचून दाखविले. संस्थेच्या प्रशस्त गवती गालीच्यावर हा समारंभ झाला. देशदेशीच्या शास्त्रज्ञांनी यावेळी या संस्थेच्या कार्याची स्तुती केली.

खरे म्हणजे दुर्लक्ष करण्यासारखा हा समारंभ नव्हता. मूलभूत दर्जाचे उच्च संशोधन करणाऱ्या जगातल्या ज्या थोड्या उत्तमोत्तम संस्था आहेत त्यांच्यामध्ये या संस्थेला फार मानाचे स्थान आहे. गणित आणि भौतिक शास्त्र या विषयात या संस्थेत आतापर्यंत जे मूलभूत संशोधन केले ते साऱ्या जगात वाखाणले जाते. अवघ्या पंचवीस वर्षांत या संशोधन संस्थेने जी प्रगती केली आणि जे यश मिळविले ते अभिमानास्पद आहे. संधी उपलब्ध करून दिल्यास भारतीय संशोधक जगाच्या मागे राहत नाहो हे या संस्थेने दाखवून दिले आहे. या संस्थेचे जनकत्व जाते अर्था-तच डॉ. होमी भाभा यांना. त्यांच्या प्रेरणेनेच सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि

तिव्हाचें मुंबई सरकार यांच्या सहकार्याने १९४५ साली या संस्थेची स्थापना झाली १९५६ सालापासून भारत सरकारनेही या संस्थेच्या प्रगतीत रस घेण्यास सुरुवात केली.

मूलभूत संशोधनामधून त्या त्या विषयांची प्रगती होते. विज्ञान पुढे सरकते पण प्रत्यक्षात आपल्या देशाचा किंवा लोकांचा काही फायदा होतो का? अशी शंका श्रीमती इंदिरा गांधी यांनी यावेळच्या आपल्या भाषणात व्यक्त केली. मूलभूत संशोधन तर हवेच. पण त्याचा विकासक्षम देशातल्या दरिद्री लोकांना उपयोगही व्हायला हवा असाही मुद्दा त्यांनी मांडला आणि संशोधकांनी आपली व्यापक सामाजिक जबाबदारी ओळखून मूलभूत संशोधनातील काटेकोरपणा आणि सामाजिक उपयुक्तता यांचा समन्वय साधावा असे सुचविले.

आश्चर्य म्हणजे या प्रसंगी ज्या चार परदेशी संशोधकांनी भाषणे केली त्यांनीही संशोधनाची सामाजिक उपयुक्ततेशी मेळ साधण्याची गरज असल्याचे आवर्जून सांगितले. मूलभूत संशोधन आणि शास्त्रज्ञांची सामाजिक जबाबदारी हा जणू या परिसंवादाचा जाहिर न केलेला विषयच होता. संस्थेने आतापर्यंत केलेल्या कामाची आणि प्रगतीची मात्र सर्वांनी तारीफच केली.

मूलभूत संशोधन की उपयुक्त संशोधन (Fundamental Research or Applied Research) हा वाद जुना आहे. मूलभूत संशोधनाच्या जोरावरच सामाजिक दृष्टचा उपयुक्त शोध लागू शकतात. हे खरे आहे. पण म्हणून केवळ मूलभूत संशोधनावरच भर देणेही इष्ट नाही. मूलभूत संशोधनासाठीही प्रचंड खर्च लागतो. भारतासारख्या विकासक्षम देशाने केवळ मूलभूत संशोधनाची कास धरून कसे भागेल? तेव्हा मूलभूत संशोधन तर हवेच. पण समाजाला निश्चित फायदा करून देणारेही संशोधन हवे. या दोन्हींचा समन्वय साधला पाहिजे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने प्रधानमंत्र्यांनी या प्रश्नाला वाचा फोडून एक मोठी कामगिरी केली आहे. याबाबतीत त्यांनी एक सूचनाही अशी केली की संस्थेने एखाद्या विद्यापीठाचे काही विभाग चालविण्यासाठीच घ्यावे आणि अशा रीतीने दोन्ही संस्थांचा उत्कर्ष साधावा.

संस्थेचा शिक्षणाचा कार्यक्रम आहेच. शाळामधील विज्ञान शिक्षणाच्या कार्यक्रमात सुधारणा व्हावी या दृष्टीने संस्था आपणहून सतत प्रयत्न करीत आहे. टाटा इन्स्टिटयूटच्या सहकार्याने मुंबईतील शाळांच्या मुलांचे एक विज्ञानप्रदर्शन भरते. ते नेहमीच गाजते. संस्थेचे डायरेक्टर डॉ. एम. जी. के. मेनन यांनी सांगितले की संस्थेतील संशोधकांना आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव आहे आणि या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने संस्थाही प्रयत्न करीत आहे.

□

# ७२ चे नगारे

राजकीय आघाडीवर मुंबईतही नेहमीप्रमाणे शिमगाचाच मोसम चालू आहे. कमाल जमीनधारणाच्या प्रश्नावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमध्ये वादावादी सुरू आहे तर नव्या मुंबई काँग्रेसमध्ये एकूण कारभाराच्या बाबतीतच मारामारी सुरू आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. नाईक यांनी या 'सिलींग'च्या प्रश्नावर अशी भूमिका घेतली आहे की जमिनीवर सिलींग हवे. पण सिलिंगची मर्यादा ठरविताना त्याचा शास्त्रशुद्ध विचार हवा. जेणेकरून अर्थकारणावर व उत्पादनावर विपरीत परिणाम होता कामा नये, असे त्यांचे म्हणणे.

श्री नाईक यांच्या बोलण्याच्या आधारावरच खुद्द काँग्रेसमधल्याच काही कार्यकर्त्यांनी प्रचार सुरू केला आहे की मुख्यमंत्री श्रीमंत जमीनदारांच्या मागे आहेत. त्यांना सीलिंग खाली आणायला नको. या प्रश्नावरून श्री. नाईक आणि श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यात जोराचे मतभेद आहेत असाही प्रचार अर्थातच आहे.

या प्रचाराला महाराष्ट्र काँग्रेसच्या बड्या नेत्यांचाही हातभार लागतोच. किंबहुना तेच याबाबतीत पुढाकार घेताना दिसत आहेत. एका बड्या नेत्याने तर असेही सुचविले आहे म्हणतात की, श्री. नाईक यांची 'सिलींग' या विषयावरील मते पक्षाच्या धोरणाविरुद्ध आहेत आणि ते आपली मते जाहीर बोलून दाखवितात. म्हणून त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाचीच कारवाई करावी.

एका जबाबदार पण पक्षांतर्गत भांडणापासून अलग राहणाऱ्या जुन्या काँग्रेस कार्यकर्त्याला विचारले तेव्हा तो उद्गारला, 'अहो आता हे चालणारच. १९७२ जवळ आलं आहे ना! मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीसाठी तयारी चालू आहे. आता स्वतः मुख्यमंत्री नाईकांना सीलिंग खाली आणायलाच नको आहे हे काही खरं नाही आणि त्यांच्यावर टीका करणाऱ्या बड्या नेत्यांनाही सीलिंग खाली आणण्याची जोराची तहान लागली आहे असंही म्हणता येणार नाही. तेव्हा हे असं चालायचंच.'

हे १९७२ चे नगारे. हा झाला एक विषय. मारामारीसाठी आता असे अनेक विषय निघतील.

नव्या मुंबई काँग्रेसला तर मारामाऱ्यांसाठी विषयाचा कधीच तोटा नसतो. या शाखेत निर्मितीपासून लढाया चालू आहेत. लोकसभेच्या निवडणुकात मुंबईत पाचही नव काँग्रेसचे उमेदवार जिंकले. तेव्हापासून तरी नव-मुंबई-काँग्रेस एखाद्या जबाबदार पक्षाप्रमाणे वागेल असे वाटत होते. पण नाही.

परवा मुंबई काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी अध्यक्ष नामजोशी यांच्या कार्यपद्धतीबद्दल दिल्लीला जाऊन थेट संजीवय्याकडे तक्रार केली. याबाबत नव काँग्रेसच्या एका जुन्या सेवाभावी आमदाराने सांगितले, 'अहो नामजोशी दमदाटी करीत

असतील. पण ते प्रामाणिक आणि कष्टाळू तरी आहेत. ज्यांनी तक्रारी केल्या त्यांची नुसती नावं वाचा म्हणजे कळेल. १९७२ जवळ आलं आहे ना !'

एकूण काय की मुंबईत १९७२ चे नगारे आता जोराने वाजू लागले आहेत.

१९७२ च्या संदर्भात चर्चेचा आणखी एक विषय म्हणजे मुख्यमंत्रीपदाचा. श्री. वसंतराव नाईक यांनी आता आठ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भोगले. एवढा लांब काळ महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी राहणारे श्री. नाईकच. श्री. यशवंतराव चव्हाण दोनच वर्षे होते आणि श्री. मा. सं. कन्नमवार एकच. मुख्यमंत्री नाईकांची कारकीर्द अनेक दृष्टींनी गाजली. त्याचे मूल्यमापन आत्ताच करण्याची गरज नाही. मूळ प्रश्न असा आहे की, श्री. नाईक १९७२ नंतर मुख्यमंत्रीपदावर राहणार आहेत काय ?

स्वत: श्री. नाईक यांनी खाजगी संभाषणात अनेक वेळा बोलून दाखविले आहे की, त्यांना आता राजकारणाचा कंटाळा आला आहे. त्यापेक्षा शेती बरी. पुष्कळ झालं राजकारण. मागे तर अशा अफवाही उटत होत्या की, आपली टर्म संपण्यापूर्वीच नाईक राजीनामा देऊन राजकारणातून निवृत्त होणार. केंद्रीय मंत्रीमंडळात त्यांना जागा मिळणार आहे किंवा कुठली तरी परदेशी असाइनमेंट त्यांना मिळणार आहे. या तर नेहमीच्याच अफवा. श्री. नाईक अशा अफवांचा इन्कारही करीत नाहीत किंवा त्यांना दुजोराही देत नाहीत. परंतु खाजगी संभाषणात निवृत्तीविषयी बोलतात हे मात्र खरे आहे.

## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे दर

| | | | |
|---|---|---|---|
| पाच वर्षे : | १००–०० | वार्षिक : | २५–०० |
| तीन वर्षे : | ६०–०० | सहामाही : | १५–०० |
| दोन वर्षे : | ४५–०० | परदेशी जलमार्गे वार्षिक : | ४५–०० |

- २२ ऑगस्ट १९७० नंतरच्या ज्या वर्गणीदारांनी रुपये तीस वार्षिक वर्गणी पाठविली आहे त्यांची वर्गणीची मुदत तीन महिन्यांनी वाढवून घतलेली असून त्याप्रमाणे नोंदवहीत फेरबदल करण्याचे काम चालू आहे.
- नवीन वर्गणीची रक्कम शक्यतो ड्राफ्ट वा म. ऑ. ने पाठवावी. कार्यालयात रोख भरणा करण्यासही हरकत नाही. चेकनेच रक्कम पाठविणे सोयीचे वाटल्यास बँक कमिशन एक रूपया अधिक हिशोबी धरावे.
- चेक, ड्राफ्ट ' साप्ताहिक माणूस ' या नावावर पाठवावा.
- पत्रव्यवहार करताना आपला वर्गणीदार क्रमांक शक्यतो कळवावा.

परंतु राजकारणाचे दबाव एवढे विचित्र असतात की, १९७२ पर्यंत श्री. नाईक यांचे हे विचार कायम राहतीलच असे सांगता येत नाही आणि १९७२ मध्ये ते मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून पाय रोवून राहतील हे अगदीच अशक्य नाही. त्यांच्या उमेदवारीमुळे १९७२ च्या मुख्यमंत्र्यांच्या निवडणुकीला भलतीच चुरस चढणार आहे.

या जागेसाठी आणखी उमेदवार आहेत. श्री. बाळासाहेब देसाई. यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला असला तरी राज्यातील या सर्वोच्च पदावरून त्यांची नजर ढळली आहे असे म्हणता येणार नाही. श्री. चव्हाण दिल्लीला गेल्यापासून ते या जागेकडे चिकाटीने लक्ष लावून बसले आहेत हे काही फार मोठे रहस्य नाही. १९७२ मध्ये श्री. देसाई कदाचित अखेरचा प्रयत्न करून पाहतील.

दुसरे होतकरू आहेत मराठवाड्याचे श्री. शंकरराव चव्हाण. यांची अगदी बाजू पक्की आहे. नागपूर कराराप्रमाणे राज्याचे मुख्यमंत्रीपद मागच्या वेळीच मराठवाड्याला मिळायला हवे होते. ते मिळाले नाही म्हणून तेथील लोक नाराज आहेत. त्यामुळे यावेळी तर त्यांची बाजू अगदी भक्कम झाली आहे. स्वतः श्री. चव्हाणांची बाजूही आता समर्थ झाली आहे. मागे परळच्या पोटनिवडणुकीच्या वेळी कार्यकारी मुख्यमंत्री असताना त्यांनी आपली चांगलीच छाप पाडली होती. त्यांचा स्वतःच्या पाटबंधारे खात्यावर चांगला वचक आहे. खात्यातल्या बारीक-सारीक तांत्रिक बाबींचीही त्यांना खडा न् खडा माहिती आहे. अमुक एक गोष्ट त्यांना माहित नाही असे दिसत नाही. म्हणजे आपली गुणवत्ता त्यांनी सिद्ध केली आहे. मराठवाड्यातील आपले प्रतिस्पर्धी बाबुराव काळे हे आता लोकसभेवर निवडून गेले आहेत. त्यामुळे श्री. चव्हाणांचा मार्ग अधिकच सुकर झाला आहे.

या स्पर्धेमध्ये भाग घेणारे मंत्रीमंडळाचे आणखी एक सदस्य म्हणजे कृषिमंत्री श्री. प. कृ. सावंत श्री. सावंत हे कोकणचे प्रतिनिधी आणि मंत्रीमंडळाचे ज्येष्ठ सदस्य. कोकणची मंडळी त्यांना मुख्यमंत्रीपदासाठी उभे करण्यास उत्सुक आहेत. पण स्वतः श्री. सावंत तयार आहेत की नाही याची शंका आहे. काँग्रेसच्या दुफळीपासून एकंदर राजकारणाबद्दलच श्री. सावंत उदासीन दिसतात. पण मुख्यमंत्रीपद आवाक्यात येत आहे असे दिसताच ते मागे हटणार नाहीत यात शंका नाही. चव्हाणांच्या दिल्ली प्रयाणापासून श्री. सावंत हे देखील मुख्यमंत्रीपदाचे इच्छुक होतेच

मंत्रीमंडळाबाहेर तर अनेक इच्छुक आहेतच. त्यातले प्रमुख म्हणजे श्री. वसंतदादा पाटील. श्री. पाटील यांनीही आतापासूनच मोर्चे बांधले आहेत. श्री. पाटील हे अतिशय महत्वाकांक्षी आहेत.

परंतु या स्पर्धेचे पंच श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या मनात काय आहे कुणास

पृष्ठ ६४ वर

# पुरीते डाक्का



वाऱ्याच्या मंद झुळकीबरोबर थरारणारा जलाशय, त्यात पडलेले राजवाड्याचे नयनमनोहर प्रतिबिंब–मध्येच हालणारी नारळाची रोपं, लांब दूर जगन्नाथाच्या मंदिरातील घंटानाद. सारंसारं विसरून दंग झालो. भांडवलशाहीने मानव जातीला विज्ञान आणि तंत्रज्ञान दिले खरे. पण सौंदर्य आणि कलेची अभिरुची दिली ती मात्र सरंजामशाहीनेच–

...कॉम्रेड, अवामी लीगच्या विजयानंतरच आम्ही पाकिस्तानला जायचे ठरविले. पण त्यावेळी निवडणुकीची गडबड होती ना–

खरं म्हणजे त्यांच्यातला मेन हीरो होता क्रिष्ण किशब राय पण भाषेच्या अड-

# इतकी मूर्ख लढाई मोगलांचे नेभळट सरदार देखील कधी लढले नव्हते.

## अनिल बर्वे : लखांक दोन

चणीमुळे सुभाष चक्रवर्तीकडे प्रवक्त्याचे काम आले–त्यांची माझी ओळख मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आगरताळा कचेरीत झाली. तिथे ते स्टडीसर्कलसाठी जमले होते. सुभाष चक्रवर्ती–क्रिष्ण किशब राय–भुपोती भौमिक–रतन भद्रो. विशी बावीशीतील ही चौकडी आगरताळाच्या महाराजा वीर विक्रम कॉलेजमधली. चौघेही स्टुडंट फेडरेशनचे क्रियाशील कार्यकर्ते आणि सी. पी. एम्. चे पाठीराखे–

...' निवडणुका संपल्या. दोन्ही सीटस् आम्ही–सी. पी. एम्. ने जिंकल्या. त्यामुळे मुडही चांगला होता आणि मुख्य म्हणजे तोपर्यंत आम्हा चौघांच्या गाठीला शे–सव्वासे रुपयांची शिवंदी लागली होती. तेव्हा घरातल्या लोकांच्या न कळत तेवीस मार्चला पायीपायीच आम्ही पाकिस्तानकडे कुच केले. अर्थातच विदाउट पासपोर्ट '–सुभाष चक्रवर्ती सांगत होता.

–इथून खाली बारामैल दक्षिणेला बिरुलगडला भारत–पाक सरहद्द सुरू होते. तिथे हद्द अशी धड आखलेली नाही आणि पहारेही गलथानच. दोन्हीकडचे खेडूत निर्धास्तपणे ये-जा करीत असतात. तरीपण आम्ही मात्र सावधगिरी म्हणून सूर्यास्ताची वाट पाहिली. संध्याकाळच्या काळोखात दिवे लागणीला सरहद्द पार केली. एक कामचलाऊ नकाशा आम्ही पैदा केला होता. त्याचे आधारे रात्री अकरा-साडेअकरा वाजेपर्यंत आमची पायपीट चालली होती. अनोळखी आणि त्यात दलदलीचा प्रदेश. त्यात गवत आणि डासांचा त्रास. मध्यरात्रीच्या सुमारास 'सालढानदी' नावाचे खेडे लागले. तिथे कोणी भुपोती भौमिकचे दूरचे नातलग राहतात. त्यांचेकडे रात्री पुरता जेमतेम विसावा घेऊन पहाटेच कोमील्लाची वाट तुडवायला सुरुवात केली.

कोमील्लाच्या वेशीवर आलो तेव्हा चांगलेच फटफटले होते. कोमील्ला सरहद्दीपासून चाळीस मैलांवर आहे. आम्ही आडमार्गाने आत शिरल्याने जास्त जवळ पडले. शहरात शिरतो तर विजेचे खांब–ट्रसेस–गाड्या–मोटारी–सायकली जिकडे तिकडे

'विप्लवी बांगलाचे' झेंडे फडफडत होते. असहकाराच्या चळवळीने चांगलाच जोर धरला होता. साऱ्या शाळा नि इमारती काळ्या झेंड्यांनी झाकून गेल्या होत्या. शहरात सैनिक आणि पोलीस शोधून सापडत नव्हते. सर्वत्र अवामी लीगचे बॅचेस लावलेले स्वयंसेवक फिरत होते. 'मायनामोती 'मधल्या आपल्या बराकीतून बाहेर पडायला सैनिक धजावत नव्हते. 'मायनामोती ' हे कोमील्ला कॅन्टोनमेन्टचे नाव. सारे व्यवहार थंड पडले होते. पोटात तर नुसती आग पडली होती. भात-मासळी मिळवता मिळवता नाकी दम आला. गावातले तंग वातावरण पाहून आम्ही काढता पाय घेतला. थेट रेल्वे स्टेशन गाठून चितगावला जाणारी 'ग्रीन ॲरो एक्सप्रेस' पकडली.

कोमील्ला शहर आणि वाटेतले प्रत्येक स्टेशन 'जय बांगला 'च्या आणि अवामी लीगच्या भित्तीपत्रकांनी भरून गेले होते.

– पूर्व बांगला स्वाधीन करो–सेना पाहीने को खतम करो.'

–'वीर बंगाली अस्त्र धरो–बांगला देश स्वाधीन करो.'

–'टीक्का खाँ को जला दो–याह्या भुट्टो ध्वंस करो.'

या घोषणांनी झाडून साऱ्या भिंती चितारल्या गेल्या होत्या. सारे वातावरण 'जय बांगला 'च्या एकाच कल्पनेने भरून गेले होते.

चितगाव आले आणि कुठे आगीतून उठून फोफाट्यात येऊन पडलो असे झाले. स्टेशनाबाहेर आलो तर सारे रस्ते बंद झालेले. वाहतुक विस्कळीत झालेली. अवामी लीगच्या कार्यकर्त्यांची सशस्त्र मिरवणुक निघालेली होती. सात एप्रिलला शेख मजीबुर रेहमान यांनी 'कोणत्याही लढ्यास तयार राहण्याची' तयारी करण्याचा आदेश दिला होता. कदाचित त्याचीच ही फलनिष्पत्ती असावी. सर्वांकडे रायफली–बंदुका होत्या. मिरवणुक अत्यंत लष्करी शिस्तीत चालली होती–संचलनच ते !

गावातले एकंदर वातावरण ठीक नाही याची आम्हाला लगेच कल्पना आली आणि रात्रीच्या गाडीने डाक्क्यास जावयाचे आम्ही ठरवले. संध्याकाळी सहा-साडे-सहाला अचानक धावाधाव सुरू झाली. जमावाचे थवेच्या थवे गोदीच्या दिशेने चालले होत. आम्ही जमावात सामील झालो.

संध्याकाळी साडेपाच वाजता दारुगोळ्याने लादलेले एक लष्करी जहाज गोदीला लागले. गोदी कामगारांनी दारुगोळा उतरवून घ्यायला नकार दिला आणि अवामी लीगच्या कार्यकर्त्यांना माहिती पुरवली. बातमी वाऱ्यासारखी शहरात पसरली आणि जमावच्या जमाव गोदी बाहेर जमू लागले. आम्ही पोचलो तेव्हा पंधरा वीस हजाराचा जमाव गोदीबाहेर धिक्काराच्या–निषेधाच्या घोषणा देत होता. जहाजातील माल उतरवून घ्यायचा नाही असा लोकांचा पक्का निर्धार झाला होता. जमाव जसजसा वाढू लागला आणि पांगण्याची चिन्हे दिसेनात, तेव्हा लष्कराने मशीनगनच्या फैरीच्या फैरी झाडण्यास सुरुवात केली. लष्कराच्या त्या अचानक

आक्रमक पवित्र्याने लोकांची धावाधाव सुरू झाली. त्या गोळीबारात किमान शे-दीडशे लोक मारले गेले असावेत.

लष्कराच्या गोळीबाराने गावात वातावरण संतप्त बनत चालले होते. रात्रीच्या सुमारास लष्कराच्या निषेधार्थ आणि गोळीबारात मृत झालेल्यांच्या स्मरणार्थ अवामी लीगने मशाल मिरवणूक काढली. त्या मिरवणुकीत हजारो लोक सामील झालेले होते मशालींच्या उजेडानी सारे शहर तांबुस प्रकाशात न्हाऊन निघाले होते. तेवढ्या मशाली—तेवढी आग रावळपिंडीच्या सत्ताधाऱ्यांना जाळून खाक करण्यास पुरेशी होती.

संध्याकाळच्या गोळीबाराने आणि गावातल्या मशाल मिरवणुकीने लष्करी अधिकारी सावध झाले. परिस्थिती हाताबाहेर जात आहे हे पाहून 'बंगाल रेजिमेंटला (बंगाल्यांविषयी लष्करी अधिकारी चांगलेच संशयी बनले होते.)' 'ड्युटी संपली आहे तेव्हा शस्त्रास्त्रे शस्त्रागारात जमा करा' असा हुकूम देण्यात आला. त्या हुकमातला गर्भितार्थ समजून दोन हजार सैनिकांनी आपल्या बिछान्यात बंदुका लपवून छावणीतून पळ काढला व शहर गाठले. सुमारे चार हजार जवानांनी मात्र रायफली जमा केल्या. दीड-दोनच्या सुमारास कँटोनमेंटमध्ये गोळीबार होऊ लागला. पंजाब रेजिमेंट आणि बलुची रेजिमेंटने या निशस्त्र 'गद्दार' बंगाली जवानांना गोळ्या घालून ठार केले. रातोरात ही चार हजार प्रेते लष्करी गाड्यात घालून 'कर्णफुलीच्या' प्रवाहात फेकून देण्यात आली.

लष्कराने चालवलेल्या या हत्याकांडाची खबर ताबडतोब बाहेर पाठवण्यात येऊ लागली. सकाळ झाली तेव्हा ईस्ट पाकिस्तानी रायफल्सचे जवान तुकड्या तुकड्यांनी शहरात येऊन दाखल होत होते. काही वेळातच ईस्ट पाकिस्तान पोलीस-सुद्धा सामील होऊ लागले. आणि 'अन्सार' तर झुंडीझुंडीने येत होते. सकाळी नऊ वाजता अवामी लीगच्या कार्यकर्त्यांनी गावातली शस्त्रास्त्रांची दुकाने लुटण्यास आरंभ केला. दहाचे सुमारास काही लष्करी गाड्याही लुटण्यात आल्या. दहा साडेदहाचे सुमारासच प्रत्येक तरुणाला रायफल आणि पंचवीस पंचवीस बुलेटस् वाटण्यात आल्या. इ. पी. आर, इ. पी. पी, सच्चा सेवक, अन्सार, अवामी लीगचे कार्यकर्ते मिळून सुमारे वीस हजाराची 'मुक्ती फौज' आता एकत्र आली.

अकराचे सुमारास मुक्ती फौजेने कॅन्टोनमेंटला वेढा घातला. लष्करानेही छावणी-मध्ये आपले मोर्चे बांधलेले होतेच. बारा साडेबाराला दोन्ही पक्षात गोळीबाराला सुरुवात झाली. सारा दिवस-रात्र गोळीबार चालला होता. पंचवीस-सव्वीस-सत्ता-वीस मार्च अहोरात्र गोळीबार चालूच होता. अठ्ठावीस तारखेला चितगावच्या युद्धाची व्यूहरचना आमच्या स्पष्ट लक्षात आली. रेस्ट हाऊस, सिटी कॉलेज, कोतवालीमध्ये मुक्तीसैन्याने आपली ठाणी उभारली होती तर लष्कर फक्त कॅन्टोन-मेन्टमध्येच पाय रोवून होते. चकमकींना सुरुवात झाली. त्याच रात्री—पंचवीसच्या

रात्रीच लष्कराने गोदीतील इमारती पेटवून दिल्या आणि गोदीतील यंत्रसामुग्री उध्वस्त करून टाकली. गोदीतल्या ज्वाळा मैल मैल लांबून दिसत होत्या.

या धुमाळीने रेल्वे बंद झाली होती. आमचा जाण्याचा मार्ग खुंटला होता म्हणून सिटी कॉलेजमध्येच आम्ही मुक्काम ठोकला. गावात मुक्तीफौज आणि लष्कर यांच्यात युद्ध सुरू होताच अर्धे शहर रिकामे झाले. शक्य होते ते आपल्या कुटुंबियांना घेऊन खेड्याकडे पळ काढीत होते. बांगला देश संग्राम परिषदेने शहराच्या सुव्यवस्थेकडे काहीच लक्ष न दिल्याने शहरात अंदाधुंदी माजली. सारा बाजार बंदच होता व मागल्या दरवाजाने भरमसाठ भाववाढीने काळाबाजार चालू झाला होता.

चार दिवस झाले तरी वेढा उठत नाही हे पाहून लष्कराने आरमार आणि हवाई दलाची मदत मागितली. कॅन्टोनमेन्टच्या पिछाडीलाच समुद्रकिनारा होता. 'बाबर' आणि 'जहांगीर' ही दोन लष्करी जहाजे तेथे येऊन नांगरली गेली.



*Sole SeilnlgAgents–*

**Fargo Saies Agenele.**

255 / 56, A to Z Industrial Estate,
Lower Parel, BOMBAY 13

आणि एकोणतीसच्या सकाळीच 'बाबर' जहाजावरून तोफांचा भयानक भडीमार शहरावर करण्यात येऊ लागला. त्या भडीमाराने कित्येक इमारती जमीनदोस्त होऊ लागल्या. दुपारी दोनचे सुमारास लष्कराने हेलीकॉप्टरमधून सिटी कॉलेजवर मशिनगनचा मारा सुरू केला. आम्ही त्या वेळी सिटी कॉलेजमध्येच होतो. जीव मुठीत धरून आम्ही पळत सुटलो आणि एका गटारात उड्या मारल्या – खरचटणे आणि पाय मुरगळणे या पलिकडे आम्हाला काही इजा पोचली नाही. परंतु या माऱ्याने सिटी कॉलेजमधील मुक्तीफौजेच्या लष्करी केंद्राची पूर्ण वाताहात झाली.

दुपारी दोन वाजता शहरावर तीन सेबरजेटस् घिरट्या घालू लागली. त्यांचे लक्ष्य काळुघाटावरील 'बेतार केंद्र' या रेडीओ केंद्रावर होते. तीनच्या सुमारास वेढ्यावर मशीनगनचा मारा सेबरजेटस्नी सुरू केला त्याच वेळी काळुघाटावरील रेडीयोकेंद्रावर पाच बॉंब टाकले. पण त्यापैकी चार डॅमेज झालेले होते. फक्त एकाचाच स्फोट झाला. पण त्या एकाच बॉंबने काळुघाटावरील रेडिओ केंद्राचा बळी घेतला.

आरमाराच्या माऱ्याने आणि हवाईहल्ल्याने मुक्ती फौजेचे फार मोठे नुकसान झाले. तरीपण त्यांचे मनोधैर्य चांगले होते. वेढा जरा देखील ढिला पडला नव्हता. या दरम्यान पूर्व पाकिस्तानात सर्वत्रच सशस्त्र लढाया सुरू झाल्या होत्या. लष्कराला काहीही करून चितगाववर पूर्ववत वर्चस्व स्थापन करणे आवश्यक झाले होते. तेव्हा लष्कराने एक गनिमी चाल केली.

तीस मार्चला सकाळी कॅन्टोनमेन्टमध्ये शरणागतीचा पांढरा ध्वज फडकावला गेला. कॅन्टोनमेन्ट कमांडरने माइकवरून शरण येण्याची आणि शस्त्रास्त्रे टाकून परत जाण्यासाठी दोन तासांची मुदत मागितली. 'बाबर' व 'जहांगीर' जहाजावरून लॉंचेस कॅन्टोनमेन्टनकडे येऊ लागल्या. मुक्तीफौजेला वाटले की लष्कर परत जात आहे. पण त्या लॉंचेस दारूगोळा घेऊन येत होत्या. पांढऱ्या झेंड्याने आपले काम पूर्ण केले. मुक्तीफौज गाफील बनली. वेढा ढिला पडला आणि अचानक पुन्हा लष्कराने जोरदार हल्ला करून, बाहेर येऊन चाल केली. लष्कराच्या या माऱ्याने मुक्तीफौजेची दे माय धरणी ठाय पळापळ झाली. सहा दिवसांचा वेढा संपूर्ण मोडून काढला गेला.

वेढा मोडून गेला तरी कोर्ट बिल्डिंगमध्ये त्रिदीद नारायण व काशीमराजचे शिपाई मोर्चे बांधून होते. त्रिदीद नारायण व काशीमराज हे चितगाव हिलट्रॅक्चे राजे. त्यांचे व्यतिरिक्त सिटीकॉलेज–रेस्टहाऊसमध्ये अवामी लीगचे स्वयंसेवक होते तर कोर्ट बिल्डिंगमध्ये ईस्ट पाकिस्तान रायफल्सचे जवान होते. ३१ मार्च हा संपूर्ण दिवस स्मशानशांततेत गेला. उभय बाजू पुन्हा जुळवाजुळव करण्यात गढून गेल्या होत्या.

शहरात अन्नधान्याचा भयंकर तुटवडा पडला होता. दोन दिवसात आम्ही

गटाराबाहेर पडू शकलो नव्हतो. तीन दिवसात आमच्या पोटात अन्नाचा कण गेला नव्हता. तहानसुद्धा त्या गटारातल्या पाण्यावर भागवावी लागली होती. लष्कर किंवा मुक्तीफौजा कुणीच जनतेकडे लक्ष द्यायला तयार नव्हते. अखेर दुपारच्या सुमारास भुकेल्या लोकांचे तांडेच्या तांडे बाहेर पडले आणि बंदरात नांगरलेली ब्रह्मी व जपानी अशी दोन्ही जहाजे त्यांनी लुटली.

एप्रिलचा पहिला दिवस उजाडला आणि सकाळपासूनच दोन्हीकडच्या हालचालींना सुरवात झाली. नागरिकांनी भीतीने खिडक्या दारे बंद करून घेतली. आम्हीसुद्धा पुन्हा 'आमच्या गटाराचा' आश्रय घेतला. सकाळी सकाळीच पंजाब रेजिमेंटच्या जवानांनी 'कमिशनर हील'चा ताबा घेतला व तिथे आपले मोर्चे बांधले आणि बारा वाजण्याच्या सुमारास मॉर्टर आणि रॉकेटचा जोरदार हल्ला शहरावर चढवला. या हल्ल्याचे मुख्य लक्ष्य होते कोर्ट बिल्डींग. टेकडीवजा उंचवट्यावर उभ्या असलेल्या त्या शानदार इमारतीची मॉर्टरच्या भडीमाऱ्याने चाळण उडाली. तीन वाजता मुक्तीफौजेने 'कोर्ट बिल्डिंग' मधून माघार घेतली.

मुक्तीसैनिक आता अस्वस्थ होते. त्यांनी एकही काडतुस उडवले नाही तेव्हा मुक्तीफौज निघून गेली या कल्पनेने पंजाब रेजिमेंटचे जवान शहरात धान्य नेण्यासाठी येऊ लागले. आणि पिसाळलेल्या मुक्तीफौजेने अचानक पंजाब रेजिमेंटवर हल्ला चढवला. बदल्याच्या भावनेने पिसाट बनलेल्या मुक्तीफौजेने किमान हजार पंजाबी सैनिक कुत्र्यासारखे गोळ्या घालून ठार मारले आणि लष्कराचा नवा हल्ला व्हायच्या आधीच पाचच्या सुमारास शहरातून माघार घेतली.

आठवड्याच्या युद्धानंतर चित्तगाव पुन्हा लष्कराच्या ताब्यात आले. लष्करी गाड्यामधून मशीनगनधारी सैनिकांची गस्त शहरात सुरू झाली. महत्त्वाच्या चौकाचौकातून रणगाडे उभे राहिले. साऱ्या शहरात चोवीस तासाकरता कर्फ्यू ऑर्डर जाहीर झाली. आम्ही विषण्ण मनाने बाहेर पडलो—चालताना पावलापावलाजवळ प्रेते पडली होती. कोसळलेल्या इमारतीचे अवशेष हृदय भग्न करून टाकत होते—शहराचा जवळजवळ अर्धा भाग जमीनदोस्त झाला होता—निदान पंधरा ते वीस हजार माणसे मारली गेली असावीत.

—आता शब्द बोलायचे थांबले होते—डोळ्यातले पाणी बरेच काही सांगत होते.

जर चितगाव 'लेनिनग्राद'सारखे लढवले गेले असते तर? मनापुढे प्रश्न पडला—तर आशियाचा इतिहासच बदलला गेला असता. मुक्तीसैनिकांचे कौतुक करण्यात अर्थ नव्हता. कारण कौतुकाचा भाग लढ्याच्या पहिल्या टप्प्यात असतो पुढे नव्हे आणि मुक्तीफौजेचे मूल्यमापनच करायचे झाल्यास इतकी मूर्ख लढाई-मोगलांचे नेभळट सरकार देखील कधी लढले नव्हते.

स्वातंत्र्याची ज्वलंत भावना आणि लोकांमधील असंतोषच केवळ विजय मिळवत नाही तर योग्य आणि कुशल असे नेतृत्व चळवळीस लागते. जेव्हा टिकाऊ आणि

धंदेवाईक लष्कराशी लढा द्यावा लागतो तेव्हा तर अत्यंत उच्च दर्जाचे लष्करी नेतृत्व आवश्यक असते. व्हिएतनामी जनता लढली कारण हो ची मिन्हचे नेतृत्व होते आणि 'जीॲप' सारखा जागतिक किर्तीचा सेनापती त्यांचेजवळ होता. क्यूबा स्वतंत्र झाला कारण 'चे गुवेरा' सारखा गनिमी युद्धाचा खंदा सेनापती त्यांचे जवळ होता. चिनी जनतेने चँग के शेकच्या फौजेचा निःपात केला कारण त्यांचे जवळ 'माओचे' नेतृत्व होते. परंतु बांगला देशाच्या जनतेकडे नेमके हेच नेतृत्व नाही.

शिवाजी अथवा राणा प्रतापाचा अपवाद सोडला तर भारताच्या इतिहासात केवळ लष्करी नेतृत्वाच्या अभावी स्वातंत्र्ययोद्ध्यांनी नेहमी पराभव पत्करला आहे. १८५७ चे बंड अपयशी झाले कारण लष्करी नेतृत्वाचा अभाव. नबाब सिराज उद्दौला शूरासारखा लढला पण प्लासीची लढाई हरला. त्याला कारण केवळ मीरजाफर नव्हे तर लष्करी डावपेचातला कमकुवतपणा. इतिहासाच्या या धड्यांपासून तरी भारतीय उपखंडातील जनता काही शिकणार आहे का?

पंधरा वीस हजारांची मुक्तीफौज असताना, खेडी व्यापून दळणवळण तोडून, गनिमी छापे घालून लष्कराला हतबल करता आले असते व तेवढ्या काळात मुक्तीफौजेतल्या शिकाऊ शिलेदारांना 'ट्रेंड' करता आले असते. पण जवळ बंदुकांशिवाय काहीही नसताना मशिनगन–मॉर्टर–विमाने–वायरलेस सेट–आरमार सज्ज प्रशिक्षित सेनेशी लढून मुक्तीफौजेने काय मिळवले! अर्ध्या शहराचा विध्वंस आणि पंधरा हजार देशभक्तांचा नाहक बळी.

मला कलकत्याच्या कॉफी हाऊसमधील नक्षलवादी मित्राचे शब्द आठवतात– 'जर लढाई हरले तर बांगला देश चळवळीला मोठा सेटबॅक बसेल'. 'वेडात धावले वीर मराठे सात' या आवेशापेक्षा मुक्ती फौजांनी माओची 'प्रोट्रॅक्टेड वॉर' वरची काही पुस्तके चाळली असती तर?

—It is a tale of our Long March. सुभाष चक्रवर्तीने आपला अनुभव सांगून पूर्ण केला. जड आणि सुन्न झालेल्या डोक्याने मागे वळून पाहिले– भग्न झालेल्या चितगावच्या इमारतींवर लष्करी पहारे बसले होते. राजमार्गावरील स्वातंत्र्य योद्ध्यांची प्रेते फरपटली जात होती. कमिशनर हीलवरचा पाकिस्तानी ध्वज रात्रीच्या काळोखातही खदाखदा हसत होता.

(क्रमशः)

परदेश वार्ता

सु. ल. सोमण

# सिलोन

## धगधगत्या आशियातलं नवं प्रश्नचिन्ह !

आशिया सध्या धगधगत आहे. आशियातली दारिद्र्यानं गांजलेली जनता, बड्यांचं राजकारण आणि पददलितांच्या 'उत्कर्षार्थ' राबावल्या जाणाऱ्या कम्युनिस्टांच्या 'योजना' ह्यातनं आशिया पेटत आहे. व्हिएतनाम अद्यापही रोज बाँब-हल्ले पाहात आहे. कंबोडियाचीही स्थिती फारशी वेगळी नाही. उत्तर-दक्षिण कोरियाच्या एकत्रिकरणाच्या योजना पुढे येतात. त्याचमुळी अशा पद्धतीने की कोरियनांची एकत्रिकरणाची स्वाभाविक इच्छाच लाथाडली जावी. व्हिएतनाम-कंबोडियानंतर आपला तर नंबर लागणार नाही ना, अशा भितीतून, चीनच्या भितीतून, सिंगापूर-मलेशिया-ब्रिटन-ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंड-इ. आशिया संरक्षण करार जन्माला आला. सुवेझच्या पूर्वेकडील सर्व लष्करी हालचाली बंद करण्याच्या मजूर-मंत्रिमंडळाच्या घोषणेवर हुजुर प्रधानमंत्री हीथ ह्यांनी अलिकडेच हिंदी महासागराचं निमित्त करून बोळा फिरवला होता. त्यांनी, ह्या नव्या लष्करी करारामुळे आणखी एक पाऊल पुढे टाकलं आहे ! हिंदी महासागरातल्या रुसो-अमेरिकन आरमारी स्पर्धेचा गदारोळ अद्याप तरी कमी झालेला नाही ह्या साऱ्यांवर कडी याह्याशाहीनं बांगला देशातल्या अमानुष अत्याचारांनी केली आहे !

आशियातलं वातावरण असं डाव्या उजव्यात तडफत असतानाच, सिलोनच्या छोट्याश्या भूमीवर असंतोषाचा परिपाक बंडात झाला. 'ची ग्युवारिस्टस' ह्या आत्यंतिक डाव्या संघटनेनं हातात शस्त्र घेतलं. प्रस्थापित राजसत्ता, प्रस्थापित समाजव्यवस्था उलथून पाडण्यासाठी ह्या संस्थेचे पस्तीस हजाराहून अधिक सदस्य कटिबद्ध झाले. पंतप्रधान श्रीमती सिरिमावो बंदरनायके ह्यांना मृत वा जिवंत पळवून न्यायचं, राज्ययंत्रणा ताब्यात घ्यायची अशा योजना बंडखोरांनी आखल्या

होत्या. बंडखोरांविरुद्धच्या तब्बल आठ दिवसांच्या कारवाईनंतर, भारत-ब्रिटन-अमेरिका-रशिया ह्यांच्याकडून मिळालेल्या मदतीच्या जोरावर सध्यातरी लंका-शासनाला परिस्थितीवर संपूर्ण ताबा मिळवता आला आहे. रेल्वे चालू झाल्या आहेत. बस वहातूक, टपाल वितरण पुन्हा सुरू झालं आहे. कोलंबो-त्रिकोमाली हा राजरस्ताही, सर्व अडथळे दूर करून, सुरू केला गेला आहे.

परंतु ही स्थिती किती दिवस टिकते ते पहावं लागेल. बंडखोर तरुणांनी, सैनिकांशी संघर्ष टाळून, लुटालूट, मारामाऱ्या ह्याद्वारे आपला लढा अजूनही चालू ठेवला आहे म्हणून मी असं म्हणतो असं नाही. परंतु सशस्त्र उठावाला कारणीभूत ठरलेली पार्श्वभूमी बघितली तर मात्र, सैनिकी बळावर प्रस्थापिलेली ही शांतता कितपत टिकेल ह्याविषयी शंका वाटू लागते. नक्षलवादी पद्धतीच्या ह्या संघटनेचे सारे सदस्य तरुण आहेत. शिक्षित बेकार आहेत. बहुसंख्यांना भारत-अमेरिका-ब्रिटनविषयी तिटकारा आहे. पाश्चात्यांपेक्षा, सिंहली संस्कृतीशी त्याचं अधिक जिव्हाळ्याचं नातं आहे. नोकरीतल्या तामिळी वर्चस्वाची, उद्योगधंद्यातल्या पाश्चिमात्यांच्या वरचष्म्याचा म्हणून त्यांना राग आहे. भयानक बेकारी, भिकार शिक्षण, आत्यंतिक दारिद्रय, वाढती महागाई ह्या वणव्यात सापडलेल्यांच्या दृष्टीस पडल्या त्या वातानुकुलित 'ब्युक' गाड्या ! आणि कानावर पडले, वाचले गेले ते माओचे विचार! ! किम् उल् संगचं चरित्र ! ! ! सिलोनच्या तेवीस वर्षांच्या स्वातंत्र्यात हीच परिस्थिती कायम राहिली. किंबहुना अधिक स्फोटक बनत गेली. १९७० च्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी 'Crush Capitalists Imperalists" च्या घोषणांनी फार मोठा तरुण श्रीमती बंदरनायके व त्यांच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीकडे आकर्षित झाला परंतु निवडणुकातल्या अभूतपूर्व विजयानंतर आघाडीनं दिलेली आश्वासनं श्रीमती बंदरनायके सरकारला पाळता आली नाहीत. विदेशी बँकांचं राष्ट्रियीकरण शासन करू शकलं नाही. तामिळी, ब्रिटीश व अन्य विदेशीयांच्या चहा, रबर मळ्यांचंही आश्वासित राष्ट्रियीकरण झालं नाही ! काही नवीन उद्योग कोलंबो त्रिकोमाली कटुनायके परिसरात आणले गेले खरे, परंतु त्यावेळीही सिलोनच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष झालं. हे कारखाने सुरू ठेवण्यासाठी प्रचंड आयाती सुरू झाल्या. अनेक स्थानिक व्यवसाय सरकारी नियंत्रणाखाली गेले नि त्यात गलथानपणा आला. प्रचंड तूट आली. ह्या साऱ्याचा परिणाम एवढाच झाला की, आज सिलोनचा आर्थिक डोलारा सर्वस्वी पाश्चात्य मदतीवर, कर्जावर, अन्नधान्यांनी भरून येणाऱ्या बोटीवर अवलंबून आहे !

उत्तर कोरिया व पेकींग ह्यांनी आगीत तेल ओतून ती भडकावली असेलही ! त्यासाठी आज कोरियन वकिलात बंद झाली आहे. पेकींगवादी मंडळी तुरुंगात डांबली गेली आहेत. परंतु ही सारी मंडळी निमित्तमात्र झाली आहेत असं मी म्हणेन. सिलोनमधल्या आत्यंतिक आर्थिक डबघाईतनं ही ठिणगी पडली असंच

म्हटलं पाहिजे. तिचं वणव्यातलं रूपांतर सैनिकी भडिमारामुळे सध्या शमलं असलं तरी ठिणग्या विझल्या आहेत असं मानता येणार नाही. सद्यःस्थितीत, सिलोनची मदार पश्चिमी राष्ट्रांवर आहे हें मानलं पाहिजे. ह्या राष्ट्रांकडून मिळणाऱ्या मदतीचा असंतोष दडपण्यासाठीच केवळ उपयोग न करता जर सिलोनी शासनानं सिलोनी-आर्थिक अरिष्टावरही घाला घालण्यासाठी उपयोग केला, तर श्रीमती बंदरनायके अद्यापही आत्यंतिक डाव्यांना आवर घालू शकतील. असं झालं नाही तर सिलोनमधले लक्षावधी बेकार (सव्वा कोटींपैकी साडेसात लक्ष आज सिलोनमध्ये बेकार आहेत!) पुनः पुन्हा अशा तऱ्हेच्या उठावाचा आधार घेतल्यावाचून राहणार नाहीत! पूर्व बंगालमधला वणवा लौकर शमला नाही. तर, ते तिथल्या पेकींग-वाद्यांच्या पथ्यावर पडेल असं मी मागच्या वार्तापत्रात म्हटलं होतं. तसं घडलं तर, सिलोनमधल्या डाव्यांनाही प्रोत्साहन मिळेल! त्यावेळी आजच्याप्रमाणे संघर्ष सहजी चिरडता येणार नाही हे मात्र नक्की!! ◻

## कम्युनिस्ट चीन : सहजीवनाला मान्यता ?

गेल्या आठवड्यात चीननं जगाला आणखी एक धक्का दिला. राजकीय दृष्ट्या अमेरिका, रशिया दोघांनाही शह देऊन, कम्युनिस्ट चीननं पश्चिम पाकिस्तानी राजवटीला संपूर्ण पाठिंबा जाहीर केला. पूर्व बंगाल पेटताच राहिला तर फायदाच होईल. तसं होतानाच ह्या पाठिंब्यामुळे प. पाकिस्तानवरही पकड कायम ठेवून रशिया भारतावर दडपण ठेवता येईल ही ती निती! पण ह्याच वेळी, म्हणजे अमेरिका-भारत ह्यांना शिव्यांची लाखोली वहात असतानाच, पेकिंगने 'पिंगपाँग–डिप्लोमसी'चा वापर करून जगभर उलट सुलट तर्क-वितर्कांची धमाल उडवून दिली. जपानमधल्या आंतरराष्ट्रीय पिंगपाँग स्पर्धांना उपस्थित राहिलेल्या अमेरिका ब्रिटन, कॅनडा, इटाली आणि पाच राष्ट्रांच्या चमूंना चीन-भेटीचं आमंत्रण मिळालं. अमेरिकन क्रीडापटूंबरोबर पंतप्रधान चौ एन लाय ह्यांनी दोन-तीन तास दिल-खुलास चर्चा केली. १९४९ पूर्वीच्या चिनी–अमेरिकेचा गौरवपूर्ण उल्लेख केला गेला. चिनी चमूंना अमेरिका भेटीचं आमंत्रण दिलं गेलं. ह्याचवेळी चीनबरोबरच्या व्यापारावरील निर्बंध शिथिल करण्याची घोषणा प्रे. निक्सन ह्यांनी केली. ह्या सूचनेचंही चिनी गोटात स्वागत झालं. अमेरिकन विचारवंतांची, तर परस्परात होऊ शकणाऱ्या व्यापाराची आकडेवारीही तयार झाली. त्यांच्या मते, पुढील ५।६ वर्षात अमेरिका चीनला ५०० ते ६०० कोटी डॉलर्सचा माल निर्यात करील तर जवळजवळ २५० कोटी डॉलर्सची आयात होईल!

अही-नकुलवत् संबंध! साम्राज्यशाही, विस्तारवादी, जुलमी वगैरे विशेषणांनी

एकमेकांवर शिव्यांची खैरात करणारी ही दोन राष्ट्रं ! ! एकाएकी ह्यांना संबंध सुधारण्याची एवढी आवश्यकता का भासावी ? चीनविरुद्ध युरोप ते विएतनाम कोरियापर्यंत सर्वत्र संरक्षकाची भूमिका वठवणाऱ्या अमेरिकेला एकाएकी चीनशी संबंध प्रस्थापित करावेसे वाटू लागावेत ? की परस्परांना सहजीवनाचा मार्ग मान्य झाला म्हणून एकमेकांशी जुळवून घ्यावंसं वाटलं ? कुठल्या कारणांनी जागतिक राजकारण एकाएकी हे आगळं वळण घेऊ पाहात आहे ? चीननं हीच संधी साधून, जपान प. जर्मनी, ब्रिटन आदि 'भांडवलशाही' राष्ट्रांशी वाढते व्यापारी संबंध ठेवण्याची धडपड का चालवली आहे ? १९४९ पासून तुटलेल्या ब्रिटनबरोबरच्या टेलिफोन-दळणवळणाचं पुनरुज्जीवन पुन्हा ह्याचवेळी चीननं का केलं आहे ?

ह्या साऱ्या प्रश्नांचं उत्तर एकच आहे. अंतर्गत सांस्कृतिक चळवळीतून यशस्वी-रित्या चीन बाहेर पडलं आहे; नि आता त्याचं लक्ष जागतिक राजकारणावर गेलं आहे. ह्यावेळी चीननं, विरोधकांना खतम् करण्याची भाषा सोडून अधिक वास्तव व्यवहारवाद स्विकारला आहे. नि तसं करताना निव्वळ राष्ट्रहिताकडे लक्ष पुरवलं आहे. नुकत्याच भरलेल्या सोविएत कम्युनिस्ट काँग्रेसच्या निमित्तानं कम्युनिस्ट जगातलं रशियाचं वर्चस्व निर्विवादपणे सिद्ध झालं आहे. विएतनाम्, कोरिया, मध्य-पूर्व, सिलोन-भारतातल्या निवडणुका, आफ्रिकी जग—ह्या प्रत्येक ठिकाणी घडत गेलेल्या घटना येन केन प्रकारेण रशियाला अनुकूल घडत गेल्या आहेत. त्यामुळे साहजिकच रशियाचा दबदबा वाढत आहे. ह्या साऱ्या घटना घडत असताना, ह्या ठिकाणी उजवा अमेरिका नव्हे तर, चीनचं आपला प्रतिस्पर्धी आहे हेही रशिया जाणून आहे. नि तीच जाणीव चीनलाही आहे. म्हणूनच चीन आज धूर्तपणे पावलं टाकत आहे. आपल्या महत्त्वपूर्ण स्थानाचीही जाणीव चीनला आहे. म्हणूनच, जगातला कुठलाही प्रश्न चीनच्या उपस्थितीशिवाय सुटू शकणार नाही, असं चौ ठणकावून सांगू शकतात. अमेरिकेबरोबरचे संबंध वाढवून रशियन वर्चस्वाला शह द्यायचा ह्या चीनचा प्रयत्न आहे.

अमेरिकेलाही ह्या नव्या वळणाचा आधार घ्यायला तशीच कारणं आहेत. चीन व कम्युनिस्ट विरोधात संरक्षकाची भूमिका घेऊन वावरणारा, इंग्लंडपासून जपान-पर्यंत सर्वांना मदत करणारा अमेरिका आज जागतिक राजकारणात एकाकी आहे विएतनाम, कंबोडिया, युनो वगैरे ठिकाणी हे अनेकदा सिद्ध झालं आहे. ह्या सर्वच ठिकाणी रशियानी आघाडी मिळवली आहे. अमेरिकेची मित्रराष्ट्रं मात्र ह्या सर्व प्रसंगी सोयीस्कर मौन पाळतात. चीनविरोधी भूमिका घेऊन अमेरिकेनं ७० कोटींच्या जगातला आपला सारा व्यापार गमावला. तीच ७० कोटींची बाजारपेठ जवळ करून, ब्रिटन, जपान, प. जर्मनी आदींनी मात्र स्वतःची घर भरून घेतली. रशियाचं दडपण, ७० कोटींच्या बाजारपेठेचं आकर्षण ह्या साऱ्यातनं आज अमेरिकेनं चीन विषयींचे आपले विचार बदलायला सुरुवात केली आहे. [illegible]

चीनलाच वापरता आलं तर पाहावं नाहीतर व्यापार आहेच हा कदाचित् विचार? उद्या कदाचित् कम्युनिस्ट चीनला 'युनो'त स्थान द्यायला, त्याच्याशी राजनैतिक संबंध ठेवायलाही अमेरिका मागेपुढे पाहाणार नाही. असं करताना तैपेहची अर्थातच गैरसोय होऊ नये म्हणून दोन जर्मनी, दोन कोरिया, दोन विएतनाम, दोन चीन-सर्वांनाच युनो 'त प्रवेश द्यावा अशा सूचनेचं पिल्लू अमेरिकेनं सोडून दिलं आहे!

रशियाही अर्थातच ह्या डावांना प्रतिडाव टाकणारच! त्यानंही म्हणूनही चिनी-विरोधी आघाडीला सध्या आवर घातला आहे. चीन बरोबरचे संबंध पूर्ववत सुधारण्याचा प्रयत्न करून ह्या शहाला प्रतिशह द्यायचा प्रयत्न रशियाचा सुरू आहे! चीनची मात्र सध्या त्यामुळे परिस्थिती अगदी अफलातून आहे.

दोन बडे–तिसराही अर्थातच आता बडा! नीती-अनिती, ध्येयवाद-शचित्त्व कसल्याही भानगडी नाहीत. राजकारण आहे फक्त सोयीचं! निखळ राष्ट्रहिताचं!! प्रत्यक्षात समोरासमोर यायची तिघांनाही भिती वाटते! त्यातनं ही नवीन निती निर्माण होऊ पाहात आहे–एकानं दुसऱ्याला तिसऱ्याविरुद्ध झुंजवायचा प्रयत्न करायचा! जमलं तर त्यातनं आपलं उखळ पांढरं करून घ्यायचं!! ◻

## जणगणना : खाजगी जीवनावर घाला!?

प्रत्येक व्यक्ती आपल्या खाजगी जीवनाला फार फार जपत असते. स्त्री असो पुरुष असो; बाल-अबाल प्रत्येकालाच आपल्या खाजगी जीवनात कुणी ही डोकावण्याचा प्रयत्न केला तरी राग येतो. इंग्लंडमधल्या १९७१ च्या सार्वत्रिक जणगणनेसाठी तयार केलेल्या प्रश्नपत्रिका खाजगी जीवनात डोकावून पाहण्याच्या दृष्टीने तयार केल्या गेल्या आहेत अशी धारणा सर्वसामान्य ब्रिटीश नागरिकात घर करू पाहात आहे. २५ एप्रिलला सुरू व्हायच्या ह्या जनगणनेत गोळा झालेल्या माहितीचं कॉम्प्युटरद्वारा पृथक्करण, इंग्लंडच्या सामाजिक रचनेचा पद्धतशीर अभ्यास केला जाईल अस जाहिर झालं आणि जनगणना–विरोधाला धार चढली. आपली 'प्रायव्हसी' कॉम्प्युटर' चव्हाटयावर आणणार ही भिती ब्रिटीशांना वाटत आहे. ह्या विरोधापायी स्त्रिया अर्धनग्नावस्थेत निदर्शनं करोत आहेत. विविध पक्षांचे नेते निदर्शनं संचलित करीत आहेत. रेडिओ, टेलिव्हिजन, सभा, आदींतून आपला विरोध दर्शवित आहेत. श्री. जेरेमी थोरप, श्री. लेस्ली हक्फिल्ड वगैरे सारखे संसद सदस्यही विरोध उघडपणे नोंदवीत आहेत.

–जनगणना अधिकाऱ्यांच्या मते, हे सारं थोतांड आहे. कारण विचारावयाचे २९ प्रश्न, १ वर्षापूर्वीच लोकसभेनं मंजूर केले आहेत.

–आणि कायदा म्हणतो प्रश्नपत्रिका भरण्यास नकार देणाऱ्याला दंड होईल–रु. १००।–फक्त! ◻ ◻ ◻

१५ एप्रिल हा फाटकांचा जन्मदिवस.
आणखी एक वर्षानी फाटक ऐंशी वर्षांचे होतील.
त्यानंतर वीस वर्षांनी शभर...
पण देहाच्या आणि मनाच्या म्हणून
काही परिमित शक्ती आहेत.
त्या शाबूत असेपर्यंत
वाचेच्या फटकळ पण हृदयाकडून हितैषी असलेल्या
फाटकांनी आत्मचरित्र लिहिले
तर
अलम मराठी शब्दांच्या दुनियेतली
ती अफलातून चीज ठरेल.



रवींद्र पिंगे

आदर्श साहित्यसेवक

# न. र. फाटक

समोर सागर खवळलेला असावा. दुपार झालेली असावी. उन्ह तापावीत. अशा वेळी आपण सागरतीरावर जाऊन बसावं. सागराची भव्यता पाहून मग आपण अवाक होतो. मिनीटागणिक नव्या नव्या लाटा उसळत असतात. फुटत असतात. वारे वाहात असतात; पण ते धगधगीत असतात. चटके देतात. सृष्टीचं ते उग्र विराट रूप पाहून आपला अहंकार गळून पडतो. आपल्या खुजेपणाची जाणीव आपल्याला होत असते. सागराकडे फक्त पहात रहाणं, त्याची गाज ऐकत रहाणं, एवढंच शिल्लक उरतं. अर्धी पृथ्वी पायाखाली घालून आलेल्या ग्रंथकार फाटकांच्या सहवासात सतत

असं वाटतं. गेल्या पाऊणशे वर्षांच्या इतिहासाचे फाटक हे डोळस साक्षीदार आहेत. सृष्टीनेच त्यांना अलौकिक स्मरण दिलं आहे. डोळ्याला डोळा न भिडवलेल्या आणि फाटकांच्या शरसंधानाचे सतत पावशतक लक्ष्य झालेल्या तात्यासाहेब केळकरांकडूनही 'तुम्हाला दैवी देणगी आहे!' असं उमाळ्याचं शिफारसपत्र त्यांनी ह्याच अलौकीक स्मरणशक्तीवर मिळवलेलं आहे. फाटकांकडे केव्हाही जा, आठवणींचं विलक्षण रंजक असं गुऱ्हाळ तिथे चाललेलं दिसतं. कु कानावर न पडलेल्या आठवणी फाटक सांगत असतात. त्यांच्या दोन चार आठवणी वानगीदाखल देतो. फाटकांचे आजोबा भोर संस्थानाचे दिवाण होते. त्यांनी लाल-खान नावाच्या एका मुसलमान मुलाला संस्थानात नोकरीला चिकटवला. धोतर नेसून लालखान खजिन्याच्या कचेरीपाशी नेहमी बसलेला असायचा. फाटकांनी त्याला बालवयात पाहिलेला होता. पुढे मोठेपणी फाटक भोरला गेले तेव्हा त्र्याण्णव वर्षांचं पिकलं पान झालेला लालखान त्यांना भोरच्या बाजारपेठेत दिसला. त्यावेळी लालखानाने मुसलमानी चोळणा घातलेला होता. फाटकांना तो लालखान म्हणाला, 'बेटा, माझा मुलगा मुस्लीम लीगचा माणूस झालाय. त्यामुळे ही तुमान घालण्याची माझ्यावर सक्ती झाली आहे. चैन पडत नाही. तेव्हा तू मला एक धोतर दे. ते मी नेसेन.' फाटकांनी त्याला हिंदू पद्धतीचं मोकळं मोकळं वाटणारं धोतर दिलं. लाल-खानाला धन्य वाटलं.

दुसऱ्या दोन आठवणी लोकमान्यांच्या आहेत. लोकमान्यांचा मुलगा रामभाऊ फाटकांच्या वर्गातला. म्हणून फाटकांचं लोकमान्यांच्या घरी जाणं – येणं होतं. 'गीतारहस्या'ची छपाई चालू असताना फाटकांनी त्या कामात हातभार लावला आहे. लोकमान्य फाटकांना अर्थातच अरेतुरे करीत. एकदा फाटक बरोबरच्या विद्यार्थ्यांना घेऊन सिंहगडावर गेले होते. तिथे लोकमान्यांनी त्यांना पाहिलं नि जेवणाची सोय काय केली आहे म्हणून विचारलं. मुलांनी झुणका–भाकर आणलेली आहे म्हणून सांगितलं लोकमान्य म्हणाले, 'ते खाणं संध्याकाळी परतताना खा. दुपारच्या जेवणाला माझ्याकडेच या.' मुलं लोकमान्यांच्या बंगल्यावर जेवली. जेवण झाल्यावर एका मुलाने लोकमान्यांना विचारलं, 'तुम्ही गीतारहस्य मराठीत का लिहिलंत? इंग्रजीत लिहिलं असतं तर साहेब मंडळींनी वाचलं असतं नि मोठा गौरव झाला असता.' लोकमान्य ताडकन उद्गारले, 'हे विचारायला तुम्हाला काही वाटत नाही? तू मराठी माणूस. गीता तुझी. मी मराठी माणूस. माझी भाषा मराठी. म्हणून मी मराठीतच लिहिणार. तेच तुला अधिक चांगलं कळेल. साहेब लोकांनी गौरव केल्यावर तू जागा होणार नि वाचणार! हे चूक आहे. शिवाय, साहेब हा कर्मयोगीच आहे. त्याचा जगभर जो उत्कर्ष झालेला दिसतो, ते त्याच्या कर्मयोगाचेच फळ आहे. त्याला कर्मयोगाच्या उपदेशाची गरज नाही. आपण कर्म-योगी नाही. म्हणून आपल्या माणसांना कर्मयोग मी शिकवत आहे. आपल्याला

माणसांनी वाचावं म्हणून मी मराठीत लिहिलं आहे. आता सर्व भारतीयांनी कर्म-योगाचा पाठपुरावा करावा म्हणून मी प्रथम गीतारहस्याचा भारतीय भाषांमधून अनुवाद करून घेणार आहे. ते झालं की मग संक्षिप्त पुस्तक इंग्रजीत लिहेन किंवा दुसऱ्या कुणाला तरी लिहायला सांगेन.'

दुसऱ्या आठवणीत लोकमान्यांचं वेगळं दर्शन आहे. मोरोपंतांच्या रामायणातली एक आर्या एका अनवट वृत्तात लिहिलेली आहे. ती चपखल बसत नाही. म्हणून मोरोपतांचा एक वंशज लोकमान्यांकडे आला. ते कामात होते. पण त्यांनी ती आर्या त्याला वाचायला सांगितली आणि वृत्त कोणतं ते नीट पटवून दिलं. हे वृत्त तुम्हाला कसं माहित ते विचारल्यावर लोकमान्य म्हणाले, ' मागे कॉलेजात असताना गणिताच्या सहाय्याने कुठली वृत्त ठरवता येतात त्याचा मी अभ्यास केला होता. म्हणून हे अपरिचित वृत्त सांगू शकलो. त्याचवेळी मी छंदशास्त्राचा एक तक्ताही तयार केला होता. आता मला त्याचा काही उपयोग नाही. तो तक्ता मी तुला देतो ' असं म्हणून लोकमान्यांनी पेन्सिलने तयार केलेला तो अनवट छंदाचा तक्ता त्या माणसाला दिला. पुढे तो तक्ता गायब झाला !

फाटक असे आल्या गेलेल्याला सतत सांगत असतात. वाङ्मय, इतिहास, राजकारण, रंगभूमी, संतसाहित्य असे शेकडो विषय त्यांचे चालूच असतात. ऐकोणऐंशीव्या वर्षातही स्मरणाने त्यांना दगा दिलेला नाही. वाचन तर त्यांचं सतत आणि किचकट विषयांवर चालू असतं. ग्रंथसंग्रह करणं हा त्यांचा खरा छंद. फाटकांपाशी असतील इतकी पुस्तकं माझ्या पहाण्यात तरी कुणापाशीही नाहीत पुन्हा ती कपाटात भरभरून सर्वत्र टेवलेली आहेत. काही साहित्य संघात, काही रुईया कॉलेजात, काही प्राज्ञ मठात, काही राहत्या घरात, अशी चौफेर आहेत. सर्व विषयांवर आहेत. वाचन लेखन आणि कथन ह्या तिन्हीपैकी कुठल्या तरी एका अवस्थेतच ते दिसतात. पुण्याच्या भारत इतिहास-संशोधक मंडळात ते टिपणं काढताना दिसतील, प्राज्ञ मठात पोथी वाचताना दिसतील आणि साहित्य संघात भाषण ठोकताना दिसतील. गड पायी जाऊन पाहाणे, निरनिराळ्या तऱ्हेचे कागद गोळा करणे, दौती सांभाळणे, काठ्यांचा संग्रह करणे हे त्यांचे अवांतर छंद आहेत. त्यांच्या टेबलावर दिसणारी डझनभर फौन्टनपेनें हाही असाच आणखी एक छंद. जोडीला त्यांनी गाण्याचाही रियाज केला विष्णु दिगंबरांपाशी त्यांनी तानांचे पलटे मारलेले आहेत.

मनाने मऊ असलेला हा माणूस अभ्यासपूर्वक ठरवलेल्या मतांना फार घट्ट आहे. फार मोठा विरोध असूनही अठ्ठावनच्या बंडाळीला स्वातंत्र्यसमर न म्हणता त्यांनी शिपाईगर्दीच म्हटलं आणि आपला ग्रंथ सिद्ध केला. ज्योतिबा फुल्यांचा साराच उदोउदो त्यांना मान्य नाही, पण अस्पृश्यांसाठी शाळा काढणारा पहिला द्रष्टा म्हणून ते त्यांना फार उच्च पद देतात. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या जन्मशताब्दीच्या वेळी त्यांना व्याख्यानमाला गुंफण्यासाठी आमंत्रण आलं. त्यांनी कळवलं, " विष्णु-

शास्त्री मोठे वगैरे ठीक आहे. पण त्यांच्याच बरोबरीने जन्मलेले न्यायमूर्ती तेलंग हे विष्णुशास्त्र्यांपेक्षा अनेक पटीने श्रेष्ठ आहेत. तेव्हा प्रथम तेलंगांची जन्मशताब्दी साजरी करा. " शिवाजीच्या नावाचं भांडवल करून 'परचक्रापासून रक्षण करा' असा टाहो फोडणाऱ्या मंत्र्यांना त्यांनी सर्वांच्या समक्ष सांगितलं, महाराजांनी केवळ परचक्र परतवलं असंच नाही, तर स्वराज्यातला राज्यकारभारही चोख केला. तुम्ही सुराज्य निर्मितीचा महाराजांचा धडाही गिरवा ! नुसतं 'परचक्र–परचक्र' काय करता ?" चीन, रशियादी देशांचा दौरा करून आल्यावर ते त्या राजवटी-बद्दल भारावून बोलत असत. तेव्हा कम्युनिस्टांचे सहप्रवासी म्हणून त्यांच्यावर थोडासा बहिष्कार पडला होता. आता वातावरण पूर्णपणे निवळलं आहे. अत्र्यांनी फटकांवर फार डूख धरला होता. पण फाटक त्यांना पुरून उरले. अत्र्यांच्या साहित्य संघातल्या शोकसभेत संघाध्यक्ष ह्या नात्याने फाटक बोलायला उठले. मी आकाशवाणीतर्फे ध्वनिमुद्रण करीत होतो. फाटक एक शब्दही वावगे बोलले नाहीत. फक्त वक्रोक्ती, व्याजोक्ती, ह्या अलंकाराने समृद्ध असलेल्या त्या भाषणाच्या एक दोन परिच्छेदातच त्यांच्या आवाजाला उपरोधाचा वास आला आणि श्रोते खवळले. अत्रेप्रेमी मंडळींनी फाटकांना मारायला काढलं. पण फाटकांचा मुद्दा चूक होता, असं कुणीही हरीचा लाल म्हणू शकला नाही. विरोधकांच्या मध्ये ते शांतपणे उभे होते. मला दया आली ती स्पष्टवक्ते असलेल्या फाटकांची नव्हे, तर एका निःशस्त्र पंडिताला ठोक द्यायला सिद्ध झालेल्या पराक्रमी श्रोत्यांची.

ग्रंथकार म्हणून भारतात मिळायचे ते सर्व मान सन्मान फाटकांच्या दारात आपल्या पायांनी चालत आलेले आहेत. हैदराबादेच्या साहित्य संमेलनाचे तर ते अध्यक्ष होतेच. शिवाय विदर्भ साहित्य संमेलन, मराठी पत्रकार परिषद, महाराष्ट्र ग्रंथालय परिषद, अशा तमाम फडांचेही ते मानकरी आहेत आणि आता त्यांच्या "आदर्श भारत सेवक" ह्या नामदार गोखल्यांच्या चरित्र ग्रंथाला साहित्य अकादमीचं पारितोषिक लाभून तर त्यांचा सर्वात मोठा बहुमान झाला आहे. आमची कल्पना होती की ते त्यांच्याच "यशवंतराव होळकर" ह्या सर्वांगसुंदर ग्रंथाला मिळणार. पण तो ग्रंथ हुकला. गोखले चरित्राचं भाग्य उजळलं. वयाची तिशी ओलांडल्यावर न्यायमूर्ती रानड्यांचं चरित्र लिहून ते ग्रंथलेखन करू लागले. आज सतरा-अठरा मान्यवर ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. टिळक चरित्राची छपाई चालू आहे. काकासाहेब खाडीलकरांचंही चरित्र ते लिहिणार आहेत. पण ही मान्यता असली, आणि वृत्तीत मस्ती असली तरी त्यांच्यापाशी मिजास नाही. आकाशवाणी-वरलं नऊ मिनिटाचं भाषण म्हणजे त्यांच्या हातचा मळ असतो. पण तरीही ते भाषणाची तालीम चुकवीत नाहीत. सर्वांशी प्रेमाने बोलतात. सर्वांना पानाचे सुगंधी विडे देतात. हजर नसलेल्यांची अगत्याने चौकशी करतात. म्हणून मग आम्हीही

पृष्ठ ५९ वर

## शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय

# द्वितीय निबंध-स्पर्धा समारोप

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयाच्या विद्यमाने जाहीर झालेल्या द्वितीय निबंध-स्पर्धेचा समारोप कार्यक्रम, शंकर ब्रह्मे त्यांच्या द्वितीय पुण्यतिथीदिनी, ता. १० एप्रिल १९७१ रोजी, प्रा. दि. के. बेडेकर ह्यांचे अध्यक्षतेखाली झाला. प्रमुख वक्ते म्हणून पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील प्रा. रा. म. बापट ह्यांचे 'प्रचलित समाजात माणूस माणसासारखा जगू शकतो काय?' ह्या विषयावर व्याख्यान झाले.

प्रास्ताविकात कुमुद पोरे ह्यांनी आमंत्रितांचे स्वागत करून ग्रंथालयाच्या चालू वर्षीच्या कार्याचा आढावा घेतला. ग्रंथालयात विविध समाजविज्ञान विषयावरील सुमारे १२०० पुस्तके आणि २० नियतकालिके येत असून १७ ऑगस्ट १९७० रोजी ग्रंथालय वाचकांसाठी खुले करण्यात आले. विद्यार्थी, तरुण नेते तसेच समाजविज्ञान विषयावावत जिज्ञासा आणि आस्था असलेल्या वाचकांनी ह्या ग्रंथालयाचा अवश्य फायदा घ्यावा असे आवाहन पोरे यांनी केले.

जिव्हाळ्याच्या समाजिक विषयांवर युवकांमध्ये विचारमंथनास उत्तेजन देण्याच्या हेतूने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ३० ऑगस्ट १९७० रोजी एक वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. 'तरुण पिढीतील असंतोष' ह्या व्यापक विषयावर आधारित पाच पोटविषय देण्यात आले होते. पुण्यातील १० महाविद्यालयांचे संघ स्पर्धेत सहभागी झाले.

यंदाची निबंध स्पर्धा दोन गटाकरता ठेवलेली होती. १६ ते २१ वयोमर्यादेच्या गटाकरता 'भारतीय तरुणांच्या विचारावर आणि आचारावर सामाजिक संस्थां-

मुळे पडणाऱ्या मर्यादा ' आणि २१ वर्षांचे वरील गटाकरता ' प्रचलित समाजात माणूस माणसासारखा जगू शकतो काय ?' असे विषय देण्यात आले होते. पहिल्या गटात पुण्याचे श्री. म. वि. चव्हाण ह्यांना पारितोषिक मिळाले. दुसऱ्या गटात पारितोषिक पात्र निबंध आला नाही.

चालू वर्षी ग्रंथालयामार्फत विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली. ग्रंथालयाच्या क्रियाशील सभासदांनी युवक शिबिरांमध्ये भाग घेतला. तसेच प्रचलित समस्यांवर व्याख्याने दिली आणि जिव्हाळ्याच्या आर्थिक प्रश्नांवर मराठीत लेख लिहिले.

प्रा. रा. म. बापट ह्यांनी आपल्या भाषणात पुढील विचार मांडले. माणसाच्या मनुष्यत्वाचा अविष्कार हा त्याच्या मनाच्या सर्जनशीलतेत आणि प्रज्ञेत होत असतो. या सर्जनशीलतेचा आणि स्वतंत्र प्रज्ञेचा अविष्कार करण्याची संधी अखिल मानव जातीस मिळू शकेल काय, म्हणजेच प्रत्येक माणसाला ' माणूस ' म्हणून जगता येईल असा समाज निर्माण होऊ शकेल काय ही आजची समस्या आहे. यामध्ये माणसाच्या मूलभूत अपूर्णतेमुळे कोणत्या मर्यादा पडतील हा महत्त्वाचा प्रश्न आहे. प्राचीन काळापासून मनुष्यत्वाच्या कल्पनेची जाणीव आहे. परंतु त्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञान अप्रगत असल्याने पूर्ण जीवन जगणे अशक्यप्राय होते. ह्या परिस्थितीमुळे ज्यांना ह्या प्रश्नाची जाणीव झाली, त्यांनी त्याकडे पाठ फिरवून, व्यवहाराची उपेक्षा करून अध्यात्माकडे लक्ष वळविले. जड सृष्टीच्या कक्षेत मानवी आकांक्षा पूर्ण होणे शक्य नाही, तर अध्यात्मिक विश्वाची कल्पना करून मानवी अपूर्णतेचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला गेला. विसाव्या शतकातील विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या अतिवेगवान प्रगतीमुळे आज किमान भौतिक गरजा पुऱ्या करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्वांना माणूस म्हणून जगता यावे ही ईर्षा महत्त्व पावली. त्यासाठी सामाजिक परिवर्तनाची गरज जोराने मांडली गेली. संस्थात्मक बदलावर भर देण्यात आला. या प्रयोगातील मर्यादाही आज दृगोचर होत आहेत. उलटपक्षी व्यक्ती केंद्रबिंदू मानून मनाचे परिवर्तन घडवून आणावे आणि प्रत्येक मानवाने अखिल मानवजातीचे मनुष्यत्व मान्य करावे असे स्वप्न रंगविले जाऊ लागले. यातील विफलताही स्पष्ट झालेली आहे. तात्पर्य, माणसाने आपल्या मर्यादा लक्षात घेणे आणि मानवी कक्षेत जीवन अधिकाधिक परिपूर्ण कसे करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे.


अध्यक्षीय समारोपात प्रा. दि. के. बेडेकर म्हणाले की धर्मांचा मानवी मनावर जोवर पगडा होता तोवर परलोकात मानवी आकांक्षा पूर्ण होतील अशी भावना होती. जन्म-मरणाच्या चाकोरीत मानव अडकला आहे म्हणून इहलोकातील कष्टप्रद जीवन कंठीत रहाणे प्राप्त आहे. परंतु भौतिक जीवन समृद्ध करण्याकरता आवश्यक त्या प्रयोगशीलतेचे आणि प्रयत्नवादाचे महत्त्व मात्र मान्य झालेले नव्हते.

बुद्धिवादाच्या उदयाबरोबर भौतिक जीवनातील त्रुटी व समस्या याविषयी सखोल विचार होऊन बदलाची दिशा काय असावी यावर विचारमंथन सुरू झाले. या संदर्भात प्रा. बेडेकरांनी रस्किन आणि मार्क्स याचा आवर्जून उल्लेख केला. भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण झाल्यानंतरच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या प्रगतीमुळे माणसाच्या गरजा भागविण्याची प्रचंड शक्ती माणसाने निर्माण केली. ही शक्ती विवेकाने वापरल्यास अखिल मानवाच्या प्राथमिक गरजा भागविणे शक्य होईल. परंतु आज खऱ्या गरजांची उपेक्षा केली जात आहे व खोट्या गरजांचे अवडंबर माजविले जात आहे. त्यामुळे बहुसंख्यांकाच्या किमान गरजाही पुऱ्या होत नाहीत; तर अल्पसंख्यांकांच्या कृत्रिम गरजा पुऱ्या करण्यासाठी व अशा नवनव्या कृत्रिम गरजा निर्माण करण्यासाठी मानवी बुद्धीचा, शक्तीचा आणि संपत्तीचा अपव्यय दुर्दैवाने चालू आहे. अन्न, वस्त्र व निवारा याबरोबरच माणसाच्या दुसऱ्या एका मोठ्या मूलभूत गरजेचाही आज विसर पडत आहे. माणसाच्या सर्जनशीलतेचा अविष्कार त्याच्या श्रमामधून होत असतो. परंतु जोवर हे श्रम बळजबरी आणि प्रलोभने यांच्या सहाय्याने लादले जात आहेत. तोवर त्यामधून मनुष्यत्वाचा अविष्कार होणार नाही. यासाठी आजची समाजव्यवस्था बदलणे आवश्यक आहे. खोट्या गरजा व त्यासाठी चाललेली व्यर्थ धडपड थांबली पाहिजे. पिळवणूक, भ्रष्टाचार आणि अनैतिकता याने भरलेला आंधळा व्यवहाराचा गाडा रोखला पाहिजे. मानवी समाजातील प्रत्येक व्यक्तीस श्रमसाफल्याचा आनंद मिळेल आणि त्याच्या मूलभूत गरजा भागविल्या जातील अशा रीतीने अर्थ-समाज रचनेमध्ये बदल घडवून आणले तरच माणसाला माणसासारखे जगणे शक्य होईल.

श्री. रा. प. नेने यांनी आभार मानले. वंदे मातरम् होऊन कार्यक्रम संपला.

कार्यवाह,

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय





इंग्रजी कथाकथन कार्यक्रमात सौ. विजयाताई रायकर व विद्यार्थिनी

# दीपकळ्या धाकुट्या

रतनलाल भंडारी

चिपळूणजवळ मार्कण्डी म्हणून उपनगर आहे. खरे तर हे उपनगर कुठे संपते आणि चिपळूण कुठे सुरू होते याची सीमारेषा माझ्या-सारख्या नवख्या माणसाच्या लक्षात न यावी तकी एकरूप झाली आहे. चिंचनाक्याच्या पुढे 'अट्टी गट्टी फू' करून थोडीशी लांब लांब वस-लेली विरळ वस्ती लागली की समजावयाचे मार्कण्डी सुरू झाली.

या मार्कण्डीमध्ये 'मातृछाया संस्कार केंद्र' आहे. प्रामुख्याने मुलींचे 'मातृछाया वसतिगृह'

चालविणे हेच या केंद्राचे सध्याचे प्रमुख कार्य आहे.

वसतिगृहाजवळ रिक्षा थांबताच चार पाच मुली धावत येतात, पाहुणा लेखक असला तरी मुलींच्या वसतिगृहात जाण्याची त्याची पहिलीच वेळ असते. बिचार अवघडून जातो. नको, नको म्हणत असतानाच त्याचे सामान 'मातृछाया वसतिगृह' अशी पाटी लावलेल्या इमारतीत गुप्त होते. वसतिगृहाच्या प्रवेशद्वाराशीच सौ. विजयाताई रायकर त्याचे स्वागत करतात.

डॉक्टर रायकर दवाखान्यातून आलेले नसतात. आत आभ्यासात मग्न असलेल्या एक दोन मुली काही तरी कामानिमित्ताने डॉक्टरांच्या घरात (घर आणि वसतिगृह यांच्या सीमा ठरवणे कठीण आहे.) डोकावून, ताईंना काहीतरी विचारण्याच्या निमित्ताने 'लेखक' हा प्राणी पाहून जातात. डॉक्टरांच्या कुटुंबात चहा कोणीच पीत नाही, पण पाहुण्यासाठी चहा होतो.

मग ताई वसतिगृहाची वास्तू पाहुण्यांना दाखवितात. वसतिगृहाचे दोन भाग आहेत. एका विभागात महाविद्यालयीन मुलींच्या डझनभर कॉट्स हारीने पसरलेल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र लाईटची व्यवस्था आहे. दोन मुलींच्यामध्ये टेबलावर, खिडकीशी अभ्यासाची साधने पद्धतशीर मांडून ठेवलेली असतात. कदाचित आज पाहुणे येणार असें आधीच डॉक्टरांनी सांगितलेले असल्यामुळे सारे काही ठाकठीक केल्यासारखे वाटते. दुसऱ्या बाजूला, पार्टीशनच्या बाहेर सात आठ माध्यमिक शाळेत जाणाऱ्या मुलींच्या कॉटस् आहेत. सर्व मिळून वीस मुलींची सोय. शेजारीच भोजनगृह आहे. इथे वास्तव्य करणाऱ्या मुलींना प्रत्येकी पंधरा रुपये निवास भाडे द्यावे लागते. जेवण हवे तर हातानी करून खाता येते. अनेक मुली घरून येताना पायली दोन पायली तांदुळ आणतात. बाकी सामान तिथेच विकत घेऊन भोजन तयार करतात. तीस पस्तीस रुपये खर्च येतो. काही जणी दोघी तिघीत मिळून सामुदायिक जेवण करतात. एखादी गरीब, होतकरू मुलगी असली तर विश्वनाथ रेडीज अथवा शिरीष पैंची खाजगी स्कॉलरशिप डॉक्टरांच्या सल्ल्याने त्या मुलीला मिळते. वसतिगृहात पाणी मुबलक आहे. सभोवार छोटीशीच बाग आहे. कम्पाउंडच्या आतच 'कोयना' होजियरीचा पसारा एका बाजूला आहे. डॉक्टरांच्या प्रेरणेनेच हा होजियरीचा कारखाना आज चांगलाच रूपाला आलेला आहे. वसतीगृहात वरती माळा आहे. दुपारच्या काहीलीच्या वेळेस मुली तेथे आभ्यास करतात. कधी कधी बागेतल्या झाडांखालीच त्या आभ्यासाची पथारी टाकतात. मुलींची जात आधीच हार्ड वर्कर. त्यात तर हे परीक्षेचे दिवस. डॉक्टर चेष्टेने म्हणतात, 'आमच्या बागेतली झाडे जरी परीक्षेला बसली तरी पास होतील. फर्स्ट क्लास चुकायचा नाही.'

तुम्ही म्हणाल, मग या वसतिगृहाचे वैशिष्टच तरी काय ? वैशिष्टच हेच की, रायकर दांपत्याने मुलींना, विशेषत: ग्रामीण भागातील मुलींना शहरात जवळचे,

नात्याचे कोणी नाही म्हणून केलेली ही व्यवस्था! शिक्षणापासून कोणालाही वंचित व्हावे लागू नये ही डॉक्टरांची धडपड आहे. दूरवर, जिथे एस्. टी. सुद्धा जात नाही अशा भागातील मुलींना चिपळूणसारख्या शहरात स्वतःचे 'घर' उपलब्ध होते. पालकांनाही रायकर दाम्पत्यावर विश्वास टाकून निर्धास्तपणे आपआपल्या गावी, दूरवर स्वतःचे व्यवसाय करता येतात.

डॉक्टर रायकरांची मानवतेवर निष्ठा आहे. त्यामुळे इथे कुठलाही जातीभेद पाळण्यात येत नाही. एका कुटुंबातल्या मुलांसारखा त्यांचा विकास घडविता येतो. आता ही सुलताना चौगुलेच पहा. ती वेगळ्या धर्माची आहे हे कुणी सांगेपर्यंत तुमच्या लक्षात यावयाचे नाही.

हमजा इनुस चौगुले यांची ही मुलगी. वडील परदेशात असतात. अधूनमधून येतात. त्यांचे कुटुंब भैरवणीला आहे. गाव लहान. मुलीचे शिक्षण चांगले झाले पाहिजे अशी त्यांना ओढ. त्यांत मुलगी एकुलती एक. बापाची लाडकी. मग एके दिवशी चिमुरडी सुलताना उर्दू शाळेतले संस्कार घेऊन इयत्ता पाचवीत दाखल होण्यासाठी मातृछायेत येते. हळूहळू तिचे ग्रामीण संस्कार कमी होतात. बोलण्यात वागण्यात आधुनिकपणा येतो. आता तर ती सातवीत आहे. वर्षा-सहामहिन्यांनी ती घरी जाते तेव्हा घरच्या मंडळींना सुलताना 'मॉडर्न' वाटावी इतकी सुधारली आहे.

सुलतानच काय, पण अशा कितीतरी मुस्लीम मुली मातृछायेच्या छायेत ज्ञानार्जन करून गेल्या आहेत. शफीया पारकर, जैतुन, रूकिया आणि खतिजा. यातल्या काहींनी तर बी. एस. सी. ची पदवी प्राप्त केली आहे. या सगळ्या मुलींची वाढ मातृछायेत इतक्या सुलभपणे, जातीधर्मभेद न मानता झालेली आहे की, डॉक्टर लोहिया असते तर त्यांनी या एकाच कार्याबद्दल रायकरांची पाठ थोपटली असती.

मातृछायेतील ही दुसरी मुलगी कुसूम शंकर देशपांडे. हेळवाकला आठवीत होती पण भूकंप झाला आणि या गरीब पोरीचे भावविश्व पार उध्वस्त झाले. हेळवाकहून रोज चालत ती हायस्कूलसाठी कोयनानगरला जायची. ती शाळा उध्वस्त झाली. कुसूम तर मरता मरता वाचली. तिचे चुलते तेव्हा कोयनानगरला मेस्त्री होते. आई, वडील, बहीण, भाऊ असा सगळा परिवार निसर्गाच्या कोपामुळे उघड्यावर आला. मग या मुलीच्या शिक्षणाकडे लक्ष कोण देणार? चुलत्याने तिला नगर जिल्ह्यात कुकाण्याला नेले. कुसुमच्या आईच्या डोक्यावर परिणाम झालेला. तरी कुसुमने जिद्द सोडली नाही. ती कुकाण्याहून देवगावला चालत जायची. पाच-सहा मैल चालून ही पोर कशी शिकणार म्हणून चुलते व्यथित होते. तोच वृत्तपत्रात मातृछायेचे वर्णन वाचले. पोरीला घेऊन त्यांनी चिपळूण गाठले.

कुसूम आली तेव्हा बरोबर एक गोणपाटाचा तुकडा घेऊन आली होती. दुसरे सामान बरोबर आणावयाचे म्हटले तरी आणावयाला घरात मुळी काही नव्हतेच. तिच्यातील दुर्दम्य ज्ञानतृषणेचे दर्शन सुदैवाने रायकर दांपत्याला झाले. त्यांना तिला 'आपली' म्हटले. विपळूणच्या युनायटेडमध्ये कुसूमला प्रवेश मिळवतानादेखील डॉक्टरांना फी भरण्याची तयारी दाखवावी लागली. ही पोर शिकेल असा कुणाचाच विश्वास नव्हता. तिचा आता दहावीच्या वर्गात पहिला क्रमांक आहे. एवढेच नव्हे, तर मी गेलो त्या दिवशीच शाळेत वक्तृत्व स्पर्धा होत्या. पंधराशे मुलांच्या त्या शाळेत इंग्लीशमध्ये लोकमान्यांचा गुणगौरव करून मुलीने पहिला क्रमांक पटकावला होता.

ही मीना पाटणकर. माखजनच्या हायस्कूलमध्ये एस्. एस्. सी. झाली. गाव आडली. एका बाजूला महाविद्यालयीन शिक्षणाची आस. शहरांमध्ये कोणी नातेवाईक नाही. लेडीज हॉस्टेलमध्ये ठेवायचे तर पैसेही फार लागतात. पुन्हा जबाबदार मार्गदर्शनाची शाश्वती नाही. अशा वेळी मातृछायेने तिला सावली दिली. आता एस्. वाय. बी. ए. ला आहे.

अशा या मातृछायेतील मुली. डॉक्टर रायकर आणि विजयाताई यांचा प्रेमविवाह झालेला आहे. राष्ट्रीय चळवळीतील भलेबुरे अनुभव या दांपत्याच्या गाठीशी आहेत डॉक्टरांच्या डोक्यातून तर अनेक चांगल्या कल्पना निघतात. कोकणातली फळे टिकवणे ही त्यातील एक. यासाठी व्याख्याने दिली. पण ही वन मॅन मिशनस् संघटनेअभावी वाया जातात. समाजातही 'फॅडिस्ट' म्हणून हेटाळणी होते. अनेक योजनांचे प्रयोग करून 'मातृछाया' हेच या दांपत्याने आपले दैवत केले आहे. त्यांचा संसार मुळातच आटोपशीर. दोन मुले आणि एक मुलगी. मुले आता शिकून आपआपल्या मार्गाला लागली आहेत. मुलगी सुखाने नांदते आहे. डॉक्टरांचा ससार दृष्ट लागेल इतका सुरेख आहे.


पण डॉक्टरांना मुळी गप्प बसवतच नाही. मातृछायेतल्या मुलींसाठी कधीकधी त्यांना दवाखान्याचादेखील विसर पडतो. त्यांच्यावर चांगले संस्कार म्हणून अंकगजपत्रकापासून ते प्रचलीत राजकीय, सामाजिक प्रश्नापर्यंत विविध माहिती ते मुलींना देतात. जातपात मानू नका असा उपदेश त्यांना करावाच लागत नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत एक सुसंस्कृत, विज्ञाननिष्ठ, पण श्रद्धावान पिढी ते घडवीत असतात.

पण मातृछायेची खरी शक्ती आहेत सौ. विजयाताई रायकर. या मुलींच्या काही काळ का होईना त्या आई होतात. वेळ पडली तर रागावतात. शिवण, टिपण सारं काही शिकवतात.

पहिल्या प्रथम 'संस्कार केंद्र' असे ऐकताच रूढीनिष्ठ, शिस्तबद्ध आणि मनातल्या

पृष्ठ ३९ वर

# सीमेंटचे पन्हळ बांधून पाण्याचा थेंब न् थेंब पिकांपर्यंत पोचू द्या



सीमेंटच्या पन्हळातून पाणी झिरपत नाही. त्यामुळेच तुम्हाला तुमच्या पिकास सदोदित भरपूर पाणी मिळण्याची खात्री बाळगता येते. एसीसी सीमेंटच्या थोड्या गोणी खरेदी करून मजबूत नि उत्तम ओलिताची सोय करून ठेवा. वेळ दवडू नका.

तुम्हाला लागणारे सीमेंट मिळविण्यासाठी तुमच्या नजीकच्या एसीसी स्टॉकिस्टचा अथवा दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचा संपर्क साधा.

तज्ञांची मोफत तांत्रिक मदत दि कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २० यांचेकडून मिळेल.

**ACC**
शेतकऱ्यांचा सखा

CMI-1520 A

दि असोसिएटेड सीमेंट कंपनीज लिमिटेड
दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड

इंदिरा दिग्विजयानंतर
पुन्हा एकदा समाजवादी ऐक्याचा
ट्रंपेट वाजू लागला आहे.

श्री

# दि ग्रेटेस्ट शो ऑन द अर्थ

'नेहमीच येतो मग पावसाळा' उक्तीप्रमाणे दरवर्षी कोणीतरी समाजवादी शक्तीच्या एकजुटीची मागणी करीत असतो. या निमित्ताने अग्रलेखांना विषय मिळतो. पुढाऱ्यांची पत्रके निघतात. 'जनमनाच्या कानोशात' पत्रापत्री होते. शेवटी ओमफस् !

१९७१ मध्ये पण निवडणुकीतील इंदिरा दिग्विजयानंतर समाजवादी एकीचे वारे घुमावयास लागले होते. याचा मराठी येळकोट समाजवादी नेत्यांची 'शिवशक्ती'त बैठक बोलावून 'मराठ्या'चे व्यंकटेश पै. यांनी केला. पै साहेबांच्या सूचनेला प्रा. मधू दडवते व महाराष्ट्र प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. किशोर पवार यांनी पाठिंबा दिला. शिवशक्तीतील बैठकीला समाजवादी शक्तीतील १।३ भाग असा प्रजासमाजवादी पक्ष, १।३ रिपब्लिकन पक्षाचा श्री. रुपवते व कम्युनिस्टातील १।३ असे उजवे कम्युनिस्ट असे समाजवादी वीर जमले होते.

संयुक्त समाजवादी पक्ष व शेतकरी कामगार पक्ष या पक्षाशिवाय समाजवादी पंचायतन पुरे होणार नाही असा साक्षात्कार या बैठकीत झाला. (लाल निशाण गटाचे काय ? तसेच संयुक्त समाजवादी पक्षातील जॉर्ज-मधू लिमये-एस. एम. गट

जरी यांच्यात आला तरी राजनारायणाच्या गटाचा 'इंदिरा हटाव' तोरा कायम आहे, बंडखोर समाजवादांचा तिसराच पंथ. म्हणजे संयुक्त समाजवादी पक्षातील १।३ भाग 'समाजवादी आघाडी'त सामील होईल असे दिसते. शे. का. पक्षातसुद्धा कॉंग्रेस सहकारवाल्यांचा एक गट, तर समाजवादी आघाडीवाल्यांचा दुसरा, तर 'एकला चालोरे' म्हणणाऱ्यांचा तिसरा, असे तीन गट आहेत) थोडक्यात डाव्या पक्षातील १।३ गटांची 'समाजवादी आघाडी' होईल. गणितात बेरजेने पूर्णांक होत असला तरी व्यवहारात पूर्ण पक्ष होईल का ?

या समाजवादी पांडवातील 'कौंतेय' मात्र हस्तिनापुरात रमला आहे. त्या लढाऊ समाजवादी कर्णाला 'सूतपूत्र ! भांडवलदार पूत्र !' म्हणून एकेकाळी हे पांडव हिणवत होते. या समाजवादी वीरांनी पितामह मुरारजी-निजलिंगप्पा यांच्यावर हल्ला करून कॉंग्रेसी महाभारताला सुरुवात केली होती. यांच्याच घोषणाबाजीने इंदिराजींची समाजवादी प्रतिमा रेखाटली गेली होती. तरी आज त्या बिचाऱ्यांना समाजवादी दिंडीतील सत्तेचा प्रसाद मिळू शकला नाही.

डाव्या पक्षांची धोरणे व पवित्रे पाहिले तर करमणूकप्रधान कहाणी होईल. १९६९ च्या फाटाफुटीनंतर इंदिरा सरकार तरण्यामध्ये उजव्या कम्युनिस्टांचा एक मोठा आधार होता. म्हणून यांचे 'मिनि लेनिन' भाई डांगे गर्वाने म्हणत की 'आज दिल्लीतील सरकार टिकविण्यासाठी इंदिराजींना आमची मदत घ्यावी लागत आहे. उद्या त्यांना आमच्याबरोबर संयुक्त सरकार स्थापावे लागेल. दिल्लीतील लाल किल्ल्यावर उद्या लाल निशाण फडकणार आहे.' इंदिरा सरकारला ते स्प्रिंगबोर्ड समजत होते.

१९६७ च्या निवडणूकीतील निकालावरून आपले 'कॉंग्रेस हटाव' धोरण बरोबर होते अशी संयुक्त समाजवाद्यांची खात्री झाली. कॉंग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर सिंडिकेट सत्ताच्युत झाली त्यावेळी उरलेली 'इंडिकेट हटाव' हे आपले परमकर्तव्य आहे अशी खुणगाठ मनात त्यांनी बांधली. 'इंदिरा हटाव' पूर्तिसाठी 'प्रतिगामी' म्हणून टीकावर्षाव केलेल्या सिंडिकेटबरोबर हे हातमिळवणी करावयास तयार झाले. आंधळेपणाने इंदिरा विरोध नको हे एस. एम जोशी सांगत असताना, जॉर्ज-मधू लिमये-आदींनी राजनारायण यांच्या हाताला हात लावून 'बड्या आघाडीत सामील होण्यास होकार दिला. इतके नव्हे तर एका प्रचार बैठकीत 'आज बड्या आघाडीचा किमान कार्यक्रम ठरला नाही. तुमच्यात व त्यांच्यात मतभेद होण्याची शक्यता आहे. समजा 'बड्या आघाडी'ला बहुमत मिळाले तर कार्यक्रम मतभेदावर आपण आघाडी मोडणार नाही कशावरून ? व अशा प्रकारे इंदिराजींना मदत करणार नाही कशावरून?' अशा आशयाचा प्रश्न विचारला असता 'आमचे व इतरांचे मतभेद झाले तर आम्ही मंत्रिमंडळात सामील होणार नाही. पण बाहेरून पाठिंबा देऊ' असे जॉर्ज साहेबांनी उत्तर दिले होते.

आणि हेच जॉर्ज मधू लिमये बड्या आघाडीवर पराभवाचे खापर फोडीत आहेत.

संयुक्त समाजवाद्यांची ही कथा तर प्रजा समाजवाद्यांची वेगळी तऱ्हा. संसोपाशी विलीनीकरणावर वाटाघाटी चालू असताना, बडोदा अधिवेशनात आजच्या संजीवय्या यांच्या अध्यक्षत्वाखालील काँग्रेसचे तेव्हाचे अध्यक्ष जगजीवनरामबाबूंकडून सहकार्य मागणारी तार आली. तत्काळ संसोपा तडजोडीला काडीमोड देऊन प्रजासमाजवादी जगजीवनरामबाबूजींकडे प्रितीभोजनासह अर्थपूर्ण संवादासाठी धावले.

पण सत्तारूढ काँग्रेसला बिहारमधील सत्ता टिकविण्यासाठी व म्हैसूरमधील संघटना काँग्रेसची सत्ता पाडण्यासाठी प्रसोपाचे सहकार्य हवे होते. पुढे उलटे होऊन बिहारमधील दरोगा मंत्रिमंडळ कोसळले व म्हैसूरातील वीरेंद्र पाटील मंत्रिमंडळ वाचले. पण या सहकार्यात ' आजवर पथ चुकलेला ' म्हणत ' झोपडीतील साथी सवंगडी ' काँग्रेसमध्ये शिरले तेव्हा या प्रसोपा वैद्याची गरज संपली.

लवकर मध्यावधी निवडणूका आल्या. तेव्हा ' हातचा असू दे ' या भावनेने नवकाँग्रेसने पुन्हा प्रसोपाबरोबर वाटाघाटी सुरू केल्या. केवळ जागेंच्या वाटपाच्या मतभेदावरून नानासाहेब, जगजीवन यांचा अर्थपूर्ण संवाद अर्थशून्य ठरला.

राहिलेले अ. भा. पक्ष म्हणजे फॉवर्ड ब्लॉक व रिपब्लिकन पक्ष. यापैकी फक्त बंगाल्यात असलेल्या फॉवर्ड ब्लॉकचे उजव्या कम्युनिस्टाकडे झुकणारे, डाव्या कम्युनिस्टांकडे झुकणारे व एकांडे असे तीन गट झाले आहेत.

तीच गत रिपब्लिकन पक्षाची झाली आहे. याला नेते जबाबदार असले तरी अप्रत्यक्ष खलनायक काँग्रेस. भंडारे गट काँग्रेसवासी, तर गायकवाड गटांचा काँग्रेसची ' अर्थपूर्ण व्यवहार ' चालू आहे. यशवंत कृपेने या शहरी नेत्यांना सत्तेतील प्रसाद मिळाला, या खिरापतीवर हे खूष. तेव्हा रिपब्लिकन हत्ती काँग्रेसच्या दारी झुलतो आहे. राहिलेले शेपूट म्हणजे बी. सी. कांबळे गट चुटपुटत रूसत आहेत.

महाराष्ट्रातील पंचायतनातील शेतकरी कामगार पक्ष खराखुरा प्रादेशिक पक्ष. देव-देवगिरीकर या पुणेरी भटांच्या दादागिरीमुळे ' ब्राह्मणी ' मराठा मोरे व भोळे जेधे यांनी ज्या भावनेने काँग्रेस सोडून शे. का. पक्ष काढला, त्यातील बहुतेक कर्त्यांना (अगदी मोरे–जाधव–यशवंतराव मोहिते–आनंदराव चव्हाण इत्यादि) ' मराठा ' वादावर यशवंतरावांनी पुन्हा काँग्रेस कळपात आणलेले. राहिलेली धुळप–भाऊसाहेब राऊत, दाजिबा देसाई ही मंडळी काँग्रेस दरबारच्या मानकऱ्यांपेक्षा पक्षातील नेतृत्वाचे राजेपण चांगले या विचाराने राहिली. त्यांच्या वैयक्तिक प्रभावावर त्या त्या भागात काम उभे आहे म्हणून आजचा शे. का. पक्ष आहे.

असे हे समाजवादी पक्ष व त्यांचे रंग!

यांची एकजूट निवडणुकीत टाटांना पाठिंबा देणाऱ्या संपादकांना का आवश्यक वाटते, तर समाजवादी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी दडपण आणणारा ' Her Majesty 's Loyal Opposition ' पाहिजे म्हणून. जे एकत्र राहू शकत नाही

त्यांच्याकडून ही संपादक मंडळी, सुखाने संसार करून जगासमोर आदर्श ठेवा अशी अपेक्षा बाळगून आहेत.

कालपर्यंत प्रजासमाजवाद्यांना उ. कम्युनिस्ट ' अस्पृश्य ' वाटत होते. ' रशियाचे गुलाम ' ' परराष्ट्र धार्जिणे ' ' लोकशाही विरोधक ' हे प्रसोपाचे कठोर प्रहार, प्रसोपावाले हे अमेरिकेचे हस्तक आहेत या ढालीवर कम्युनिस्ट अडवत असत. [ सध्या अमेरिका धार्जिणेपणाचा मान कम्युनिस्टांनी शिवसेना व स्वतंत्र यांना दिला आहे. म्हणजे भारतीय कम्युनिस्टांना सांगून अमेरिका हस्तक बदलत असावी. नाहीतरी रशिया व अमेरिकेचे साटेलोटे आहे असा चीनचा आरोप आहेच. ]
गेरीच्या इम्रे नाज प्रकरणी याच प्रजासमाजवाद्यांनी काय अश्रुपात केला होता. तिबेट प्रकरणी कम्युनिस्टांवर रुसून यांनीच संयुक्त महाराष्ट्र समिती मोडली. (दोन्ही वेळा भाई डांगे यांनी अश्रूंना प्रजासमाजवाद्यांवर सोडले होते.)

आणि आज ? जाने दो !

प्रत्येक गोष्टीचे तात्विक समर्थन हे बुद्धिमान प्रजासमाजवादी करू शकतात. ' Do any dam things but do under the cover of principles ' हा पं नेहरूंनी के. डी मालवीय यांना दिलेला गुरुमंत्र हे पंडितजींचे ' राजकीय अनौरस पुत्र ' व्यवहारात अंमलात आणीत आहेत.

जी गोष्ट प्रसोपा–कम्युनिस्ट लफड्याची, तीच गोष्ट प्रसोपा प्रेमसंबंधाची.

बारा वर्षापूर्वी एका घरातील ही कर्तृत्ववान भावंडे. ४२ च्या क्रांतीचे वलय मागे चमकत असल्याने व सभेला प्रचंड गर्दी होत असल्याने १९५२ च्या निवडणुकीत कमीत कमी उत्तर प्रदेश, बिहारसह चार पाच राज्यात पक्ष सरकार स्थापन करू, लोकसभेत १५० च्या आसपास जागा मिळवून इंग्लंडच्या मजूर पक्षाप्रमाणे प्रमुख विरोधी पक्षाचा मान घेऊ असा या शहरी सुशिक्षित बाबूंचा अंदाज होता. म्हणूनच पं. नेहरू यांनी घटना समितीत दिलेल्या ७५ जागा व सहकार्याचा हात यांनी धुडकावून लावला.

पण १९५२ च्या निवडणुकीत काँग्रेसने समाजवाद्यांच्या सुखस्वप्नांचा धुव्वा उडविला. समाजवाद्यांचा शक्तिपात झाला. अच्युतरावांनी घेतला राजकारणी संन्यास, तर जयप्रकाशांचा त्रिदंडी संन्यास. रावसाहेब–नरेंद्र देवांची भूमिका कुलगुरूची.

केरळमधील कम्युनिस्टांचा काटा काढण्यासाठी म्हणून काँग्रेसने पट्टम थाणू पिल्ले यांना मुख्यमंत्रीपद देऊ केले तेव्हा या उपाशी लोकांनी आपली ताकद किती, आपल्याला ती जबाबदारी झेपेल की नाही, याचा विचार न करता सत्तास्वार्थ साधला. कम्युनिस्ट संप मोडून काढताना केरळात एके ठिकाणी गोळीबार करावा लागला. या प्रकरणावर भारतीय ' अन्युरीन बेव्हन ' डॉ. राम मनोहर लोहिया इतके तडकले की त्यांनी प्रजासमाजवादी पक्ष सोडून संयुक्त समाजवादी पक्ष

काढला. (आचार्य कृपलानींचा कृषक प्रजा पक्ष + समाजवादी पक्ष यांची संयुक्त बेरीज असलेल्या प्रजासमाजवाद्यातून लोहिया गट बाहेर पडल्यावर संयुक्त समाजवादी पक्ष होतो हा 'पूर्णातून पूर्ण वजा केले असता पूर्ण उरते' या उपनिषदातील तत्त्वज्ञानाचा आविष्कार नव्हे का ?)

डॉक्टरसाहेबांनी घोषणा दिली 'सात वर्षात सत्ता' (कोणाकडे ?) पुढे अंग्रेजी हटावा'ला 'अंग्रेजी-नेहरू' द्वेषाचे आवरण चढले. त्यातून 'काँग्रेस हटाव' या घोषणेचा जन्म झाला. हटावातून उत्पन्न होणारी दंगल-जाळपोळ-डांवर आदि गोष्टी नाजूक प्रसोपाला मानविणे कठिण. त्यात पं. नेहरू प्रसोपाचा 'वीक पॉइंट' तरी पण 'प्रयत्ने वाळूचे' म्हणून समाजवादी एकजुटीचा गड विनाअट सहकार्याच्या वाळूच्या आधारावर बांधण्याचे ठरले, व दोन पक्ष एकत्र आले.

पण त्यांच्या पहिल्याच अधिवेशनात, १९६४ साली बनारस येथे अध्यक्षीय मिरवणूकीच्या वेळी संसोपातील राजनारायण गटातील लोकांनी प्रजासमाजवाद्यांशी धक्काबुक्की केली. (राजनारायण म्हणजे बनारसचा हिंदी बाळ ठाकरे !) इतकेच नव्हे तर पं. नेहरू यांना श्रद्धांजली वाहणारा ठराव मांडू दिला नाही. तेव्हा हे पंडितजी भक्त महाराष्ट्रीय प्रजासमाजवादी चिडले. त्या रात्री आठ तासाच्या वादळी बैठकीत एस. एम. जोशी धीर धरण्याची विनंती करत असताना, 'वेगळे व्हायचे मला' असे यांनी ठरविले. पुन्हा प्रजासमाजवादी पक्ष. या फाटाफुटीत प्रसोपाचा पुन्हा शक्तिपात झाला. 'संसोपात राहून पक्ष सुधारण्याचा प्रयत्न करण्यासाठी एस्. एम्. संसोपाच्या अध्यक्षस्थानी राहिले. (एस. एम. चे सोनपत अधिवेशनात राजनारायण गटाने पानपत केले. एस. एम. गटातील माणसांना बोलूसुद्धा दिले नाही.)

पुढे पाक युद्धानंतर जनसंघाचा जोर वाढतो असे पाहून सेवादलीय मराठी समाजवाद्यांच्या पोटात दुखू लागले, त्यातून पुन्हा एकीकरणाची बांग देण्यात आली. पण गोरे, दंडवते ही मराठी मंडळी या वेळी प्रथम धोरणात व तत्वात एकमत होऊ दे तरच एकीकरण या भूमिकेवर अडून बसली.

१९६७ च्या निकालाच्या पार्श्वभूमीवर परत एकीकरणाचे 'कण रगडणे' सुरू झाले. पुन्हा एकीचे आवाहन, पुढाऱ्यांच्या बैठका, पत्रके-मतभेद हे गाडे चालूच राहिले. इतकेच नव्हे तर जगजीवनरामांची सहकार्याची तार येऊनही प्रसोपा-संसोपा वाटाघाटी पुढे चालूच राहिल्या.

पण भातुकलीतले मीलन मोडले. वाटा वेगळ्या झाल्या. त्यातून संसोपा बड्या आघाडीत गेली, तर प्रसोपाने जमेल तेथे आघाडी केली—

१. केरळात—नवकाँग्रेस + उजवे कम्युनिस्ट + मुस्लीम लीग आघाडी.

२. बंगाल—उजवे कम्युनिस्टांसह आघाडी.

३. तामिळनाडू—द्रमकुच्या नेतृत्वाखालील सात पक्षाची आघाडी. द्रमुक +

:. कम्युनिस्ट + मुस्लीम लीग (केरळमधील धोरणाचा एकवेळ बचाव ठीक. पण तामिळनाडू मुस्लीम लीगच्या गळ्यात गळा? नानासाहेबांच्या य बाबतच्या उत्तराची वाट पाहत आहे.)

४. महाराष्ट्रात शे. का. पक्ष उ. कम्युनिस्टांबरोबर सहकार्य.

तरीसुद्धा भिन्न पक्षांची तत्त्वशून्य आघाडी म्हणून 'बड्या आघाडी 'वर टीका करावयास हे 'तत्वनिष्ठ' लोक तयार होते आणि आज इंदिरा विजयाचा अर्थ लावताना 'बड्या आघाडीचे राजकारण जनतेने धुडकावून लावले' हे निर्भेळ विश्लेषण करण्यास नानासाहेब मोकळे.

असे हे 'तत्वनिष्ठ' प्रजासमाजवादी आज जरी उजव्या कम्युनिस्टांबरोबर असले तरी यांचा डांगे द्वेष वा कम्युनिस्ट पित्त उसळणार नाही कशावरून? प्रसोपा संसोपा 'परी तुझ्या वाचून करमेना.'

म्हणून जवळ असली तर 'जमेलच 'याची खात्री काय? (पुन्हा नानासाहेबांनी 'तत्वनिष्ठ' अटी घालण्यास सुरुवात केली आहे) संसोपातील राजनारायण विरुद्ध जॉर्ज-मधू लिमये वादाची परिणती त्यांच्यात 'राजकेट' व 'जॉर्जकेट' होणार नाही कशावरून? शे. का. पक्षवाले या शहरी व बामणी पक्षावर विश्वास ठेवतील का? का शे. का. पक्षाला सध्याचे 'साहेबां 'बरोबरचे गुपचुप संबंध तसेच ठेवायचे आहेत? रिपब्लिकन पक्षाचा या उच्चवर्णीय लोकांच्या पक्षावर विश्वास बसेल का? उजवे कम्युनिस्ट संसोपाला 'बड्या आघाडी 'त सामिल झाल्याच्या 'महान अपराधा 'बद्दल क्षमा करतील का? कम्युनिस्टांना पुन्हा—'आघाड्यांचे राजकारण' म्हणून हा स्प्रिंग बोर्ड वापरायचा आहे?

असे अनेक चक्कर आणणारे प्रश्न दत्त म्हणून उभे राहत आहेत हे 'एकजुट-वाद्यांनी' लक्षात घ्यावे.

सध्या तरी अशी एकजुट शक्य वाटत नाही. झाली तर टिकेल अशी खात्री देता येत नाही. कारण हे समाजवादी सुशिक्षित बाबू म्हणूनच 'बोलभांडू' आहेत. यांची समाजवादी कल्पना पाश्चात्य व स्वप्नाळू आहे. ग्रामीण भारताचे जातीयनिष्ठ आधारावर उभे असलेले मन यांना समजले नाही. समाजवाद्यांच्या न्याय-अन्यायाच्या आधुनिक कल्पना व ग्रामीण कल्पना यात फार मोठे अंतर आहे. ही मानसिक बेडी तोडण्याचे काम सोपे नाही. त्यासाठी लक्षावधी निष्ठावंत कार्यकर्ते ओतावे लागतील. या कार्यकर्त्यांनी खेड्यातील लोकांची मने जिंकून पारंपरिक नेतृत्व हटवून नेतेपण स्विकारले तर बदल होण्यास सुरूवात होईल. यासाठी राज्यसत्ता वा राजसत्तेचे पाठबळ आवश्यक आहे. यापैकी एक तरी गोष्ट समाजवाद्यांना मिळविणे शक्य आहे का? मुख्य म्हणजे या संथ गतीच्या क्रियेला परराष्ट्रे अवधी देतील का, हा प्रश्न आहे? नाहीतर केमाल पाशाची 'लष्करी दबावाने शिक्षण' ही पद्धत स्विकारावी लागेल. या भाबड्या समाजवाद्यांना हा बदल मानवेल का?

असा ग्रामीण भारत हा काँग्रेसच्या यशाचे रहस्य आहे. काँग्रेस आपल्याच पाया-वर धोंडा पाडून घेण्यास तयार होईल का ?

पण हे सगळे पुढले प्रश्न आहेत. सध्या आपआपसातल्या भांडणामुळे व विभिन्न स्वभावामुळे आज तरी समाजवादी एकजुट वा आघाडी शक्य वाटत नाही. कारण हे समाजवादी बोलके पक्षी आहेत. यांना पक्षाच्या पिंजऱ्यात (झोपडीतसुद्धा) राहून समाजवादाची किलबिल करावयास आवडते. एकत्र आणले तर एकमेकांना चोची मारतील. गोंगाट करतील.
म्हणूनच समाजवादी शक्तीची एकजूट हा Greatest show on the earth झाला आहे.

आणि—

प्रजासमाजवादी–संयुक्त समाजवादी विलिनीकरण हा 'Greatest joke on the earth' झाला आहे.

□ □ □

---

## दीपकळ्या धाकुट्या

पृष्ठ ३१ वरून

असे काहीतरी अनुभवायला मिळेल असा भ्रम होता. इथे निष्ठा आहेत पण रूढींचे जोखड नाही. शिस्त आहे पण मातृछायेच्या आवारात मुलींना स्वातंत्र्य आहे. संस्कार आहेत पण त्यात विज्ञाननिष्ठा आणि कर्तव्याची जाणीव आहे. चौकसपणा आहे. मुलींमध्ये नवे, नवे विचार समजून घेण्याची प्रवृत्ती आहे.

आपणाकडे परदेशी विद्यार्थ्यांना सुट्टीत बोलावून 'मैत्री' वाढविण्याची फॅशन आता रूढ होऊ लागली आहे. मला वाटते, या कोकणच्या मुलींनी अजून 'घाट' पाहिला नाही. जीवनाची विविध अंगे न्याहाळलेली नाहीत. या मुलींनी महाराष्ट्रातल्या निरनिराळ्या कुटुंबात पाहुण्या म्हणून गेले पाहिजे. तुम्ही आम्हीही आग्रहाने त्यांना बोलावले पाहिजे. गोऱ्या कातडीचा, परदेशी विद्यार्थ्यांच्या आकर्षणाचा सोस थोडा बाजूला ठेवून महाराष्ट्राच्या विविधतेचे दर्शन या नव्या पिढीला घडविले पाहिजे. या मातृछायेतल्या 'धाकुटचा दीपकळचा' जोपासल्या पाहिजेत.

मातृछायेचे कार्य तसे लहान आहे. पण हे लहान कार्यच शहरातून रहाणाऱ्या अनेकांना मार्गदर्शक ठरण्याचा संभव आहे.

□ □ □

इस्रायलचे आणि ज्यू जमातीचे
प्रतिनिधित्व करणाऱ्या
एका 'जेरुसलेमकराने' विश्वपुरुषाला
आक्रंदून केलेले आवाहन...

**चित्तरंजन घोटीकर**

# 'विश्वपुरुषा, जेरुसलेम माझं आहे!'

रे विश्वपुरुषा !

तुला कदाचित वाटत असेल, की पृथ्वीच्या कक्षेच्या बाहेरील कुठल्यातरी एखाद्या ग्रहावरील मी रहिवासी आहे नि तिथून हे पत्र लिहीत आहे ! पण लक्षात ठेव, हा तुझा निव्वळ भ्रम आहे. कुठलाही 'ग्रहवासी' नाही मी ! मी आहे एक पृथ्वीवासी... एक 'जेरूसलेमकर...' एक 'जेरूसलेमाइट !' तुझ्याप्रमाणेच असाच पृथ्वीच्या घनदाट मातीच्या एका कणाचा अधिपती ! तुझ्याप्रमाणेच रक्तामासाचा ! भावनांचा ! सवेदनाक्षम मनाचा ! जीवनाची, स्वातंत्र्याची, स्वभूमीची स्वराष्ट्राची दरदरून आसवती असलेला ! जे जे माझं म्हणून होतं नि पाशवी, रानटी, अमानुष शक्तीच्या नि हिंसेच्या बळावर 'जे माझं' माझ्यापासून बळजबरीनं हिरावून घेण्यात आलं – आजच नाही तर हजारो वर्षांपूर्वी त्या 'केवळ माझ्याच सर्वस्वाचा' स्वामी आहे मी ! गेली कैक युगं हे तू हेतूपुरस्सर म्हणा. अहेतुकपणे म्हणा किंवा कुणी तुझे कान फुंकल्यामुळे म्हणा, पण विसरला होतास... स्वतःचा मेंदू गहाण टाकल्याप्रमाणे, निर्बुद्धपणे वागत होतास.



पण आजवरच्या तुझ्या चुका, तुझी पापं, तुझे अक्षम्य प्रमाद, सारं सारं गंगेला मिळालंय. त्याबद्दल तुला पश्चाताप होत असेल तर ते सद्भाग्य व सुचिन्ह मानावं लागेल. पश्चात्ताप-जलाच्या पुण्यसिंचनानं साऱ्या पापांचे धुलीकण पावन होतात... त्यांचं अमृत बनतं! निदान त्यातलं द्वेषाचं जहर तरी धुवून काढलं जातं! पापांचा पस्तावा हेच खरं परिमार्जन, मनाचं शुद्धीकरण होय! आणखी वेगळ्या शिक्षेची आवश्यकता नसते अशा प्रमादांना! चुका होणारच!

पण...पण अशी चूक पुन्हा होणार नाही याची सदैव दक्षता घे...स्वत:प्रमाणेच दुसऱ्यालाही जीव असतो नि तो जगविण्याची आसक्ती असते, याबद्दल जागरूक राहा!

दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी पिण्याचं, भिकेच्या परान्नावर जगण्याचं सोडून दे। विवेकबुद्धी आहे ना तुझ्याजवळ?

'माझ्या जेरूसलेम'चा एक नागरिक आहे मी! माझ्या असंख्य नि अनंत भ्रात्रांचा एक अपरिहार्य नि असंदिग्ध परमाणू! एक निर्विवाद घटक! त्यांच्याच रक्ताचा!

तुझ्यापुढे मोकळे करायला आज माझ्या हृदयात कोटी कोटी विचार दाटून झाले आहेत. अरे, तुलाही मी माझंच मानलंय. म्हणूनच सारं तुला सांगून मी माझं घुसमटलेलं, गुदमरलेलं मन हलकं करणार आहे. व्यथांना वाट मोकळी करून देणार आहे.

धूर्त राजकारणी किंवा कसलेला, हजरजबाबी नि वाक्पटू मी नसल्यामुळे मला डावपेच, शब्दांची कसरत जमणार नाही. तुझा खुषमस्कऱ्या होण्याचा, तुझं मत-परिवर्तन, लांगूल चालन करण्याचा प्रश्नच नाही ! तुझं काहीही देणं लागत नाही मी ! मी आहे एक सरळसोट, मनात येईल ते भडाभड बोलून टाकणारा भाबडा ! लक्षात ठेव, जेरूसलेम काही तू वसविलेलं नाहीस ! जेरूसलेममध्ये कधी राहिलाही नाहीस तू ! क्षणभरही ! एवढंच काय, पण यवनांच्या, हैवानांच्या टोळधाडी जेव्हा त्या पवित्र वास्तूवर निखारा ठेवण्यास सरसावून धावून आल्या तेव्हा तू तिच्या संरक्षणार्थ कधीही पुढे आला नव्हतास. मग आम्हीच जर आमचं घर त्यांना नेस्तनाबूत करू दिलं असतं तर आमच्यासारखे चांडाळ, कपाळकरंटे, घरभेदे आम्हीच नसतो का ठरलो !

विसरू नकोस एक जागतिक सत्य, की न्यूयॉर्क, लंडन, पॅरिसच्याही अगोदर एक जेरूसलेम नावाची वास्तू या अवनीतलावर अस्तित्वात होती ! ज्यावेळी बर्लिन, मॉस्को, लंडन नि पॅरिस अवाढव्य, घनदाट जंगल नि दलदलीची ठिकाणं होती. त्यावेळी नि तेव्हापासून ज्यू मानवता या वास्तूत समृद्धीनं नांदत, भरभराटत होती. किती युगं लोटली या वास्तवतेला आठवतंय तरी का ? या जमातीनंच मानवतेला मानव्याची, नीतीची, सुसंस्कृतपणाची, परधर्मसहिष्णुतेची एक अजरामर देणगी दिली... स्वतःजवळचं हे खरखुरं नि देण्यासारखं भांडार कायमचंच देऊन टाकलं. आणखी काय द्यायला हवं होतं !

याच जेरूसलेममध्ये तत्त्ववेत्ते नि द्रष्टे निर्माण झाले नि विजेच्या झगझगीत झोताप्रमाणे त्यांची वाणी विश्वाला प्रज्वलित करून गेली. 'आमच्या मार्गानं आम्हाला जाऊ द्या', म्हणून जगाच्या वेशीवर कंठरवानं ओरडून सांगणारी, यवनांच्या हिंस्त्र हल्ल्यांना प्राणपणानं झुंजून परतवणारी, रक्तबंबाळ होऊन धारा-तीर्थी पडलेली मानवता इथे नांदली. या मानवतेनं शरणागती पत्करण्याऐवजी, आगीच्या भक्षस्थानी पडलेल्या आपल्या पवित्र मंदिरांच्या, घरांच्या पेटत्या, धग-धगत्या ज्वालात स्वतःला झोकून दिलं. आणि केवळ संख्याधिक्याचं जेव्हा यवनांची सरशी होण्याची चिन्हं दिसू लागली, तेव्हा याच मानवतेनं घोर प्रतिज्ञा केली, 'जेरूसलेम स्मृतीतून नाहीसं होण्याअगोदर आमच्या जिव्हा झडतील; आमचे बाहू तुटून पडतील; आमचे डोळे मिटतील; आमचे देह मातीत मिसळतील !'

जवळजवळ दोन हजार वर्षं आम्ही तुम्हाला नकोशा पाहुण्यांप्रमाणे झालो होतो.

थ्वीच्या अथांग पाठीवर वणवण भटकताना दररोज आम्ही प्रार्थना करीत होतो, आज ना उद्या आम्ही आमच्या वास्तूत सन्मानानं परत येऊच येऊ...मालक म्हणून! दिवसातून तीन वेळा आम्ही त्या जगदीशाची याचना करीत होतो, करूणा भाकत होतो, 'विश्वाच्या दशदिशांत विखुरलेल्या आम्हाला एकत्र, एके- ठिकाणी आमच्या गृहात आण...समृद्धीनं, सुदृढपणे नांदव...ऐश्वर्यानं, अस्मितेनं जगू दे.. नि हे जगनियंत्या, तूही तिथे नांदायला ये आमच्याबरोबर! तुझीच आहे ही वास्तु! वचन दिलंयस ना तू तसं एकदा?'

आशा होती आम्हाला की, या वर्षी नाही तरी पुढल्या वर्षी आम्ही जेरुसलेमचा उंबरठा नक्कीच ओलांडू! विश्वपुरुषा, तुला काय वाटलं, तुझ्या रानटी कायदे- कानूंनी, धाकधपटशांनी, मध्ययुरोपीयांच्या चिथावणीनं रशियात झालेल्या आमच्या- वरील पूर्वनियोजित, संघटीत हल्ल्यांनी नि कत्तलींनी, माझ्याच घरात जुलुमानं, शस्त्रबळावर घुसून केलेल्या माझ्या हकालपट्टीनं, माझ्या अन्नान्नदशेनं, उपासमारीनं, आम्ही राहात असलेल्या विभागात केलेल्या आमच्या कोंडीनं, आमच्यावर बळ- जबरीनं लादलेल्या बाप्तिस्मांनी, आमच्या धर्मावरील, मातृभाषेवरील दडपशाहीनं आणि आमच्या होऊ-घातलेल्या समूळ निःपातानं, संहारानं आम्ही बधणार होतो? हे सारं निःसंतान चालू असताना तू मूग गिळून मख्खासारखा स्थितप्रज्ञासारखा घुम्म बसला होतास, हीच खरी शोकांतिका होती. तरीही आम्ही मोडलो नाही... थाकलोही नाही. गॅसचेंबर्समध्ये आमच्या कित्येक कोवळ्या नि तरुण, विजगिषु, पिढ्या गुदमरून मेल्या. पण उरलेल्यांचा केसही वाकडा झाला नाही, विसरू नकोस

विश्वबंधुत्वाच्या, एकात्मतेच्या दांभिक बाता मारणाऱ्या विरपुरुषा! अरे मशिनगन्सनी पाखरांप्रमाणे टिपलेल्या माझ्या सगेसोयऱ्यांच्या मृतदेहांची वासलात लावायची गिधाडं-कुत्र्या-मांजरांनी! तुझ्या जातवाल्यांच्या मृतदेहांचे मात्र इत- मामानं अंत्यसंस्कार! ज्यूंच्या मृतदेहांनाही मोल नाही!

तुला वाटतं, माझ्या घराच्या नाकेबंदीनं मी शरण येईन म्हणून? अरे, नरक- पुरीचाही अनुभव घेतलेल्यांना आणखी कसल्या धमक्या देतोस? नरकपुरी? होय; तूच निर्माण केली नरकपुरी! तिलाही पुरून उरलो आम्ही! आणखी काय काय उरलंय तुझ्या युद्धसाहित्यगृहात माझ्यासाठी, बोल?

स्वतःला सुसंस्कृत, सभ्य नि लोकशाहीवादी म्हणवणाऱ्या राष्ट्रांकडून माझ्या घरकुलावर—जेरुसलेमवर—दोनदा बाँबचा पाऊस कोसळताना उघड्या डोळ्यांनी पाहिलंय मी! १९४८ मध्ये, माझ्याच घरात माझा पुनः प्रवेश झाल्यावर, काही दिवसांनीच माझ्या भगिनींच्या नि अर्भकांच्या चिंधड्या उडाल्या, कुठे गेली होती तुझी सारासार विवेकबुद्धी, अन्यायाची चीड, सदसद्विवेकबुद्धी त्यावेळी? आणि हे केव्हा घडलं? ज्यावेळी मी माझ्या घराचं 'मुक्तांगण' जाहीर केलं तेव्हाच ना? जेरुसलेम 'इंटर नॅशनलाइझड् सिटी' करण्याचं मान्य केलं तेव्हा ना? ब्रिटिश

सोजीर, अरब बंदुकधारी नि अमेरिका–निर्मित तोफखाना यांनी हातमिळवणी करून माझ्या घराची धूळदाण उडविण्याचा पाताळयंत्रीपणा केला, माहित आ... मला !

त्यानंही भूक शमली नाही तुझी ! प्राचीन जेरुसलेमच्या वैभवाची होळीच क... ण्याचा घाट घातलास तू ! माझ्या जेरुसलेमाइट भ्रात्यांची अमानुष कत्तल केली... तू...ज्यू रक्ताचे पाट वाहविलेस... आमची सिनॅगॉग्ज्, आमची प्रार्थना स्थळं, विद्या... मंदिर, ज्यू–स्मशानभूमी, सारीसारी आमची संस्कृतीस्थानं उध्वस्त केलीस तू ! अरे, आमच्या पूर्वजांच्या कबरींचे मौल्यवान संगमरवरी दगड चार दिडक्यांच्या निर्लज्ज लालसेनं नि हावरेपणानं विकलेस तू ! कशाकरता ? तर तुझी घरं, कोंबड्यांची खुराडी, कुत्र्यांना राहायच्या जागा, लष्करी छावण्या उभारण्याकरता ! फार काय, तुझ्या संडास नि मुताऱ्यांकरताही तू ते दगड वापरून माझं नाक कापलंस ! नीचतेचा, अधमपणाचा किती खालचा स्तर गाठलास तू ! हीच का पारख केलीस सोन्याची ?

कुठं गेली होती तुझी मानवता ? तुझा मानव भूतदयावादी धर्म ? तुझी फूस असल्याशिवायच का घडला हा अनाचार ? अनर्थ ?

आमच्या अत्यंत पवित्र स्थानाचे–मंगल अशा 'वेस्टर्न वॉल'चे – सारे ... जॉर्डननं बंद केले गेले तेव्हाही तू निषेधाचा ब्र काढला नाहीस ! युद्धानंतर अ... अनैसर्गिक नाकेबंदी न करण्याचं वचन देऊनही जॉर्डनने ही दारं बंद केली आणि युद्ध ? 'संयुक्त राष्ट्रसंघटणे'च्या निर्णयाला पायदळी तुडवून आमच्यावर लादलेलं युद्ध ! या 'पवित्र भिंती'च्या पल्याड लपून भ्याडप्रमाणे जॉर्डननं माझ्या निष्पाप नागरिकांवर बाँबचा वर्षाव केला तेव्हा स्थितप्रज्ञाप्रमाणे तू चूपचाप बसलास !

अरे, ज्यूंच्या जीविताला, भावनांना काहीच मोल नाही ? का ज्यू मानवच नव्हेत ? काय घोडं मारलं होतं ज्यूंनी तुझं, की एवढी सूडबुद्धी दाखवावीस तू ?

सुंदर बर्लिनची रक्षा झाली त्यावेळी हृदय फाटून ढसढसा रडलास तू... बर्लिनच्या वीरांना वाचविण्यास विमानं धाडलीस ! पण जेरुसलेममध्ये कोंडल्या गेलेल्या निष्पाप ज्यूंची उपासमार टाळण्याकरता अन्नाचा एक कणही पाठविला नाहीस तू ! बोल, का ? का माती खाऊन जगणार होतो आम्ही ?

पूर्व जर्मनीनं बर्लिनचं हृदय चिरून 'बर्लिन–भिंत' रातोरात बांधून काढली तेव्हा जगाच्या राजकीय बाजारपेठेत उभा राहून पूर्व जर्मनीविरुद्ध केवढ्या भ...र निषेधाच्या गर्जना केल्यास तू ! सांग, केल्यास ना ? पण माझ्या घरामधून–जे...लेममधून–माझं हृदय भेदणाऱ्या 'त्या दुसऱ्या भिंती' संबंधात का बसली ... तुझी, सांग ना ? का हा पक्षपात ? पंक्तीप्रपंच ?

१९४८ नंतर, एकोणीस वर्षांनी डझनभर अरबराष्ट्रांनी माझ्या जेरुसलेमवर आग ओतली तेव्हा कुठे निद्रिस्तपणे दडून बसला होतास तू ? नाही म्हणायला एकदा

जाग आली होती तुला ! केव्हा ? जेव्हा जेरुसलेमचं पुनरुथ्यान, पुनर्जीवन केलं न आम्ही, तेव्हा ! आहे कबूल ? तू झोपेतून खडबडून उठलास नि टाळ्या पिटीत, टिऱ्या बडवीत, 'न्याय, न्याय' म्हणून तारस्वरात गर्जत सैरावैरा पळून निव्वळ भास निर्माण केलास की, 'पहा, ख्रिश्चॅनिटी किती विशाल अंतःकरणाची आहे !' तुला कितीही अप्रिय नि कटु वाटलं, तरी लक्षात ठेव, तुझे खायचे नि दाखवायचे दात ओळखलेत मी...म्हणूनच बजावतो, जेरुसलेमचा स्वामी मीच आहे, ज्यू !

वारा येईल तशी पाठ फिरवू नकोस...शब्दांच्या कसरती करून कोलांट उड्या मारू नकोस.. या बोटावरची थुंकी त्या बोटावर घेऊ नकोस ! तुझ्या शब्दांना माझ्याबद्दलच्या कणवेचा, कोरड्या सहानुभूतीचा मुलामा कितीही दिलास, तरी त्यांना तुझ्या माझ्याबद्दल असलेल्या युगायुगांच्या 'प्रेज्युडीसेस्'चाच वास मारतोय!

मी 'माझ्या झोपडी'त परत रहायला आल्यामुळे तुझा तिळपापड झाला असेल; तुझ्या वाचाळ, सैल ब्रह्मज्ञानाला नि वेदान्ताला गैरसमजाच्या (किंवा अपसमजाच्या) गाठी पडल्या असतील, तर तो दोष तुझाच आहे ! माझा नाही ! तुझ्या चुका सुधारायच्या आहेत तुला ! मला नाही ! जेवढ्या लवकर तू शुद्धीवर येशील तेवढं तुझ्याच हिताच्या दृष्टीनं बरं, नाही का ? ज्या अमानुष अवस्थेतून होरपळून आमच्या हजारो पिढ्या विजिगिषु म्हणून बाहेर पडल्या त्या परिस्थितीनं इतिहासानं एक धडा शिकवलाय आम्हाला; गृहहीन अवस्थेत चिरकाल नाही राहू शकत आम्ही ! भिकेची झोळी नाही बाळगू शकत आमच्या गळ्यात ! अमंगाशी नाही संग करू शकत ! धिक्कारार्ह तत्त्वज्ञानाची नाही कास धरू शकत ! अस्मिता झटकून टाकून 'भटक्यां'च्या तत्त्वज्ञानाशी नाही करू शकत समझोता ! आमच्या अस्तित्वावरच उठलेल्या राक्षसी तत्त्वज्ञानाशी कसली अॅडजस्टमेंट ? तू तरी करशील ?

इसवीसन सत्तर नंतर आज प्रथमच जेरुसलेममध्ये प्रत्येक प्रजाजन समान हक्काच्या चांदीच्या ताटात धार्मिक राजकीय, सामाजिक नि आर्थिक स्वायत्ततेचं अन्न उपभोगतोय ! तुला मात्र काही वंश नि मानवसमूह इतरांहून श्रेष्ठ वा कनिष्ठ वाटत आले.

अरे, तलवार नि बंदुकीची किळस, घृणा आम्हालाही वाटते. पण तिची सांगड आमच्याशी घातलीस तूच ! म्यान करण्याऐवजी तलवार उपसायला उद्युक्त केलंस आम्हाला !

विश्वशांतीकरता आम्हीही आसुसलेलो आहोत बरं ! पण १९४८, १९५७ किंवा १९६७ मधील ही शांतता नव्हे ! तुला तसं वाटत असल्यास नाईलाज आहे माझा! शांततेची तुझी व्याख्या तरी कळू दे !

कित्येक युगांच्या ध्येयशून्य व पिसाट भ्रमंतीनंतर आज मला माझं 'घरकुल' गवसलंय ! त्यातच मी आज रहातोय, रहाणार आहे.

१ मे १९७१

किती मंजुळ नाद आहे नाही 'माझं घर' या शब्दात!

आमच्या वाडवडिलांना दिलेली वचनपूर्ती आज आम्ही करीत आहोत, 'जेरुसलेम पुन्हा एकदा शाकारू! सजवू–नटवू!'

माहित आहे, जेरुसलेममध्ये किती काळ नांदणार आहोत आम्ही? पुढच्या वर्षापर्यंत...त्याच्या पुढच्या...त्याच्याही पुढच्या...त्यानंतरही...अगदी कालान्तरापर्यंत! काल संपेल, पण आम्ही उरणार आहोत. अरे, जेरुसलेम माझंच, आमचंच ज्यूंचंच आहे...

त्रिवार!

अरे, कुणाला आपली झोपडी प्रिय नसते?

ऐक कान देऊन माझ्या घरकुलाचं वैभव...खानदान!

राष्ट्राभिमानाच्या, मातृभक्तीच्या डागडुजीनं माझं चिमुकलं घरकुल भक्कम पायावर उभं आहे...त्याला राष्ट्रतेजाचं नि अस्मितेचंही जोतं लाभलंय...प्राचीन ज्यू संस्कृतीचं अंगण आहे त्याला...उज्ज्वल इतिहासाचं, परंपरेचं तुळशीवृंदावन! रोमन सम्राटांनाही धूळ चारणाऱ्या पूर्वजांच्या धडाडीची पुष्करणी थुईथुई नाचत आहे...अर्वाचीन बुद्धिवादी ज्यू जमातीच्या सदिच्छांची, सद्भावनांची शीतल वनराई...आणि 'जगा नि जगू द्या!' तत्त्वज्ञानाचं मंगल तोरण दिमाखात डोलतंय माझ्या घरकुलाच्या प्रवेशद्वारावर! आम्ही आमच्या घरचे राजे–सम्राट! आमेन!

[ विश्वकुटुंबाचा एक घटक, जेरुसलेमकर ].



सौ. पुष्पा भावे

# पाचोळा

श्री. रा. रं. बोराडे या कथाकाराची 'पाचोळा' ही कादंबरी रचनेच्या दृष्टि-कोनातून दीर्घकथेसारखी एकसूत्री आहे. परंतु आज वाङ्मयाच्या विविध घाटांच्या सीमारेषा इतक्या पुसट झाल्या आहेत की दीर्घकथा आणि कादंबरीतील भेद स्पष्ट करणे अवघड झाले आहे. एक मात्र निश्चित, कादंबरीची रचना त्यातील अनुभवानेच मर्यादित होणे वाङ्मयकृतीच्या दृष्टीने श्रेयस्कर असते. (अन्यथा तीन अंकी नाटयरचनेच्या संकेतामुळे अनेक चांगल्या नाटयकृतींचे तिसरे अंक उपरे झालेले आढळतात.) श्री. बोराडे यांनी वाङ्मयप्रकाराच्या रचनेतील नवस्वातं-त्र्याचा योग्य असाच उपयोग केलेला दिसेल.

या कादंबरीच्या भाषेकडे पाहता, ती प्रादेशिक आहे, असे ठाम विधान केले जाण्याची शक्यता आहे. परंतु या कादंबरीचा मूलअनुभव विशिष्ट प्रदेशाशी-वाता-वरणाशी निगडित नाही. एका ध्यासाने वेडा झालेल्या एका अतिसामान्य माणसाची आणि त्याच्या छोटया कुटुंबाची ही कथा आहे आणि ही कथा सांगताना श्री. बोराडे यांनी पिता-पुत्राच्या नात्याच्या गुंत्याला प्राधान्य दिलेले आहे. या कादंबरीचे निवेदन नायकाच्या पत्नीने केलेले असल्यामुळे वर उल्लेखिलेला नात्याचा गुंता तीव्रपणे व्यक्त झाला आहे. एका अडाणी, समंजस स्त्रीचे हे निवेदन अतिशय संय-साधे आहे, प्रांजळही आहे; त्यामुळे ही कादंबरी आत्मचरित्रातील एखाद्या प्रकरणा-सारखी वाटते.

सांकेतिक प्रादेशिक कथा-कादंबऱ्यांप्रमाणे या कादंबरीतही संघर्षाला प्रारंभ व्यवसायातील वैमनस्य-वैरामधूनच होतो. ज्या 'गरडासंग' आपल्या नवऱ्याने वैर केले तो-'समद्या गावानं ववाळून टाकलेला. लई खडूस की! ...गावातल्या भल्या भल्या लोकान्नांना त्येनं हात दावलाया.' (पृ. ३) असे ज्यावेळी 'पारबती' आप-ल्याला सांगते त्यावेळी या कादंबरीविषयी ज्या अपेक्षा निर्माण होतात, त्याला पुढील वाचनात सुखद धक्का बसतो. गरडाने गावात नवा शिंपी आणल्यामुळे नायकाचा धंदा बसू लागतो, किंवा पुढे त्या शिंप्याने फितवल्यामळे तालुक्यातला शिंपी नायकाचे पैसे बुडवतो-घरातली मशीन चोरीला जाते, इत्यादी खरे असले

तरी कादंबरीच्या विस्तारात हे निमित्तमात्र झाले आहे. गरडाच्या मुलाशी झालेल्य पहिल्या भांडणापासून तो पोटच्या पोराशी झालेल्या अखेरच्या मारामारीपर्यंत—आपल्याला कोणी मानीत नाही— आपली बूज राखली जात नाही, हा नायकाच मनोगंडच कथाविकासाला कारणीभूत झाला आहे. अशा समजुतीने विथरलेला नवरा एका बाजूला आणि आपल्या 'बा'ने आपले शिक्षण तोडले, आपल्याला परक्याघरी मजुरी करायला लावली या विचाराने वडिलांविरुद्ध उठलेला एरवी समंजस असणारा मुलगा, यांच्या कात्रीत सापडलेल्या पत्नीची-आईची ही कहाणी आहे. या अडाणी स्त्रीच्या नजरेतूनच, जाणीवेतूनच हा अनुभव लेखकाने सादर केला आहे. लग्नापूर्वीची आपली स्थिती आणि लग्नानंतरची स्थिती यांचे वर्णन करताना 'ढेकळाखाली कोंब दबावा असं मन दबलेलं. ढेकूळ बाजूला झाला, कोंब टरारला' असे ती करते; तर वर्तमानकाली संसाराचे वर्णन 'घूस शिरल्यावनीच झालनं घराला. इनं बीळ पडलं म्हणून बुजवायला जावं तर लगेच दुसरीकडं दुसरं बीळ तयार.' असे केले आहे. आपल्या मोडक्यातोडक्या संसारावर समाधान न मानता स्वतःच्या अहंकारासाठी सारे उधळणाऱ्या नायकाच्या मुलानेही बापावर सूड उगवण्याच्या भरात स्वतःचे नावाजले गेलेले सुधेपण भिरकावून दिले आहे, तर बोलताही न येणाऱ्या त्याच्या बहिणीने भुकेसाठी आत्रस्ताळेपणा करून घरातल्या एकुलत्या एका 'जरमन वाटी'चा तळ फोडला आहे. या साऱ्या विध्वंसाला आवर घालण्याचा प्रयत्न करणारी स्त्री उदरात एक नवा जीव वाढवीत आहे—ज्याचा उल्लेखच तिच्या पतीच्या मृत्युला कारणीभूत झाला आहे. वरवर एका कुटुंबाच्या ऱ्हासाची वाटणारी ही कहाणी हळूहळू मानवी प्रतिक्रियांचे एक विदारक लळित उभे करते. म्हणूनच प्रारंभी सुचविल्याप्रमाणे ही कादंबरी प्रादेशिकतेच्या संकुचित वर्तुळात बद्ध झालेली नाही.

श्री. उद्धव शेळके यांच्या 'धग'सारख्या कादंबरीने मराठी प्रादेशिक कादंबरीला जी वेगळी वाट दाखवली तिची प्रसादचिन्हे अलीकडच्या 'दूर गेलेले घर' अथवा 'पाचोळा' या कादंबऱ्यातून दिसू लागली आहेत. आजची प्रादेशिक कादंबरी अधिक 'लिरिकल'ही व्हायला लागली आहे. या कादंबरीच्या अंती येणारी 'वाळूचा कट्टा फुटल्यावनी झालं मला. मोप मोप पानी कोंडायला बगा यले; पर वाळू काय गवसना हातात!' ही वाक्येही याचीच साक्ष देतात.

या पुस्तकाचे श्री. श्याम जोशी यांनी काळ्या तपकिरी रंगात केलेले मुखपृष्ठ आणि त्यासाठी निवडलेला हातबनावटीचा कागद, यामुळे या छोट्या पुस्तकाला देखणे रूपही प्राप्त झाले आहे.

**पाचोळा** : रा. रं बोराडे : मौज प्रकाशन : पृ. ८२ : किंमत साडेपाच रुपये.

□

# क्रिकेट – चौकार, षट्कार

## शरद गोखले

क्रीडा विषयक पुस्तके आपल्याकडे एकंदरीने कमीच. त्यातही क्रिकेटसारख्या विषयावर मराठीतून पुस्तक लिहिणे जरा धाडसाचेच. क्रिकेट चौकार षटकार या मालिकेमध्ये सहा पुस्तकांची घोषणा करून बाळ पंडित यांनी ही अवघड, परंतु आवश्यक कामगिरी स्विकारली आहे.

खेळाडू, अभ्यासक, क्रिकेट विषयक लेखक, आकाशवाणी निवेदक, महाराष्ट्र क्रिकेट मंडळाचे पदाधिकारी, महाराष्ट्र संघ निवड समितीचे सदस्य, अशा अनेक नात्यांनी श्री. पंडित यांचा क्रिकेटशी दीर्घकाळ संबंध आहे. आपल्या या अनुभवाचा भरपूर फायदा त्यांनी चौकार, षटकार मालिकेद्वारा वाचकांना करून दिला आहे. त्यांच्या या पुस्तकातील सर्वच लिखाण मुद्दाम पुस्तकासाठी लिहिले नसून पूर्वी लेखरूपाने प्रसिद्ध झालेले साहित्यही पुस्तकरूपाने पुन्हा वाचकांसमोर आले आहे. वृत्ताचा भाग सोडला तर क्रिकेट विषयक लेख शिळे होत नसतात. मुरलेल्या लोणच्याला जशी चव येते, तशीच चव या लेखांना येते. त्यामुळे हे लेख पुस्तक रूपाने आल्यावर केवळ वाचनीयच नव्हे तर संग्राह्यही होतात.

गाजलेल्या खेळाडूंची चरित्रे, क्रिकेटचा इतिहास, क्रिकेटच्या लोकप्रियतेचे रहस्य, आदि विविध भागामध्ये श्री. पंडित यांनी पुस्तकांची मांडणी केली आहे. कोणत्याही खेळात नसेल, असे अनन्यसाधारण स्थान क्रिकेटमध्ये विक्रमांना असते. वैयक्तिक धावांचा विक्रम, गडी बाद केल्याचे विक्रम, झेल झेलण्याचा विक्रम, दोन खेळाडूंच्या भागिदारींचे विक्रम. असे अनेक विक्रम नोंदले जात असतात. मोडले जात असतात. पुन्हा नवीन विक्रम प्रस्थापित होत असतात आणि या विक्रमांच्या नोंदी ठेवतानाच कळत न कळत खेळाचा इतिहास तयार होत असतो. अशा या विक्रम कथांना एक वेगळे स्थान देऊन बाळ पंडित यांनी आपल्या पुस्तकाची मांडणी निश्चितपणे वेधक केली आहे. मात्र हे करत असतानाही क्रिकेटवरील पुस्तक म्हणजे केवळ आकडेवारीची जंत्री नव्हे याचेही भान त्यांनी ठेवले असल्याने पुस्तकाचा तोल बिघडलेला नाही. संपूर्ण पुस्तक वाचनीय असले, तरी गाजलेल्या खेळाडूंवरील लेख खरोखरच सुरेख उतरले आहे. सुदैवाने पंडितांची लेखणी बोजड नसल्याने या लेखांना एक सुंदर सूर सापडला आहे. हे सर्वच लेख वाचनीय आहेत. याच मालिकेतील नील हार्वे याच्या खेळाचे वर्णन करताना श्री. पंडित लिहितात,

'हटनच्या खेळात दर्जा होता पण लालित्य नव्हते. मॉरीसच्या खेळात शैली होती पण अलंकार नव्हता. वॉलकॉटजवळ खास असे काही अलंकार होते. पण खेळात दर्जाचा अभाव होता. सुब्बारावजवळ दर्जा होता पण शैली बिलकूल नव्हती. हार्वेच्या खेळात मात्र वरील चौरंगी गुणांचे कारंजे उसळताना दिसे.' इतर खेळाडूंशी तुलना करून हार्वेच्या खेळाची वैशिष्टये पंडित वाचकांसमोर अचूक ठेवतात.

क्षेत्ररक्षण ही क्रिकेटची अत्यंत महत्वाची बाजू. उत्कृष्ट क्षेत्ररक्षक हा संघाचा महत्वाचा आधारस्तंभ. वास्तविक फलंदाज व गोलंदाजांच्या बरोबरीने त्याचे स्थान असावयास हवे. परंतु उत्कृष्ट क्षेत्ररक्षक असलेल्या खेळाडूची व्हावी तितकी कदर केली जात नाही. धावसंख्या मर्यादित करणे, गडी धावबाद, अथवा झेलबाद करणे, आदि महत्त्वाची कामगिरी क्षेत्ररक्षक करतो. क्षेत्ररक्षक म्हणून मान्यता मिळव-णाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या कोलिन ब्लांडचा परिचय पुस्तकात समाविष्ट करण्यात श्री. पंडित यांनी औचित्य साधले आहे. क्षेत्ररक्षणाबाबत जी काहीशी उदासीन वृत्ती आढळते त्याचीही दखल घेतली आहे. एका प्रात्यक्षिकाचेवेळी फलंदाजांनी मारलेल्या २० चेंडूंपैकी १९ चेंडू चपळाईने अडवून १९ वेळा समोरील स्टंप नेम धरून उखडून लावणारा ब्लांड, त्याच्या सर्व वैशिष्ठ्यांसह पंडित यांनी साकार केला आहे.

गाजलेले खेळाडू या मालिकेत मान्यवर परकीय खेळाडूंबरोबर श्रेष्ठ भारतीय खेळाडूंचा समावेश केला असता, तर अधिक बरे झाले असते. क्रिकेटच्या विविध बाजूंची सविस्तर दखल घेतली गेली आहेच. परंतु क्रिकेटचे उद्देश, महत्व व कार्य हे प्रकरण या खेळाशी संबंधित असलेली अप्रकाशित बाजू वाचकांसमोर आणते. क्रिकेटवर होणाऱ्या टीकेची दखलही या प्रकरणात घेतली असून पंडित यांनी खेळाचे यशस्वीपणे समर्थन केले आहे.

निळकंठ प्रकाशन या संस्थेने पुस्तकाची सजावट, मांडणी, याबाबत दक्षता घेतली आहे. काही ठिकाणी तरी प्रत्यक्ष छायाचित्रे वापरली असती तर वाचकांचे आधिक समाधान झाले असते असे वाटल्यावाचून रहात नाही. ३८–३९, ४२–४३ अशी पानेच्या पाने गडब झाल्याने निश्चितपणे रसहानी होते. नील हार्वे आणि इव्हान्स, या खेळाडूंच्या बाबतची माहिती अपूर्ण राहते. प्रकाशित पुस्तकांना क्रमांक देणेही आवश्यक वाटते. त्रिकेटसारख्या विलष्ट खेळावरील सोप्या भाषेतील सुंदर पुस्तक म्हणून पंडितांच्या या पुस्तकाचे स्वागत करणे योग्य होईल. केवळ क्रिकेट जाणकार व शौकिन यांनाच नव्हे तर सर्व थरातील वाचकांना मनोरंजक वाटेल, अशा पद्धतीने लेखन करण्यात पंडित यशस्वी झाले आहेत हे मान्य करावे लागेल.

**क्रिकेट – चौकार, षट्कार** : बाळ ज. पंडित : नीलकण्ठ प्रकाशन : सहा रुपये

□ □ □

नरेंद्र दाभोळकर



## खो खो—

## पहिला शिवछत्रपती पुरस्कार

# मधुसूदन झंवर

परीक्षेच्या आधीचे काही दिवस आणि रात्री अगदी कत्तलीच्या असतात. तारवटलेले डोळे, थकलेला मेंदु, काळजी करणारे मन, सिगारेट आणि चहाच्या कपाची सोबत—आपल्यापैकी साऱ्यांनी कधी ना कधी हे अनुभवलेले असते. वैद्यकीय विषयासारखा अवघड अभ्यासक्रम असेल तर ही अनुष्ठाने महिनेच्या महिने चाललेली असतात.

अटीतटीच्या आव्हानात्मक निर्णायक सामन्यातील झुंज ही देखील त्या त्या संघातील खेळाडूंच्या मनात सामन्याआधी असाच विलक्षण ताण निर्माण करते. काय होईल? कसे खेळावे? यश का अपयश? या साऱ्या विचारांनी मनात एकसारखी खळबळ माजलेली असते.

दोन वर्षापूर्वीची गोष्ट. राणाप्रतापने पुण्यात भरविलेल्या अ. भा. खो खो सामन्याची अंतीम फेरी. गुजराथ क्रीडामंडळ आणि नवमहाराष्ट्र संघाचा सामना बघायला तमाम पुणेकर खोखो शौकिन लोटले होते. त्याआधी अवघ्या महिन्यापूर्वी मुंबईला अंतीम फेरीत पत्करव्या लागलेल्या पराभवाच्या अपमानाचे उट्टे नवमहाराष्ट्र संघाला आपल्या घरच्या मैदानावर सव्याज फेडावयाचे होते.

मेडिकल कॉलेजची परीक्षा दुसरे दिवशी सकाळी असताना या सामन्यासाठी मधु मैदानावर उतरला. आपल्या चतुरस्र आक्रमक पाठलागाने आणि दमदार चढाईने त्या दिवशीच्या सामन्याचा तो हीरो ठरला. गुजराथच्या सुधीर परबला बाद करण्यासाठी त्याने मारलेला सूर काळीज हलवून गेला. पडतानाही शेवटचे मोलाचे मिनिट अत्यंत धीमेपणाने खेळून त्याने हा सामना आपल्या संघाला जिंकून दिला. त्या विजयाच्या महोत्सवात उद्याची असली परीक्षाही तो क्षणभर विसरला.

अर्थात दुसरे दिवशी तेवढ्याच सफाईने आणि सहजतेने अंतीम परिक्षेलाही त्याने यशस्वी तोंड दिले.

खोखोमधला छत्रपती पारितोषिकाचा पहिला मान मिळविणारा डॉ. मधुसूदन झंवर सध्या ससून हॉस्पिटलमध्ये नेत्रशल्य विशारदाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करत आहे. शैक्षणिक यशाएवढेच किंबहुना त्याहूनही खोखोमधले त्याचे यश हे अधिक उ वळ आहे.

न्. म. वि. चा विद्यार्थी आणि नवमहाराष्ट्राचा खेळाडू म्हणून त्याने बऱ्याच वर्षांपूर्वी आपल्या खेळाचा श्रीगणेशा शंकरराव पाटणकरांच्या हाताखाली गिरवला. कॉलेजच्या पहिल्या वर्षी उत्कृष्ट खेळ करूनही वशिल्याच्या राजकारणात त्याची निवड विद्यापीठ संघात होऊ शकली नाही. पण त्यावर्षीच आपल्या खेळाने महाराष्ट्राच्या संघात त्याने स्थान पटकाविले आणि विद्यापीठ निवड समितीस परस्पर उत्तर दिले. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धा खेळणारा आणि पुणे जिल्ह्याला महाराष्ट्राच्या संघात प्रवेश मिळवून देणारा हा एकमेव आणि पहिला खेळाडू. यानंतर गेले सतत सात वर्षे तो महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत आहे. त्यापैकी चार वेळा महाराष्ट्र राज्याने अखिल भारतीय अजिंक्यपद मिळविले आहे. मुंबई बाहेरील खेळाडूत महाराष्ट्र राज्य संघाचा सघनायकाचा शिरपेच पहिल्यांदा मधूनेच मिळविला. आणि तोही सतत तीन वर्षे. गेले पाच वर्षे प्रत्येक राष्ट्रीय सामन्यात मधूने सर्वात अधिक खेळाडू बाद केले आहेत. राष्ट्रीय सामन्यात शंभराचेवर खेळाडू बाद करणारा सर्व भारतात तो एकमेव खेळाडू आहे.

खेळाच्या अविकसित भागात खोखोचा प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिल्ली पंजाब भागात जो दौरा आयोजित केला होता त्यावेळीही महाराष्ट्र संघाचे नेतृत्व मधूकडेच आले होते. महाराष्ट्र राज्य क्रीडामहोत्सवात तो पाच वेळा खेळला. आणि पाचही वेळा संघ अजिंक्य ठरून त्याने सुवर्णपदक पटकावले. राज्य क्रीडामहोत्सवात पाच वेळा जिंकणारा दुसरा तरी कोणता खेळाडू माझ्या माहितीत नाही. इंदूरच्या अखिल भारतीय सामन्यात सर्वोत्कृष्ट खेळाडूचे एकलव्य पारितोषिक त्याला मिळाले होते. पुण विद्यापीठ संघातूनही सतत चार वर्षे तो खेळला होता. आणि आंतरविद्यापीठ स्पर्धेत पुण्याला यश मिळवून देण्यात त्याचा मोठा वाटा होता.

चतुरस्त्र हुकमी आक्रमक खेळाडू म्हणून मधूची अधिक ख्याती. वेगवान नियंत्रित पाठलाग, झेपदार अचूक सूर, चटकन वाकून पायात मारणं, खुंटावर मारणे ही सर्व कौशल्यं त्याने पुरेपुर आत्मसात केली आहेत. त्या सर्वांचा उपयोगही तो मोठ्या तारतम्यतेने आणि अचूकतेने करतो. त्याचा पाठलाग म्हणूनच विरोधी पक्षाच्या पोटात धडकी भरवतो.

खुंटावर गडी खिळवण्याचे आणि बाद करण्याचे गुजरातकरांचे एक खास कौशल्य आहे. खुंटावरची नजरबंदी म्हणाना ! जबरदस्त हूल देऊन गडी खुंटावर

मंतरल्यासारखा स्थिर करावयाचा आणि टिपायचा अशी ही करामत. सतत निरीक्षणाने ही कला मधुने आता चांगलीच आत्मसात केली आहे. खुंटावर हूल देऊन गडी टिपण्यात तो हल्ली बहुतेक सामन्यात यशस्वी होतो.

पळतीचा त्याचा खेळ हा जबाबदारीचा आणि आक्रमण थोपविण्याचा असतो. त्यामुळे तो बहुधा दुसऱ्या तुकडीत खेळतो. तरीही काही आणिबाणीच्या वेळी पहिल्या तिघांच्या तुकडीत जाऊनही धडाडीचा खेळ त्याने केल्याचे मी बघितले आहे. रूटने पळणे आणि चौघातील खेळ या दोन्ही कौशल्यांचा योग्य तो मिलाफ तो करतो.

गडी टिपण्याचे त्याचे खास कौशल्य प्रतिस्पर्ध्याला गोंधळात टाकते. राणाप्रतापच्या भोळे करंडकाच्या सामन्यात अथवा १९६७ सालच्या बडोद्याच्या राष्ट्रीय सामन्यात मोहन अजगावकर अथवा सुधीर परबला त्याने असे बघताबघता टिपले होते. हे दोघेही त्यावेळचे एकलव्य विजेते खेळाडू. पण आपण कसे फसलो आणि जाळ्यात अडकलो हे त्यांनाही कळले नाही.

बडोद्याचा आंतरविद्यापीठ अंतिम सामना हा मधूच्या आयुष्यातला एक 'न भूतो' अनुभव. सतत तीन दिवस हा सामना चालला. खेळाचे नऊ डाव झाले आणि या नऊही डावात मधुच्या झुंजार पाठलागाने आणि पळतीमधील कर्तृत्वाने सामना समान गुणावर ठेवण्यात पुणे विद्यापीठाला यश मिळाले. दहाव्या डावात मात्र एका गुणाने पुणे विद्यापीठाला पराभव पत्करावा लागला. पण त्या आधीच मधु त्या सामन्याचा हीरो झाला होता.

दोन वर्षांपूर्वी नागपुरला महाराष्ट्र-गुजरातची राष्ट्रीय खोखो अंतीम फेरीत गाठ पडली. मधु महाराष्ट्राचा नायक होता. पंचाचे निर्णय अत्यंत चुकीचे लागले. खेळाडू वैतागले. चिडलेले पंचवीस हजार प्रेक्षक मैदानात घुसले. शेवटी मधुने सर्वांना शांत केले. जिद्दीने आणि खिलाडूवृत्तीने सामना पुढे चालू ठेवला आणि शेवटच्या अडीच मिनिटात चार गडी बाद करण्याची अशक्यप्राय कामगिरी करून सामना जिंकला. शेवटच्या काही सेकंदात त्याने गुजरातचा सघनायक सूर मारुन सुरेख टिपला आणि आपल्या विक्रमी विजयाची नोंद केली.

गेले तीन वर्षे याना त्या कारणाने हुलकावण्या देणारा भाई नेरुरकर सुवर्णचषक नवमहाराष्ट्र संघाने यंदा जिंकला तो ही मधुच्या सुर मारण्याच्या या अप्रतिम कौशल्यामुळेच. शेवटच्या श्वास रोखणाऱ्या क्षणाला त्याने सन्मित्राच्या सुधीर चिटणीसला अचूक बाद केले.

राज्यातला शरीरयष्टीच्या खोखोच्या खेळाला लागते त्यातला मधु हा वेटलिफ्टिंगमधील विजेता असावा हे एक आश्चर्यच. पुणे विद्यापीठात पलाय व बँटमवेट गटात तो सतत पाच वर्षे पहिला होता. दोन नवे उच्चांक त्याने स्थापन केले. पुणे विद्यापीठाच्या वेटलिफ्टिंग याचा तो कर्णधारही होता. या संघाला एवढा

अजिंक्यपद आणि दोनदा उपविजेतेपद मिळाले होते. खो खो मधले चापल्य कौशल्य आणि शरीर क्षमता राखण्यासाठी त्याला याचा खूपच फायदा झाला.

मधूचे वडील हे स्वत: नामवंत क्रीडातज्ज्ञ आहेत. सूर मारणे, खुंटात मारणे, खुंटावरची हूल वगैरेसाठी त्यांनी मधूची खास व्यायमद्वारे स्वतंत्रप्रकारे तयारी करून घेतली. खेळाडू रसिकांचे आणि मित्रांचे ही त्याला सततच प्रोत्साहन मिळाले. दोन उदाहरणे मोठी बोलकी आहेत. पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या नामवंत खेळाडूंच्या हस्ते वाईस समारंभ घडविण्याच्या पद्धतीनुसार गेल्यावर्षी मधुच्या हस्ते तो बक्षिस समारंभ पार पडला. क्रिकेटसारख्या खेळालाही मधुला आवर्जुन बोलवावेसे वाटावे यात मधूचा आणि खोखोचा दोघांचाही सन्मान आहे. भारताचे अर्थमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी खोखोच्या सामन्याचे उद्घाटन केले त्यावेळी मैदानात येऊन त्यांनी मधूला खो दिला आणि हे अभिनव पद्धतीचे उद्घाटन झाले. शिवछत्रपती पारितोषिक हा असाच मधुच्या मस्तकावर खोचला गेलेला आणखी एक मोलाचा आणि मानाचा शिरपेच आहे.

मधु पुढील शिक्षणाला परदेशी जाणार म्हणतो. माझ्या सारख्या त्याच्या असंख्य चाहत्यांना त्याचा जरूर आनंद आहे पण त्या आधीही खोखोचा संघ आणि त्याचा संघ नायक म्हणून जर त्याचे परदेश गमन घडले तर तो आनंद घनगुणित होईल. पाहूया छत्रपती पारितोषकाच्या घोडदौडीचा पुढचा प्रवास. ◻ ◻ ◻

## संयोजकासाठी

काही कबड्डी स्पर्धांच्या निमंत्रणाच्या निमित्ताने परवा मुंबईतील सर्व नामवंत संघ भेटले. उन्हाळी मोसमात महाराष्ट्रात निरनिराळ्या ठिकाणी काढावयाच्या दौऱ्याची त्यांची पूर्वतयारी चालू आहे. भव्य चषक भरपूर वैयक्तिक बक्षिसे आणि भोजन व्यवस्था याची सोय केली तर वाटेल तेवढे संघ आपल्याकडे येतील असा एक चुकीचा ग्रह करून बहुतेक संयोजकांनी त्यांना आमंत्रणे दिली होती. प्रत्यक्ष खेळाडूंची अपेक्षा मात्र वेगळीच आहे. त्यांना हवी आहे आपुलकीची वागणूक, उत्कृष्ट मैदाने आणि भरपूर प्रेक्षक. पैशाच्या जोरावर खेळाडू आणि संघ सहज आणू अशी मान्यता त्यांना काही संयोजकांच्याबाबत आढळते. काही ठिकाणी मैदाने तयार करण्यासाठी कोणते खास परिश्रमच घेतले जात नाहीत. तिकीटे लावल्यामुळे वा अन्य-कारणाने काही ठिकाणी प्रेक्षकांची संख्या निरुत्साही करणारी असते.

खेळाडूंच्या आणि संघाच्या या अपेक्षेमध्ये जरूर तथ्य आहे. महाराष्ट्रात अर्धा डझन ठिकाणी अखिल भारतीय पातळीवरील सामने आयोजित होत आहेत. पाहूया संयोजक या अपेक्षांची किती प्रामाणिकपणे पूर्ती करतात ते.

# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

१ ते ७ मे १९७१

**मेष :** शरीरप्रकृती चांगली राहील. साडेसातीची शेवटची वर्षे सुरू झाली. प्रवासयोग येईल तो टाळावा. घरासंबंधी प्रश्न चांगल्या रीतीने एक-दोन आठवड्यात सुटतील. धनस्थिती जरा नाजूकच राहील. गुरू-बुध-शुक्र ९।५ योगाने सर्व अडचणी दूर होतील. त्यांना योगबल आहे पण स्थानबल नाही. लग्नातील रवी सरकारी कामात संपूर्ण यश देईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी नोकरांना मनासारखे प्रमोशन होईल. भागिदार व पत्नीशी मतभेद होईल. त्यात आपलाच हेका चालवू नये. भाषेवर जरा आळा घालावा. सामाजिक दर्जामुळे एखादा अचानक द्रव्यलाभाचा योग येईल. कर्तबगारीचे कोडकौतुक होईल. ही इंडिकेटची रास आहे. सार्वजनिक कामात प्रगती होईल. शत्रूसुद्धा आयत्या वेळेला मदत करतील. धंदाव्यवसाय चांगला चालेल. शुभ तारखा ४।५।६।७.

**वृषभ :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. उदरी शनी येत आहे. धनस्थानची स्थिती अत्यंत समाधानकारक राहील. प्रवासयोग येईल. हातून पराक्रम घडेल. घरात काहीतरी शुभसमारंभ होईल. घरासंबंधीचे प्रश्न एक-दोन आठवड्यात सुटतील सरकारी कामात यश येईल. इंडिकेटची राशी आहे. या पक्षाची कामे प्रगतीपथावर जातील. उद्योगधंद्याला दिवस अत्यंत चांगले आहेत.

विद्याभ्यासात नेत्रदीपक प्रगती होईल. पंचमेश बुधाचा शुक्राशी युती व गुरुशी ९।५ योग बौद्धिक सर्व शास्त्रीय व वाङ्मयीन क्षेत्रात अग्रेसरत्व मिळवून देईल. प्रकाशक, साहित्यिक, विद्याव्यासंगी या लोकांना सर्व बाजूंनी यश व मोठेपणा प्राप्त होईल. दशमेश व भाग्येश शनी लग्नी आला आहे. तो व्यवसाय धंद्यात भांडवल भरपूर मिळवून देऊन धंद्याला स्थैर्य निर्माण करील. शुभ तारखा ३।४।५।६।७.

**मिथुन :** शरीरप्रकृती अत्यंत चांगली राहील. धनस्थानाचा शनिवारी-रविवारी बोजवारा उडेल. अचानक खर्चाची प्रकरणे निघून स्वभावात चिडखोरपणा येईल. वाचाशुद्धी राहणार नाही. मित्रांसह प्रवासयोग आहे. त्यात फायदा होईल. घरात घरभरणीसारखे अगर मुलांच्या लग्नाच्या साखरपुड्याचा समारंभ मंगळवारी-बुधवारी होण्याचा योग आहे. नवीन घरात राहावयाला जाण्याचा योग आहे. सार्वजनिक कामात अपयश येईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती होईल. विद्येचा गौरव होऊन सामाजिक मान-मान्यता मिळण्याचा योग आहे. शत्रूनाश होईल. भागिदार नीट वागणार नाहीत. मित्रांकडून सर्व प्रकारचे सहाय्य मिळेल. फॅन्सी कापडाचे, ऑईल पेंटस्चे व्यापाऱ्यांना अमाप फायदा होईल. अचानक धनलाभ होण्याचा योग गुरुवारी-शुक्रवारी आहे. उद्योगधंदा व्यवसाय चांगलाच चालेल. शुभ तारखा ३।४।५।६।७.

**कर्क :** शरीरप्रकृती शनवार-रविवार जरा नरमच राहील. मानसिक त्रास फार होईल. स्थावर प्रॉपर्टीची रक्कम सरकारातून यावयाची असेल ती हातात पडेल. प्रवासयोग काहीतरी शुभसमारंभाकरता घडेल. त्यात महत्वाचा भाग घ्यावा लागेल. मानमान्यता मिळेल. लोकांकडून गौरव होईल. घरातील मंडळी समवेत दिवस अत्यंत आनंदात जातील. हा योग गुरुवार शुक्रवारी येईल.

विद्याव्यवसायात मनाप्रमाणे घटना घडतील. मिलीटरी किंवा इंजिनीअरींग व्यवसायातील संतची उत्कर्ष होईल. जास्त अभ्यासाकरता परदेशगमनाचा योग येईल. भागीदारांशी थोडा मतभेद होईल. दशमातील उच्चीचा रवी व पंचमातील गुरु सर्व संकटातून सुखरूप पार पडतील. एजन्सी करणारांना प्रगतीपथावर नेणारे दिवस आहे. शुभ तारखा ३।४।५।६।७.

**सिंह :** शरीरप्रकृती अतिशय चांगली राहील. धनस्थानची स्थिती चांगली सुधारेल. पराक्रमानी पैसा मिळविता येईल. धाडसाच्या कामात अचानक धनलाभ होईल. घरात सासुरवाडची माणसे येऊन दिवस आनंदात जातील. नवविवाहितांना हा योग जास्त येईल. आत्मघातकी विचार मनात येतील. स्त्रियांच्या लफड्यात सापडून मानसिक त्रास होईल. एकच शुभयोग चतुर्थातील गुरू आयत्या वेळी सुख-हानी होऊ देणार नाही.

विद्याभ्यासात चांगले यश मिळेल. विद्येच्या जोरावर कायम स्वरूपाचा व्यवसाय-उद्योग जमेल. लेखक, प्रकाशक, छापखानेवाले यांना नवीन उद्योग सुरू करण्याला दिवस चांगले आहेत ता. १५।५।७१ नंतर उत्तम भागिदार घरबसल्या चालून येईल. घराची कॉन्ट्रॅक्टनी कामे करणारांना दिवस फारच चांगले आहेत. दोन-तीन आठवड्यात अनपेक्षित घटना घडून हा अनुभव येईल. शुभ तारखा ४।५।६।७.

**कन्या :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानाची स्थिती अत्यंत चांगली राहील. कलाकार विशेषतः स्त्री नटींना फार मोठ्या रकमांच्या मागण्या येतील. त्यांच्या कामाचा मोबदला अमाप येईल. त्याना कामातही भरपूर रस येईल. भावंडांची मदत होईल. प्रवास योग येईल त्यात अनपेक्षित नव्या ओळखी होऊन आशाआकांक्षा पुऱ्या होतील.

विद्याभ्यासात यश प्राप्त होईल. शेतकीविषयक अभ्यास करणारांचा अक्षरशः भाग्योदय होईल. ३६ वर्षापुढील व्यक्तींना हा अनुभव जास्त होईल. सरकारी कामात थोडासा उशीर लागेल. व्यापार धंदा चांगला चालेल. बायकोच्या माहेरची

मंडळी येऊन दिवस आनंदात जातील. हा योग गुरुवारी-शुक्रवारी येईल. शुभ तारखा ३।४।५।६।७.

तूळ : शरीरप्रकृती चांगली राहील. हातून धाडसाची कामे होतील. धनस्थानची स्थिती हेवा करण्यासारखी राहील. येणे असलेले पैसे आपोआप हातात पडतील. भावंडांची मदत सर्व बाबतीत होईल. घरात थोडासा मतभेद होऊन मनस्ताप वाढेल. शनिवारी-रविवारी हा योग येईल.

विद्याभ्यासात माघार घ्यावी लागेल. प्रत्येक गोष्टीला विलंब लागेल. ३६ च्या पुढील वयाच्या व्यक्तींना हा अनुभव तीव्रतेने येईल. शत्रूनाश होईल. भागीदार नीट वागणार नाहीत. अचानक धनलाभ होईल. व्यापार धंदा चांगलाच चालेल. मोत्याचा व्यापार करणारांना, राजकारणी व्यक्तींना आठवडा प्रगतीकारक आहे. इंडिकेटची राशी आहे. शुभ तारखा ३।४।५।६।७.

वृश्चिक : शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थिती चांगली राहील. मिळवत्या मुलांकडून पैशाची चांगलीच मदत होईल. प्रवास योग येईल. तो शक्य टाळावा. शनिवारी-रविवारी हा योग येईल. सार्वजनीक कामात यशप्राप्ती होईल. इंडिकेटची राशी आहे. घरात काहीतरी धार्मिक कार्य मंगळवारी-बुधवारी होण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात सुयश प्राप्त होईल. संततीचा उत्कर्ष होईल. भागीदारांकडून सर्व कामात मदत मिळेल. अचानक धनलाभ होईल. २४ च्या पुढील व्यक्तिला जीवन-स्वास्थ्य मिळेल. विवाह होईल. कायमचा व्यवसाय मिळेल. उद्योग-धंद्यात खूप पैसा मिळेल. सरकारी कामाची कॉन्ट्रॅक्ट घेणाऱ्या लोकांना दिवस मानमरातब व पैसा मिळवून देणारे आहेत. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

धन : शरीरप्रकृती जरा नरमच राहील. वाचेत कठोरपणा येईल. धनस्थानाची स्थिती चांगली राहील. खर्च फार करावा लागेल. घरात शुभ कार्याच्या वाटाघाटी होतील. गुरुवार-शुक्रवार हा योग जोरदार आहे. गुरु-बुध-शुक्र ९।५ योग चांगला आहे. विवाहाची मागणी येईल. १।२ आठवड्यात विवाह जमण्याचा योग येईल. शत्रूनाश होईल. अचानक धनलाभ होईल.

विद्याभ्यासात प्रगती समाधानकारक होईल. चित्रकला, मेडिकल व्यवसाय, नाट्यकला याना प्रगती पथावर नेणारे शुभयोग आहेत. उच्चीचा मंगळ व उच्चीचा शुक्र आहेत. विद्याभ्यासात प्रिय माणसाकडून मदत केली जाईल. सर्व अडचणी नाहीशा होतील ३२ ते ३६ वयातील व्यक्तिना हा अनुभव जास्त येईल. कोणत्याही बौधिक धंद्यात अमाप पैसा मिळेल. शुभ तारखा ३।४।५।६।७.

मकर : शरीरप्रकृती चांगली राहील. स्वभावात जरा हट्टीपणा वाढेल. धन-स्थानची स्थिती चांगली राहील. भावंडांकडून सर्व प्रकारची मदत होईल. प्रवास योग येईल. घरासंबंधी सरकारी कामे मनासारखी होतील. घरात काहीतरी शुभ-समारंभ घडेल. हा योग गुरुवार शुक्रवार येईल. भागिदारांशी मतभेद होईल. अचानक धनलाभ घडेल.

विद्याभ्यासात यश येईल. शास्त्रीय संशोधन करणाराना संपूर्ण यश येईल. सरकारी अनुदान मिळेल. हातून अभिमान वाटण्याजोगी कामगिरी होईल. फॅन्सी कपडे, पेंटिंगचे काम करणारे आयत्या कपड्यांचे व्यापार करणाराना अमाप फायदा होईल. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींचा अनपेक्षित भाग्योदय होईल. मित्रांकडून मदत होईल. शुभ तारखा ३।४।५।६।७.

**कुंभ :** शरीरप्रकृती चांगली राहील. शनी चवथा असला तरी स्वगृहावर पहात आहे. शिवाय दशमात भाग्येश धनेश गुरु आहे या योगावर सांपत्तिक स्थिती चांगलीच सुधारेल. विद्यार्थी अगर मुलांकडून पैशाची चांगलीच मदत होईल. घरात काहीतरी शुभ समारंभ होईल. दिवस आनंदात जातील. उच्चीचा रवी त्यावर उच्चीचा मंगळ पहातो. हा योग चांगला. सरकारी कामात यश प्राप्त होईल.

विद्याभ्यासात भरघोस यश येईल. शास्त्रीय विषयात प्रगती होईल. तत्त्वज्ञान-विषयक चर्चेत भाग घ्यावा लागेल. अचानक धनलाभ होईल. भाग्येश व धनेश शुक्र धनस्थानात गुरु दृष्ट आहे. तो अतिशय चांगला आहे. भाग्योदय बुद्धीच्या जोरावर होईल. कर्त्या मुलांकडून सर्वप्रकारे मदत होईल. बौद्धिक व्यवसायात अमाप पैसा मिळेल. शुभ तारखा १ ते ७. सर्व आठवडा शुभ आहे.

**मीन :** शरीरप्रकृती चांगली राहील. पाठच्या भावंडाला आजारी पडण्याचा योग. प्रवासात फायदा होईल. चारही केंद्राचे अधिपती गुरु, बुधांचा ९।५ योग आहे. तो अत्यंत चांगला. अचानक मानसन्मान होईल. द्रव्यलाभ चांगला होईल. मित्रांकडून समाधानकारक मदत होईल. ४२ च्या व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल.

विद्याभ्यासात सर्वप्रकारे प्रगती होईल. अचानक धनलाभ होईल. उद्योगव्यवसाय चांगलाच चालेल. सरकारी कामात यश प्राप्त होईल. घरासंबंधीचे प्रश्न मनासारखे सुटतील. गुरुवार, शुक्रवार पाहुणे येऊन दिवस आनंदात जातील. शुभ तारखा ३ ते ७.


## अक्षरपद्धती, कुटुंबनियोजन आणि कुटुंबसुयोजन

अनैतिक साधने न वापरता मनोवांच्छित संतति होईल. सुयोजनाकरता पाळावयाचे दिवस, महिने, चंद्र वगैरेंचा तक्ता उपयोगाच्या माहितीसह रु. १०१/- व नियोजनाचा तक्ता रु. ५१/- शिवाय त्यावर Astro-Medical उपाय सांगू. याशिवाय वर्षफल रु. १०/- विवाह प्रश्न रु. १०/- व इतर सर्व कामे केली जातील. भेटण्याची वेळ सकाळी ८ ते ११

प. वि. म. जोशी, ज्योतिष विशारद

"गीत प्रसाद" आऊट हाऊस, कर्वे रोड, पुणे नं. ४

पृष्ठ २४ वरून

बोलत बोलत त्यांच्या कचेरीपर्यंत गप्पा मारत सोबतीला जातो ! आमच्या शंभर विषयांवर गप्प होतात. त्यांची ही एक झुळूक :

ब्राह्मण—ब्राह्मणेत्तर चळवळीची झळ तुम्हाला कधी लागली होती काय ?

कधीच नाही. उलट, ब्राह्मणांचेच अनुभव चांगले आले नाहीत. ब्राह्मणांनी माझी सतत हेटाळणीच केली. कारण " रामदास, की जो ब्राह्मण होता, तो शिवाजीचा गुरू होता, " " झाशीची राणी, की जी ब्राह्मण होती, ती स्वातंत्र्ययुद्धाची स्फूर्ती-देवता होती, " किंवा, " टिळक हे सर्वच बाबतीत महापुरुष होते " असली ब्राह्मणांना रोचक वाटणारी सवंग आणि धादांत असत्य विधानं मी करीत नव्हतो. त्यामुळे कोकणस्थ ब्राह्मण माझ्यावर नाराज आहेत अशी माझी समजूत आहे. टिळक चरित्राबाबत तात्यासाहेब केळकरांवर मी कडक टीका केल्यामुळे पुणेकर ब्राह्मणही मला लेखिनात. मी बेफाट स्तुती करेन अशी ब्राह्मणांची अपेक्षा होता. मी ते कटाक्षानं केले नाही. पेशवाईत ब्राह्मणांनी सत्ता भोगली होती. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत ती लयाला गेली. मग त्यांना आता आपला टेंभा मिरवायला स्तुतीपर लेखन हवं होतं. त्यांची ती भूक मी कशी भागवू शकेन ? तुम्हांला सांगतो, आजचा ब्राह्मणवर्ग हा बुद्धीभ्रंश झालेला आहे. काय आहे ब्राह्मणांपाशी ? ना विद्या, की ना सत्त्व. मराठे मंडळींनी मला नेहमीच प्रेमाने वागवलेलं आहे. एकदा तोरणा किल्ल्या-वरून परतताना आम्हा ब्राह्मण तरुणांना पाण्याची तहान लागली. त्यावेळी रस्त्या-वरल्या ब्राह्मणांच्या घरात आम्हाला घोटभर पाणीसुद्धा, आम्ही विनंती करूनही आम्हाला मिळालं नाही. जरा पुढे गेल्यावर एक मराठ्यांचं खोपट लागलं तिथल्या म्हातारीने आम्हाला प्रेमाने शिव्या मोजून दूध प्यायला दिलं. हा फरक आहे ! मुसलमानाचाही मला फार चांगला अनुभव आहे. ऐन दंग्यात मी कलकत्त्याला होतो. तिथे पठाणांनी मला मी अनोळखी असल्यामुळे त्यांच्या मोहोल्ल्यात शिरलेलो असतानाही संरक्षण दिलं होतं. तेच, मी ब्राह्मणांच्या मंडळात त्यांच्याच विनंती-वरून 'गीतारहस्या'चा वर्ग घ्यायला जात असे, तेव्हा तिथे पत्त्यांचा डाव पाडून बसलेला अड्डा मी आल्याबरोबर 'आली पीडा !' असे उद्गार काढीत असे. मराठे मंडळी मात्र अगत्यपूर्वक माझी बूज राखत. अर्थात, सगळेच ब्राह्मण नालायक आणि सगळेच ब्राह्मणेतर सुजन, असा ह्यातून निष्कर्ष निघत नाही.

ब्राह्मणेतरांविषयी तुम्हाला असलेला आपलेपणा पाहून कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी तुमचा कधी उपयोग करून घेतला होता ?

ते मुंबईला आलेले असताना त्यांना मी त्यांच्या प्रासादावर जाऊन तीन चार वेळा भेटलो होतो इतकच. एकदा ते आमच्या 'इंदूप्रकाश'च्या कार्यालयात आले

होते. पण त्यांनी आपल्या चळवळीला पूरक म्हणून माझा उपयोग करून घेतलेला नाही. किंबहुना ब्राह्मणेतर मंडळींनी मला त्या अर्थाने कधीच वापरलेलं नाही. एरव्ही स्निग्धतेने वागणारी मराठी मंडळी ब्राह्मणांवर चिडाळली का, त्याचीही खोलवर कारणे आहेत. सुशिक्षित ब्राह्मणांनी त्यांची हेटाळणी केलेली साहित्यिकांची उदाहरणे आहेत. सांगतो. 'महाराष्ट्र-सारस्वत'कार भाव्यांनी रामदासांविषयी लिहिताना तुकारामाची नाहक नालस्ती केलेली आहे. का? काही कारण होतं? पण ब्राह्मण श्रेष्ठ आहे हे वाचकांच्या मनावर बिंबवताना ब्राह्मणेतर तुकारामाला त्यांनी चिमटे घेतले. पांगारकरांनी, की जे संतकाव्याचे भाट होते, त्यांनी तुकारामाचा उल्लेख 'हा शूद्र कवी' असा केला आहे. शोभतं हे पांगारकरांना? सोनोपंतमामा दांडेकर एवढे मोठे वारकरी. तुकारामाचे अभंग जीभेवर मिरवणारे. पण त्यांनी-सुद्धा तुकारामाचा उल्लेख ज्ञानेश्वरांबरोबर तुलना करताना 'गांवढळ' असा कुत्सितपणे केला आहे. आमच्या ब्राह्मण विद्वानांच्या मनात कुठली भावना खोलवर रुजलेली होती त्याचा ह्यावरून बोध व्हावा. मी नेहमी सांगत आलो आहे की तुकारामाच्या भाषेची 'गांवढळ' अशी सापी आणि सोईस्कर संभावना करू नका. देहूच्या परिसरात मराठी भाषेची एक विशिष्ट बोली बोलली जात होती. त्या देहूच्या खास बोलीचा अभ्यास करा. मग तुमच्या लक्षात येईल की सर्व ह्यात देहूच्या परिसरात घालवलेल्या तुकारामाने देहूच्या बोलीभाषेतलेच शब्द वापरले आहेत. ती गांवढळ भाषा नाही. ती देहूची बोली हे मराठी भाषेचं एक रूप आहे. पण ब्राह्मणांचं तिकडे लक्ष नाही. माझी अभ्यासाने सिद्ध झालेली मतं ब्राह्मणांना सोईस्कर नाहीत. मग कशाला ते मला विचारतील? लो. टिळक क्रांतीकारक पुरुष होते असं मी सोईस्करपणे म्हणालो असतो, मग ते त्यांना प्रिय झालं असतं. पण मी इतिहासाचा अभ्यासक असल्यामुळं पुराव्यानिशी सिद्ध न होणारं ते विधान मी करणार नाही. केलेलंही नाही. टिळकांच्या एकंदर राजकारणाचा सूर 'अर्ज करा' ह्या सनदशीर बाण्याचा होता. अनेक अग्रलेखांमधून जनतेला त्यांनी सरकारात अर्ज गुदरण्याचं आवाहन केलेलं आहे. क्रांतीकारक कधी अर्ज विनंत्या करायला सांगेल? पण ह्याचा अर्थ टिळकांचं सर्वच हिणकस होतं असं नाही. टिळक आदर्श ग्रंथकार होते. एकतर ते फार कृतज्ञ होते. ग्रंथ लिहायला बसले की टिळक सर्व बाजूंनी विषयाचा अभ्यास करीत. इतर सर्व ग्रंथकारांनी त्या त्या विषयावर काय म्हटलेलं आहे त्याचे परिशिलन करीत. पुढे काय टीका संभवते त्याचाही अदाज घेत आणि पूर्वपक्ष, उत्तरपक्ष करीत. विषयाचा संपूर्ण कीस पाडीत लिहीत. ग्रंथकार टिळक ही फार उच्च दर्जाची व्यक्ती होती. राजकारणी आणि सामाजिक टिळक मात्र कमी दर्जाचे होते. टिळकांची ज्ञानलालसा अव्वल दर्जाची होती. एकदा एका पोथीचा अर्थ लावून घेण्यासाठी ते डॉ. भांडारकरांच्याकडे निघाले होते. रस्त्यात त्यांना प्रा. जिन्सीवाले भेटले. त्यांना विचारलं, 'कुठं निघालात?'

टिळक म्हणाले, 'एका ऋचेचा अर्थ लावायचा आहे. म्हणून डॉ. भांडारकरांकडे चाललोय.' जिन्सीवाले म्हणाले, 'मग त्यासाठी भांडारकर काय करायचे आहेत? चला, मीच लावून देतो अर्थ.' टिळक तिथल्या तिथे उद्गारले, 'I will prefer to be wrong with Dr. Bhandarkar than to be correct with you!' म्हणजे डॉ. भांडारकरांसारख्या ज्ञानी पुरुषांबद्दल टिळकांना इतका पराकोटीचा आदर होता. दुसरं म्हणजे टिळकांनी कुणालाही कधी expose केलं नाही, की तोंडघशीही पाडलं नाही. तसंच टिळक फार सुंदर आणि सर्वार्थपूर्ण शब्द तयार करीत. उदाहरणार्थ, evolution ला त्यांनी 'गुणोत्कर्षवाद' आणि 'गुणपरिणाम' हे सुंदर शब्द दिले आहेत. टिळकांचं श्रेष्ठपण हे असं आहे. पण असं आहे म्हणून लगोलग क्रांतीकारक वगैरे होते असं म्हणणं साफ चूक आहे.

ह्या टिळक चरित्र प्रकरणावरून तुमचे नि तात्यासाहेब केळकरांचे संबंध बिघडले होते. हे खरं काय?

मी टिळक चरित्राचे वाभाडे 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' ह्या पद्धतीने काढले. तशात मी काकासाहेब खाडिलकरांकडचा माणूस. त्यामुळे त्यांचा माझ्यावर राग होताच. पण मी त्यांच्या गुणांचाही चहाता होतो. हैदराबादेच्या साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद मला मिळाल्यानंतर मी प्रथम माझ्या आईच्या पाया पडलो आणि तिचा आशीर्वाद घेतला. महाराष्ट्रातल्या पन्नास वर्षांच्या समाजकारणावर ज्यांचा बराच पगडा पडलेला होता असे दोन ज्येष्ठ साहित्यिक म्हणजे काकासाहेब खाडीलकर आणि तात्यासाहेब केळकर, म्हणून आईनंतर काकासाहेबांच्या पाया पडलो व पुण्याला केळकरांच्या घरी गेलो. तो शनिवारचा दिवस होता आणि तात्यासाहेब मारुतीचा गूळ खोबऱ्याचा प्रसाद घेऊन देवळातून परत आलेले होते. आल्या आल्या मी त्यांना भेटलो. सुरवातीला त्यांच्या बोलण्यात थोडीशी अढी दिसली. पण नंतर मी नमस्कार करण्याचा हेतू सांगितल्यानंतर त्यांच्या हृदयाची कालवाकालव झाली आणि त्यांनी मला मोकळ्या मनाने आशिर्वाद दिला. नंतर ते माझ्या एका व्याख्यानसत्राला स्वतः होऊन अध्यक्ष म्हणून आले आणि मी वेगवेगळे संदर्भ पुस्तकात न पाहाता देत होतो, त्याने आश्चर्यचकित होऊन ते मला म्हणाले, "you are a gifted man!" खरा इतिहास हा असा आहे. हे आत्मप्रौढी म्हणून सांगत नाही. तर, आचार्य अत्रे म्हणायचे की फाटक केळकरांकडे तोंड वेंगाडत गेले आणि केळकरांनी फाटकांना लाथा मारून घालून लावले, हे धादांत असत्य आहे, हे सांगण्यासाठी खरा इतिहास सांगितला.

काकासाहेब खाडीलकरांचा सहवास आपल्याला बराच काळ लाभला असेल. काही आठवणी?

काकांनी सांगितल्यावरून मी 'नवाकाळा'त सत्तावीस सालापासून article लिहायला लागलो, त्यांचा सगळाच खाक्या वेगळा होता. ते कुणावरही वैयक्तिक

टिका करीत नसत. दुसऱ्यांनी वैयक्तिक टिका केलेली त्यांना आवडत नसे. एवढे मोठे ते नाटककार. पण त्यांनी स्वतःच्या नाटकांची एका ओळीचीही जाहीरात कधी केली नाही. नाटकांचे संवाद, ते तोंडी सांगत नसत. पेन्सिलीने कागदावर लिहीत आणि संवाद लिहिलेले कागद तसेच मेजावर ठेऊन देत. काका नसले म्हणजे ते संवाद कुणालाही वाचायला मिळत. नाटक लिहिताना रंगमंचाचा ते पूर्ण विचार करून लिहीत. मात्र 'किचकवध' जेव्हा प्रत्यक्षात बसवायला घेतलं तेव्हा त्यातल्या एका प्रवेशाची मांडणी करणं त्रासाचं होऊ लागलं. तेव्हा तो प्रवेश तातडीने वेगळ्या तऱ्हेने लिहून देणं भाग पडलं. त्यावेळी मात्र काकासाहेबांना संवाद एका बैठकीत तोंडी सांगितले होते आणि लेखनिकाने ते लिहून घेतले. काकांना गाणं आवडायचं. कळायचंसुद्धा. पण त्यांना गळा नव्हता नि गाणं येत नव्हतं. मात्र कोणे एके काळी त्यांनी गाणं शिकायचा प्रयत्न केला होता. त्यांच्याकडे तंबोरा होता. पण तो वापरात नव्हता.

ह्या मंडळींसारखीच 'प्रचंड' ज्ञानी माणसं दुसरी कोण भेटली ?

वाईच्या प्राज्ञमठाचे नारायणशास्त्री मराठे, म्हणजेच स्वामी केवलानंद सरस्वती. थोर ज्ञानी पुरुष होते. ३४ सालापासून त्यांच्याशी माझा निकटचा सहवास आला. शुद्ध चारित्र्य आणि ज्ञानसिद्धी ह्याबाबतीत त्यांची बरोबरी करणारा दुसरा पुरुष नजरेसमोर येत नाही. डॉ. भांडारकर, टिळकांच्या तोडीचे पांडित्य आता लुप्त झालं आहे डॉ. काणे हे मात्र पहिल्या दर्जाचे प्रकांड पंडित आहेत. पुण्याचे प्रा. पी. एल. वैद्य आणि वि. म. बेडेकर हे आणखी दोनच प्रकांड पंडित उरलेले दिसतात. विष्णु दिगंबर पलुस्कर हाही जबरदस्त कलावंत होऊन गेला. ग्रंथसंग्रहाची प्रवृत्तीही हटते आहे. प्रा. जिन्सीवाले, टिळक, बॅ. जयकर, डॉ. आंबेडकर, प्रा. लागू ह्यांनी वेचक ग्रंथसंग्रह जमवला होता. अलिकडे अशी उदाहरणं नाहीत. शेजवलकरांचं वाचन चांगलं होतं. पण त्यांनासुद्धा ग्रंथसंग्रह नाहीच.

म्हणजे विद्येच्या क्षेत्रातलं एकूण वातावरण निराशेचंच आहे म्हणायचं ! ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळीची कटूता या पुढच्या काळात फार विकोपाला जाईल असं तुम्हाला वाटतं ?

अजिबात नाही. काळ जसजसा पुढे पुढे जाईल तसतसा हा वाद मावळेल. ब्राह्मणांचं जसं ब्राह्मण्य फारसं उरलेलं नाही, तसंच मराठ्यांची क्षत्रियवृत्तीही फारशी उरलेली नाही. ब्राह्मणेतरही चावटपणा काही कमी करीत नाहीत. पण ब्राह्मणेतर समाजाची एकूण प्रगतीच होताना दिसत आहे. कितीतरी नामी माणसं ब्राह्मणेतरांमधूनच पुढे येताना दिसत आहेत. तुमचा पु. ल. देशपांडे हे उदाहरण आहेच की. मोठा गुणी माणूस आहे तो. अर्थात, सारस्वत कसले म्हणा 'ब्राह्मणेतर'? पण सध्या पंचद्राविड ब्राह्मणांच्या बाहेर ते आहेत म्हणून त्यांचा हवाला दिला. तुम्ही काही घाबरू नका हो; सारस्वतांना मरण नाही ?

तुम्ही आत्मचरित्र लिहिणार आहात ?

नाही. काय करायचं आहे लिहून ? लिहीलं तर अनेक अप्रिय गोष्टी लिहाव्या लागतील नि पुन्हा वादंग माजेल.

तुम्ही दैनंदिनी वगैरे लिहीता ?

नाही.

तुम्ही शिवचरित्र अजून कसं लिहिलं नाही ?

त्याचं खास कारण असं काही नाही. नाही लिहिलं म्हणून नाही लिहिलं. पण माझा तो विषय उत्तमपैकी तयार आहे. वाटलं तर लिहीनसुद्धा.

तुम्ही शेकडो-हजारो व्याख्यानं दिली आहेत. त्याची टिपणं, कात्रणं, वगैरे ठेवली आहेत ? ती पुढे फार उपयुक्त ठरतील.

मी ठेवलेली नाहीत. पण माझा मुलगा तशा कात्रणांची फाईल करून ठेवतो आहे. माझ्या नातवांना मी थोर लोकांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. त्या मात्र मी लिहून ठेवल्या आहेत.

आणखी एका वर्षाने फाटक ऐंशी वर्षांचे होतील. त्यानंतर वीस वर्षांनी शंभर वर्षांचे होतील. पण देहाच्या आणि मनाच्या म्हणून काही परिमित शक्ती आहेत. त्या शाबूत असेपर्यंत वाचेच्या फटकळ पण हृदयाकडून हितैषी असलेल्या फाटकांनी आत्मचरित्र लिहील, तर अलम् मराठी शब्दांच्या दुनियेतली ती अफलातून चीज ठरेल. पण नेमकं आत्मचरित्र ह्या विषयालाच त्यांनी टाळं ठोकलं आहे. जो कुणी ते टाळं उघडेल नि फाटकांना त्या दिशेने लिहीतं करेल, तो मराठी वाचकांच्या दुव्याचा धनी ठरेल ही दगडावरची रेघ !

अरविंद ताटके म्हणतात की फाटक म्हणजे बाभळीचं झाड. जवळ जा; काटे बोचतील; छाया मिळणार नाही, हा झाला त्यांचा अनुभव. फाटक विलक्षण ममताळू आहेत. सहृदय आहेत. कै. आवळसकरांचा ‘रायगड’ हा ग्रंथ केवळ फाटक होते म्हणूनच वाजत गाजत प्रकाशित झाला, तो काय फाटक काटेरी विद्वान आहेत म्हणून ? हं; फाटक चूक असली तर गय करणार नाहीत. टिळक खाडील-करांना ‘फॉरीन सेक्रेटरी’ म्हणत. महामहोपाध्याय पोतदारांनी खाडिलकरांच्या जागी केळकरांनाच ती बिरुदावली लोकमान्यांच्या मुखातून लावली. तत्काळ फाटकांनी मित्र असलेल्या पोतदारांना जाभलं. ही सर्व पथ्यं सांभाळून फाटकांशी गेलं तर फाटक वत्सल वृक्षच आहे. वृक्ष कृपा करतात.

ठाऊक. मुख्यमंत्र्यांची म्हणजेच विधानमंडळातील पक्षनेत्याची निवड पक्षाच्या आमदारांनी करायची असते. सध्याचे सर्वच आमदार १९७२ मध्ये दिसतील हे शक्य नाही. पण हे सध्याचे सर्वच्या सर्व आमदार श्री. नाईकांना फारसे अनुकूल आहेत असे म्हणता येणार नाही. काही काही आमदार उघड नाराजी व्यक्त करतात. विधानसभेत चर्चा चालू असताना सभागृहात मुख्यमंत्री फारसे बसत नाहीत. परवा राज्यपालांच्या भाषणावरील चर्चेच्या वेळी विरोधी पक्षीयांना बहिष्कार टाकला होता. त्यामुळे चर्चेत भाग घेणारे सारे कॉंग्रेसचेच. चर्चा अर्थातच रटाळ झाली. पण सगळे आपलेच लोक. म्हणून मुख्यमंत्र्यांनी सभागृहात फारशी उपस्थिती राखली नाही. कॉंग्रेसचे लोक नाराज झाले. अशानं शिस्त बिघडते. यशवंतराव असे सभागृहात शेवटच्या काही तासात नियमितपणे येऊन बसत, असे कॉंग्रेसचे जुने आमदार सांगतात. वसंतराव तसे आमच्याकडे फारसे लक्ष देत नाहीत अशी त्यांची तक्रार आहे. त्यामुळे आमचे डिमॉरलायझेशन होते असे हे म्हणतात. कुणाला फारसे जवळ करायचे नाही या त्यांच्या वृत्तीमुळे असे होते म्हणतात.

पण आजचे सर्वच आमदार १९७२ साली राहणार नाही. निवडणुकीची तिकीटे देताना पुन्हा श्री. यशवंतराव चव्हाण, नाईक आणि वसंतदादा पाटील यांच्यात आपापली माणसे घुसविण्याची स्पर्धा लागणार. यावेळी तर खुद्द प्रधानमंत्रीही विधानसभा निवडणुकीची तिकीटे वाटण्यावर जातीने लक्ष ठेवणार आहेत म्हणे. या निवडणुकीतून जे आमदार उरतील ते सर्वच यशवंतरावांच्या शब्दावर माना डोलावतील असेही सांगता येणार नाही. त्या दृष्टीने पूर्वीच्या निवडणुकांपेक्षा यावेळचे चित्र वेगळेच राहणार आहे. त्यामुळे ऐनवेळी वर सांगितलेल्या उमेदवारां-ऐवजी भलताच उमेदवार वर निघाला तर आश्चर्य वाटायला नको. महाराष्ट्रात महत्वाकांक्षी आमदारांना आणि मंत्र्यांना तोटा नाही.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

लालमहाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

ब. मो. पुरंदरे

किंमत
प्रत्येकी
रुपये तीन

राजहंस प्रकाशन
पुणे.